मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका


युगवाणी विशेषांक

ऑक्टो-६६ (केशवसुत), ऑक्टो-६७ (कला केन्द्र समिती),
ऑग-६९ (कादंबरी) ऑक्टो-६९, (म. गांधी जन्मशताब्दी),
नो-डि-७९ (राजभाषा मराठी) डिसें-८२, जा-८३
(हीरक महोत्सव)

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका



वि. सा. संघाच्या प्रवेशद्वारावरील शलाकाशिल्प

॥ यु ग वा णी ॥

हीरक महोत्सव विशेषांक

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
पुरस्कृत : विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक :
शरद कोलारकर

कार्यकारी संपादक व प्रस्तुत अंकाचे विशेष संपादक :
प्रकाश देशपांडे

संपादक मंडळ :
मु. श्री. पांढरीपांडे, म. ग. जोशी, वृंदावन देशमुख, रूपा कुळकर्णी,
शंकर वडे, श्रीपाद मुंजे

□ वर्ष : ३९ □ अंक १ ८ सेंबर / जानेवारी १९८२-८३
□ मार्गशीर्ष-पौषक्षय शके १९ □ शिशिर □ मूल्य दहा रुपये

अनुक्रमणिका

अनुक्रम

सिंहावलोकन

दोन कथा

संवाद

कविता

प्रकल्प

स्मृती

श्रेय

मुखपृष्ठ : अजय समर्थ, मलपृष्ठ : भानजीभाई पाटणकर, रेखाचित्रे : विठ्ठल वाघ, अक्षरलेखन : संजय धोतरकर, छायाचित्रे : मधुकर पारळकर आणि सुदर्शन गोडबोले, माहिती संकलन : मदन धनकर, चंद्रकांत कुळकर्णी, योगेश वऱ्हाणपुरे, मनोहर म्हैसाळकर, वामन तेलंग.

तांत्रिक

मुद्रण : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर, मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर आर्टस्, धनतोली नागपूर, ठसे : तरुण भारत प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स लि. रामदासपेठ, नागपूर.

॥ दोन शब्द ॥

विदर्भ साहित्य संघाच्या हीरक महोत्सवनिमित्त प्रकाशित होत असलेला युगवाणीचा हा विशेषांक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. वि. सा. संघाने आपल्या कार्याची ६० वर्षे पूर्ण केली. वि. सा. संघाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने या संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न या अंकात आहे.

साहित्यिक आणि सांस्कृतिक संघटनांना अल्प-जीवित्वाचा शाप आहे. कोणताही साहित्यिक उपक्रम सातत्याने फार जास्त दिवस का जगू शकत नाही, याची मीमांसा व्हायला हवी. उपक्रमांचे प्रयोजन संपले की तो आपोआप मृतवत् होतो, असा युक्तिवाद केला जातो. तत्कालिक स्वरूपाच्या प्रयोजनबद्ध उपक्रमांसाठी ही गोष्ट ठीक आहे. पण साहित्यिक आणि सांस्कृतिक संघटनांच्या उभारणीमागील प्रयोजनच मुळात 'समाजाचे सांस्कृतिक उत्थान' हे असते. हे प्रयोजन कधीच संपण्यासारखे नाही, तरी मोठ्या उमेदीने निर्माण होणाऱ्या साहित्यसंस्थांवर काही काळातच टाळेबंदीचे सावट कां दाटून येते ?

साहित्यिक उपक्रमांनाही दीर्घजीवित्व देणे अवघड नाही. उपक्रमांची व्याप्ती कमी अधिक करून ते जागते ठेवता येऊ शकतात. शिवाय उपक्रमांचे सूत्रधार बदलले की पुन्हा नवचैतन्य येऊ शकते, हे सत्य नाकारता येत नाही. पण प्रत्यक्षात असे होत नाही. एखादा सूत्रधार आपल्या उपक्रमांचे कोष स्वत:भोवती विणून घेतो, इतरांसाठी प्रवेशद्वारे बंद करतो किंवा नाकारतो. आणि या सूत्रधाराला नवा कोष गवसला किंवा त्याची उमेद ओसरली की त्याच्या उपक्रमांचे जाळे विसविशीत होऊन संपते. साहित्यक्षेत्रात ही प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. साहित्यक्षेत्रातील एखादी चळवळ वादळाचे रूप घेऊन साऱ्या क्षेत्राला हादरवून का टाकू शकत नाही ? दलित साहित्याच्या निमित्ताने मराठी साहित्यात सुरू झालेली नवी हालचाल अद्याप वादळ-स्वरूप झालेली नाही. या चळवळीच्या सूत्रधारांचे सर्वमान्य व्यासपीठ नाही आणि चळवळीला नेमकी दिशाही नाही. मुख्य प्रवाहापासून विभक्त होऊन नवा प्रवाह निर्माण करण्यासाठी दिशादर्शी, समर्थ, क्रांतिकारत्व हवे असते. पण दलित साहित्याच्या चळवळीचे प्रणेतेपद मागण्याची आग्रही भूमिका आणि छचोर तडजोडी यामुळे ही चळवळ गलितगात्र होऊन गेली. या नव्या चळवळीचे सूत्रधार मानमरातब आणि बिरुदावल्यांच्या जाळ्यात अडकून आत्मगौरव करू लागले. नेत्यांच्या क्रियाकलापाचा प्रभाव अर्थातच सर्व-दूर पसरत असतो. दलित साहित्याच्या बाबतीतही नेमके हेच घडले. तथाकथित क्रांतिकारी शूरवीरांनी मराठी साहित्यात आलेला हा नवा प्रवाह समर्थ, वेग-वान करण्याऐवजी क्षीण करून टाकला.

अन्य उपक्रमांचेही थोडेफार असेच आहे. लटपटत्या पायांनी उभे राहण्याचा प्रयत्न करतानाच हे उपक्रम भुईसपाट होत जातात. ही स्थिती क्लेशदायी आहे. दलित साहित्य, रंगमंच सोडून रस्त्यावर आलेले नाटक किंवा विद्रोहाचा जाहीर उच्चार करणारी पोस्टरपोएट्री साहित्यकलेच्या आणि समाज प्रबोधनाच्या संदर्भात फार महत्त्वाचे कार्य करू शकते. पण या महत्त्वाच्या चळवळींना मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त राखण्याच्या दुराग्रहपायी या या चळवळींची केवळ वांडगुळे बनली, हे सत्य कसे बरे नाकारता येईल ?

याही स्थितीत मराठी भाषाभिवृद्धीसाठी प्रयत्न-शील असलेल्या काही संस्था अविरत कार्यरत आहेत. नव्या–जुन्यांचा स्वीकार करीत साहित्यप्रवाह विस्तारण्याचे या संस्थांचे कार्य तथाकथित बंडखोरांच्या टीकेचे एकमात्र लक्ष्य बनले असले तरी प्रबळ प्रयोजनामुळे या संस्था टिकून आहेत. विदर्भ साहित्य संघ ही संस्थाही अनेक ऊनपावसाळे अंगावर झेलीत गेल्या ६० वर्षांपासून मराठी साहित्याच्या क्षेत्रात आपले योगदान करीत आली आहे.

वि. सा. संघाने आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात काय केले याचा आढावा घेणारे लेख या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. चंद्रपूरचे साहित्यभूषण श्री. तु. ना. काटकर यांनी वि. सा. संघाचा धावता आढावा घेणारा अभ्यासपूर्ण लेख तयार करून दिला. डॉ. आशा सावदेकर यांनी युगवाणीच्या वाटचालीची

माहिती संकलित केली आहे. याशिवाय परीक्षा समिती, श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय आणि अन्य काही उपक्रमांची माहिती या अंकात आहे. वि. सा. संघाच्या अनेकांगी कार्याचा परिचय या माहितीवरून व्हावा.


विदर्भातले महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र बनलेली ही संस्था उभारण्यासाठी अनेक साहित्यिकांचे डोळस परिश्रम कारणीभूत झाले आहेत. सर्व जनमान्य साहित्यिक आणि कलावंतांनी वेगवेगळ्या निमित्ताने वि. सा. संघाशी संपर्क कायम राखला, त्यातील अनेक साहित्यिक तर वि. सा. संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते होते. या सर्वांनी वि. सा. संघात अनेकविध योजना व साहित्यिक उपक्रम राबविले. चर्चा, व्याख्याने, अनेकविध स्पर्धा, नाटक, संगीताचे कार्यक्रम, चित्रप्रदर्शने इ. माध्यमांमधून वि. सा. संघाचे कार्य सुरू आहे. अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार व्हावा यासाठी परीक्षा समितीने सुरू केलेल्या परीक्षा आणि श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात उपलब्ध असलेली अद्यावत संदर्भसेवा व मार्गदर्शन हे वैशिष्टयपूर्ण उपक्रम वि. सा. संघात सुरू आहेत. श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात दलित साहित्य अभ्यास साधने, बालसाहित्य, नवे ग्रंथ नवे समीक्षक आणि भितीपत्रक इ. महत्त्वपूर्ण प्रकल्प नव्यानेच सुरू करण्यात आले आहेत. डी. लिट्. समकक्ष ‘साहित्य-वाचस्पती’ ही अत्युच्च पदवी हीरक महोत्सवी पर्वापासून सुरू करण्याचा निर्णय झालेला आहे.


कलावंतांना आर्थिक मदत देण्यासाठी कलाकार सहाय्य निधी उभारण्यात येत आहे. साहित्यिक व कलावंतांसाठी विश्रामगृह, उत्तम रंगपट आणि धनवटे रंगमंदिराला देखणे प्रसन्न स्वरूप देण्यासाठी यावर्षीच्या वि. सा. संघाच्या अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यात आली आहे.

विदर्भातील नव्या–जुन्या सर्वच साहित्यिकांना वि. सा. संघ आपलासा वाटला, वि. सा. संघ हे साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीचे महत्त्वाचे केंद्र व्हावे, अष्टकलांची जोपासना आणि विकास या संस्थेने करावा अशी अपेक्षा वि. सा. संघाच्या निर्मितीपासूनच राहिली आहे. सर्व आघाड्यांवर उपक्रम चालविताना अनेक अडचणी उपस्थित होतात. निःस्वार्थ आणि प्रतिभावान कार्यकर्त्यांची उदासीनता कलाक्षेत्रातील चळवळींना मारक ठरणारी असते. विदर्भात अशा महत्त्वाच्या चळवळी काही प्रमाणात निर्माण झाल्या आणि लगेच लोप पावल्या. चळवळींचा विस्तार न होण्यासाठी ही उदासीनता कारणीभूत ठरली आहे काय, याचेही विश्लेषण झाले पाहिजे. वि. सा. संघाला साहित्यिक आणि कलाकारांच्या उदासीनतेचे कटु अनुभव वेळोवेळी आले आहेत. वारंवार सन्मानपूर्वक निमंत्रणे देऊनही वि. सा. संघाच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची टाळाटाळ करणारे स्वनामधन्य साहित्यिक आजही आहेतच. काही विशिष्ठ व्यक्तींशी वैरभाव जोपासायचा, वि. सा. संघाच्या कार्याबाबत उदासीनता राखायची आणि बाहेर जमेल तेव्हा वि. सा. संघाबद्दल अनुदार उद्गार काढत रहायचे हा साराच प्रकार अनाकलनीय आहे.

कलाक्षेत्रातील चळवळींच्या संदर्भात वि. सा. संघाला काय करता येण्यासारखे आहे, या विषयावरील चर्चा प्रस्तुत अंकात समाविष्ट करण्यात आली आहे. काही महत्त्वाच्या सूचना करीत असतानाच चर्चेत सहभागी झालेल्या काही मंडळींनी कमालीच्या हिणकसपणे विदर्भ साहित्य संघावर दूषणे चढविली आहेत. कार्यातील त्रुटींचे दिग्दर्शन नेहमीच स्वागतार्ह असते, पण पूर्वग्रहदूषित, अतिरंजित आणि निराधार आरोपांची वाच्च्यता विकृत मनोवृत्तीचे स्पष्टीकरण करणारी असते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

या विशेषांकासाठी कथा, कविता आणि मुखपृष्ठ स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. श्री. प्रभाकर पुराणिक (कथा), श्री. विठ्ठल वाघ (कविता) आणि सर्वश्री प्रा. मंगेश राजाध्यक्ष, प्रा. प्रकाश कावळे, आणि प्रा. धनंजय वर्मा (मुखपृष्ठ) यांनी या स्पर्धेतील प्रवेशिकांमधून सर्वोत्कृष्ट प्रवेशिकांची निवड करून दिली. त्यांचे आणि सर्व स्पर्धकांचे आभार. हा अंक तयार करण्यासाठी अनेकांनी विविध प्रकारे मदत केली. नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन पांडुरंग वनहट्टी व श्री. श्रीकृष्ण पांडुरंग वनहट्टी तसेच मधुकर आर्टस्‌चे श्री. मधुकरराव वैद्य यांचे व अन्य सर्व सहकाऱ्यांचे आभार.





॥ सिंहावलोकन ॥

विदर्भ साहित्य संघाची साठ वर्षे

साहित्यभूषण तु. ना. काटकार

प्राचीन विदर्भविषय: सारस्वती जन्मभू

कविवर्य राजशेखर विरचित 'बालरामायणा'त राम–रावण युद्धोत्तर राम सीतेसह पुष्पक विमानात बसून खालील प्रदेश पाहत पाहत आकाशमार्गे लंकेहून अयोध्येस येत असताना सांगतात–

यत्क्षेमं त्रिदिवायवर्त्म निगमस्याङ्‌गंच यत्सप्तमम्
स्वादिष्टंच यदैक्षवादपि रसाश्वक्षुश्चयद्वाङ्मयम् ।
तद्यास्मिमन्मधुरं प्रसादि रसवत् कान्तचकाव्यामृतम्
सोऽयं सुभ्रु पुरो विदर्भविषयः सारस्वतीजन्मभूः॥

(बा. रा. १०–१४)

अर्थात् "हे सीते! स्वर्गाचा सुखकर मार्ग, वेदाचे सातवे अंग, उसाच्या रसापेक्षाही मधुर व शब्दरूपी नेत्रचकीकाय असे सुमधुर प्रासादिक सुरस व मनोहर काव्यामृत ज्या देशात आहे व जो देश विद्येचे माहेरघर आहे, असा हा विदर्भ देश पुढे पहा."

यावरून हे स्पष्ट आहे, की विदर्भ हा अतिप्राचीन प्रदेश, प्राचीन कालापासून सरस्वतीचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. याचा इतिहास अति उज्ज्वल. विदर्भालाच पूर्वी ऋथकौशिक, भोजकट, वर्धातट, वऱ्हाड व विदर्भविस्तारीत महाराष्ट्र अशा संज्ञा असलेल्या इतिहासात आढळतात. त्याचा विस्तार उत्तरेस अमरावती पासून दक्षिणेस प्रतिष्ठानपर्यंत होता.

१

विदर्भ साहित्य संघ इतिहास

आजपासून ६० वर्षापूर्वी "विदर्भ साहित्य संघा"ची रीतसर स्थापना झाली. त्याची जन्मकथा अशी आहे: इ. स. १९०५–०६ मध्ये पुणे येथे "महाराष्ट्र साहित्य परिषद" ही साहित्यसंस्था अधिकृतपणे स्थापन झाली. तिचे कार्य व कार्यक्षेत्र मराठी साहित्याचा उत्कर्ष व महाराष्ट्र हे असले व तिची महाराष्ट्र साहित्य संमेलने व वार्षिक अधिवेशने पुणे–मुंबईच्या आसमंतात होत असली तरी इ. स. १९२० पर्यंत विदर्भ, मराठवाडा व खानदेश या भागात तिचे लोण पोहचले नव्हते.

अमरावतीचे कविभूषण श्री. बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे सांगतात, इ. स. १९२२ च्या मे महिन्यातील ही घटना. पुणे येथे एक मराठी भाषिकांचे कविसंमेलन झाले. निमंत्रणावरून त्या संमेलनास मी मोठ्या जिज्ञासेने गेलो होतो. संमेलन उत्कृष्ट झाले. एकापेक्षा एक सरस कविता ऐकताना स्वर्गीय आनन्द उपभोगावयास मिळाला. त्याचा माझ्या मनावर अप्रतिम

परिणाम झाला. असे वाङ्मयाचे आनन्दोत्सव–मेळावे–आपल्या वऱ्हाडातही कां होऊ नयेत, असे मला तीव्रतेने जाणवू लागले. या दिव्य आनंदाकरिता मला पुणे नगरापर्यंत धाव घ्यावी लागली. वऱ्हाडच्या किती लोकांना इतक्या दूरवर येणे शक्य आहे ? पुणे–मुंबईची साहित्यिक मंडळीही लांबवर कितीसे कार्य करणार ? तेव्हा विचार केला की वऱ्हाडातही असे वाङ्मयीन सोहळे व्हावेत. पुण्याहून अमरावतीला परत येईपर्यंत हेच काहूर डोक्यात घोळत होते. अमरावतीस परत आल्याबरोबर या प्रयत्नाला आरंभ केला.

कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे अमरावतीस येऊन पोहचताच त्यांनी सर्वप्रथम आपले तीर्थरूप श्री. दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, प्रि. दामोदर केशव ओक, मीमांसाभूषण पु. बा. साठे, बाळकृष्ण संतुराम गडकरी, ना. प्र. हिरूरकर, नी. ब. उर्फ बापूसाहेब भवाळकर यांच्याशी विचारविनिमय करून प्रोत्साहन व सहकार्य मिळविले. नंतर वऱ्हाड, नागपूर, मराठवाडा व खानदेश येथील साहित्यप्रेमींशी पत्रव्यवहार सुरू केला. **यवतमाळहून** लो. माधव श्रीहरि उर्फ बापूजी अणे, डॉ. यशवंत खुशाल देशपांडे, स. ह. बल्लाळ, पृथ्वीगीर हरिगीर, वा. ना. देशपांडे, **बलढाण्याहून** अॅड्. यादव माधव काळे, **खामगावहून** श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, **नागपूर** विभागातून प्रि. केशवराव ताह्मण, म. म. कृष्णशास्त्री घुले, विद्वद्रत्न डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी, कविवर्य आनन्दराव टेकाडे, श्रीनिवास रामचन्द्र वोवडे, गो. स. देव, ज. के. उपाध्ये, म. म. वा.वि. मिराशी, विश्वनाथराव केळकर, गोपाळ अनंत उर्फ दादासाहेब ओगले, **चन्द्रपूरहून** लोकाग्रणी बळवंत राघव उर्फ बाबासाहेब देशमुख, **वर्धेहून** प्रा. नारायण केशव बेहेरे व अॅड्. मनोहरपंत वोवडे, **खानदेश** विभागातून 'काव्यरत्नावली'कार नारायण नरसिंह फडणीस, कविवर्य दु. आ. तिवारी, के. म. सोनाळकर, कवि वलवन्त, **मराठवाडा** विभागातून न्या. मू. केशवराव कोरटकर, न्या. मू. पळणीटकर, श्रीमंत वामनराव नाईक, दिगंबरराव बिन्दु, **औरंगाबादहून** दत्तुबुवा पद्माकर व कवि कोरेवल, **नांदेडहून** दे. ल. महाजन प्रभृतींशी त्यांनी संपर्क साधला.

या सर्वांनी कविभूषणांच्या कल्पनेचे स्वागत करून पुढील कार्यास प्रोत्साहित केले.

साहित्यप्रेमी लोकांचे पहिले संमेलन

इ. स. १९२२ च्या मे पासून डिसेंबर या आठ महिन्यात पहिल्या संमेलनाची सर्व सिद्धता झाली. संमेलनाध्यक्ष साहित्याचार्य श्री. कृ. कोल्हटकर निश्चित झाले. स्वागताध्यक्ष प्रि. दा. के. ओक निवडल्या गेले. संमेलनाच्या तारखा १३ व १४ जानेवारी १९२३ (मकरसंक्रमण) ठरल्या. संमेलनस्थान ब्रह्मविद्या मंदिर आणि निवासस्थान खापर्डेवाडा* ठरला.

शेवटी संमेलनाचा दिवस उजाडला. वरील चारी विभागातून प्रतिनिधी आले होते. त्यात नियोजित अध्यक्ष साहित्याचार्य श्री. कृ. कोल्हटकर, दक्षिण हैद्राबादचे न्या. मू. केशवराव कोरटकर, अन्य प्रदेशातून केवळ चौदाच प्रतिनिधी होते. पण एक एक एवढचा तोलामोलाचे होते की त्यांचे वजन अमरावती नगरावर कल्पनातीत पडले. या सर्वांचा मुक्काम खापर्डेवाड्यातच होता. त्यामुळे ते किती होते हे लोकांना कळलेदेखील नाही. स्थानीय अध्यापक, वकील, डॉक्टर्स, विद्यार्थी व साहित्यप्रेमीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. हे साहित्यप्रेमी जनांचे संमेलन भरदार झाले.

विदर्भ साहित्य संघ[१] स्थापना

१३ जानेवारी १९२३ रोजी सायंकाळी साहित्याचार्यांकडून संमेलनाचा संदेश मिळाल्यावर १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता खुल्या अधिवेशनात ठराव-

---

* कविभूषण अण्णासाहेब खापर्डे सांगतात अधिवेशनाच्या दिवशी सकाळी साहित्याचार्य श्री. कृ. उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांनी श्मश्रु करविला व ते न्हाव्यास पैसे देऊ लागले. (आमचेकडेच त्यांनाही उतरवून घेतले होते, आणि त्यांना कोट्या करण्याची अतिशय आवड होती, हे प्रसिद्धच आहे.) तेव्हा आमच्या बंधूंनी ती. बाबासाहेबांनी, त्यांना विनोदाने म्हटले : "हे काय तात्यासाहेब ? छे, छे ! त्याचे पैसे आम्ही देऊ. आम्हाला निदान अध्यक्षाची हजामत केल्याचे तरी श्रेय मिळू द्या !" –तेव्हा तात्यासाहेबही मोठ्याने हसले व त्यांनी पाकीट खिशात परत टाकले.

१. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे नावासंबंधी स्पष्टीकरण देतात : (१) प्रदेशास्तव "विदर्भ" आणि (२) उद्देशास्तव "साहित्य" हे दोन ह्या नावातील शब्द मी प्रथम कायम केले. पण ह्या दोन शब्दांच्या

रूपात उपरोल्लिखित शीर्षकाची संस्था एकमताने स्थापन झाल्याचे पहिल्याच ठरावाने टाळ्यांच्या गजरात घोषित करण्यात आले. दुसऱ्या ठरावाने तिची कार्य-कारिणी अविरोध निवडण्यात आली.

पहिले संघाध्यक्ष : न्यायमूर्ती केशवराव कोरटकर
उपाध्यक्ष : सर्वश्री. माधव श्रीहरी अणे
श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
यादव माधव काळे
बाळकृष्ण गणेश खापर्डे
बापूसाहेब भवाळकर
नारायण नरसिंह फडणीस
सरचिटणीस : कविभूषण व. ग. खापर्डे
चिटणीस : विश्वनाथराव केळकर
(नागपूर विभाग)
दुर्गाप्रसाद तिवारी (खानदेश)
गणपतराव मोलेकर (निजाम स्टेट)
कोषाध्यक्ष अँड्. दादासाहेब शेवडे, अमरावती
आणि काही सदस्य चारहीभागातून

दोन दिवस नव्या दमात, नव्या उत्साहात काव्य-शास्त्रविनोदात कसे निघून गेले हे कळले देखील नाही. तेथूनच विभागश: प्रत्यक्ष कृतिकार्यास प्रारंभ झाला. हेच विदर्भाचे कार्यक्षेत्र ठरल्या गेले आणि तेथील साहित्यिकांना एकत्रित येऊन मराठी व प्रचार-प्रसारासाठी संघटित प्रयत्न करण्यास मराठीचे आद्यकवी मुकुंदराजांची ही मराठीची मूळभूमी "विदर्भ साहित्य संघ" रूपाने खुली झाली. प्राचीन "विदर्भ" नावाचा नव्याने पुनरोद्धार कविभूषणांनी केला.

स्थापनेनंतरची सहा संमेलने

लगेच दुसऱ्या वर्षी १९२४ साली **दुसरे संमेलन**

पुढे मग संस्था, परिषद, समिती, मंडळ, संघ वगैरे अनेक शब्दांपैकी कोणता संघटित समूहवाचक तिसरा शब्द घ्यावा हा विचार मला बरेच दिवस पडला. अखेर माझे सर्वात वडीलबंधू ती. बाबासाहेब यांच्या सल्ल्याने असे ठरविले की; बौद्धधर्मेतिहासात अतिशय गाजलेला जो "संघ" शब्द तोच ऐतिहासिकतेच्या, प्राचीनतेच्या, पवित्रतेच्या व सूचकतेच्या दृष्टीने सर्वात उत्तम आणि म्हणून तो घ्यावा हे निश्चित झाले. अशा रीतीने या संस्थेचे नाव पूर्ण झाले. ते पूर्ण समाधानी नाव "विदर्भ साहित्य संघ" होय.

अमरावती येथेच १९ एप्रिल रोजी अँड्. यादव माधव काळे यांचे अध्यक्षतेखाली, **तिसरे संमेलन** १९२६ साली यवतमाळ येथे १७ व १८ जानेवारीस साहित्यसम्राट न. चि. केळकर यांचे अध्यक्षतेखाली, **चौथे संमेलन** १९२७ साली दक्षिण हैद्राबाद येथे १० व ११ जूनला भारताचार्य चि. वि. वैद्य यांचे अध्यक्षतेखाली, **पांचवे संमेलन** १९२८ साली जळगाव येथे २५ व २६ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांचे अध्यक्षतेखाली व **सहावे संमेलन** १९२९ साली नागपूर येथे ६ व ७ सप्टेंबर रोजी ना. दादासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली नागपूरच्या वैभवात संपन्न झाले.

२

यानंतर संघाचे संस्थापक कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांना महामना पं. मदन मोहन मालवीयजी यांनी आपल्या बनारस विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून म्हणून बोलावणे केल्यावरून ते बनारसला निघून गेले. त्यामुळे इ. स. १९२९ पासून १९३६ पर्यंत वार्षिक अधिवेशने बंद पडली. केन्द्रीय कार्यालय मात्र अमरावतीलाच होते. १९३६ मध्ये प्रा. वि. भि. कोलते नागपूर येथे स्थलांतरीत झाले. व विदर्भ साहित्य संघाच्या निद्रिस्थ कार्यास पुन: जाग आली.

सातवे अधिवेशन

यावेळी वऱ्हाड-मध्यप्रांतात प्रांतीय स्वायत्तता कार्यान्वित झाली होती. प्रांताचे पंतप्रधान-आजच्या भाषेत-मुख्यमंत्री ना. डॉ. ना. भा. खरे हे होते. प्रा. वि. भि. कोलते, प्रा. श्री. ना. बनहट्टी व श्री. ना. कृ. दिवाणजी यांनी पुढाकार घेऊन सातवे अधिवेशन अमरावती येथेच मुंबईचे प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली २१ व २२ आगस्ट १९३७ रोजी यशस्वीरीत्या पार पाडले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. वि. भि. तथा भाऊसाहेब कोलते होते, तर उद्घाटन पंतप्रधान डॉ. ना. भा. खरे यांनी केले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 'मॅझिनी', पेंडसे याचा 'गुन्हेगार', शि. म. परांजपे यांचे 'काळातील निबंध', चिपळूणकरांचे 'पत्री' या जप्त केलेल्या पाच पुस्तकावरील बंदी उठविल्याची क्रान्तीकारी घोषणा या सातव्या संमेलनात डॉ. खरे यांनी केली.

याचा अधिवेशनात पुढील वर्षाकरिता नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. संघाध्यक्ष : लो. बापूजी

अणे, सरचिटणीस : श्री. अ. तु. वाळके, चिटणीस : सर्वश्री र. वि. कुळकर्णी व सदस्य : प्रा. या. मु. पाठक; प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. वि. भि. कोलते, प्रा. मा. गो. देशमुख, सौ. मथुराबाई द्रविड व श्री. बा. सं. गडकरी.

सरचिटणीशी म्हणजे प्रांताबाहेर जाण्याची सुपारी

पण संघाचे सरचिटणीस श्री. अ. तु वाळके यांना एकाएकी परप्रांती जाण्याचा प्रसंग आला. ते निघून गेले. त्यावेळी प्रा. बनहट्टी सहज उद्गारून गेले: "संघाचे सरचिटणीसपद म्हणजे जणू काही प्रांताबाहेर जाण्याची सुपारीच ठरावी." आणि खरोखरच कविभूषण खापर्डे यांच्यानंतर संघाची जी अवस्था झाली होती, तीच प्रती अवस्था श्री. वाळके परप्रांती जाण्याने झाली व पुनः संस्थेपुढे पेचप्रसंग उभा राहिला. नव्हे पुन: सात वर्षे संघ अज्ञातवासात राहिला.

पुनरुज्जीवन

सातव्या अधिवेशनानंतर दोन वर्षातच दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाल्याने अधिवेशनाचे सोहळे स्थगित झाले. पुन: १९४४ मध्ये प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे नागपूरहून अमरावतीस स्थानांतर झाले. यावेळी संघाध्यक्ष लो. मा. श्री. उर्फ बापूजी अणे हे श्रीलंकेत भारत सरकारचे हायकमिश्नर म्हणून काम पहात होते. त्यांनी संघाध्यक्षाचे सर्व अधिकार प्रा. श्री. ना. उर्फ दादासाहेब बनहट्टी यांचे स्वाधीन केले व आकोट येथे आठवे अधिवेशन मार्च १९४५ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनाचे संमेलनाध्यक्ष होते डॉ. यशवंत खुशाल उपाख्य आप्पासाहेब देशपांडे. संमेलनापूर्वी १ जानेवारी १९४५ मध्ये नवी घटनासमिती नेमून विदर्भ साहित्य संघाची नवीन घटना तयार करण्यात आली. संघाध्यक्ष पदावर प्रा. श्री. ना. बनहट्टी, सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी, सदस्य कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे, प्रा. वि. भि. कोलते, श्री. शं. ना. सहस्त्रबुद्धे व श्री. अ. तु. वाळके अशी केन्द्रीय कार्यकारिणी निवडण्यात आली.

प्रा. दादासाहेब बनहट्टी यांनी एक छोटासा पुनरुज्जीवनाचा समारंभ अचलपूरचे श्रीमंत नारायण व्यंकटेश उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ३० मार्च १९४५ रोजी आकोट येथे साजरा केला.

याच अधिवेशनात संघाचे मुखपत्र म्हणून "युगवाणी" १ जानेवारी १९४६ पासून सुरू करण्याचे व संघाच्या "मराठी साहित्य परीक्षा" चालू करण्याचे ठरविण्यात येऊन त्याचे दायित्व अनुक्रमे 'किर्लोस्कर–मनोहर'चे 'रामशास्त्री' श्री. बा. ना. देशपांडे व प्रा. वि. भि. कोलते यांचेवर सोपविण्यात आले.

३

पुनरुज्जीवनानंतरची संमेलने

इ. स. १९४५ मध्ये नववे संमेलन दर्यापूर येथे प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली, १९४६ साली दहावे संमेलन पुसद येथे श्री. पु. य. उर्फ बाबासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, १९४८ साली अकरावे संमेलन गोंदिया येथे डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली व संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून संस्थेचा रौप्यमहोत्सव बिहारचे राज्यपाल लो. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली गोंदिया येथेच पार पडला. आणि इ. स. १९४९–५० करिता प्रा. डॉ. मा. गो. देशमुख हे संघाध्यक्ष पदावर निवडून आले.

गोंदिया येथील अकरावे संमेलन हे स्वातंत्र्यातील पहिले साहित्यसंमेलन व २५ वर्षांपूर्वी पारतंत्र्यात जन्म झालेली ही संस्था, तिचा स्वातंत्र्यातील हा रजत महोत्सव होता.

संघाची एक वर्षीय कारकीर्द

या वेळची घटना अशी होती की आपल्या कार्यकारिणीसह अध्यक्षाने निवडून यावयाचे, वर्षभर कार्य करावयाचे, शेवटी संमेलनाचे अध्यक्षपद भूषवायचे व नवीन निवडून आलेल्या संघाध्यक्षांच्या हाती नवीन वर्षाची संघाची सूत्रे देऊन निवृत्त व्हावयाचे.

यावेळी भारत स्वतंत्र होऊन दोन वर्षे लोटली होती. २६ जानेवारी १९५० पासून भारतात लोकशाही प्रजासत्ताक चालू झाले होते.

४

"विदर्भ साहित्यमंदिरा"ची मुहूर्तमेढ

इ. स. १९५०–५१ च्या संघाध्यक्षपदाकरिता साहित्यभूषण प्रि. हरि नारायण नेने यांची रीतसर निवड झाल्यासारखीच होती. पण या वर्षात (१) विदर्भ साहित्य संघाचे कमीत कमी हजार सभासद करायचे, (२) संघाच्या कार्यालयाकरिता 'विदर्भ साहित्य मंदिर' उभे करायचे, (३) त्याकरिता योग्य अशी भूमी शासनाकडून मिळवायची अशा भव्य दिव्य

उद्देशाने ऐनवेळी पत्रपंडित 'तरुणभारत'कार व विख्यात साहित्यिक श्री. गजानन त्र्यंबक उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांच्या नावाची शिफारस साहित्यिक श्रेष्ठींनी केल्यावरून प्रि. ह. ना. नेने यांनी दिलदारपणे संघाध्यक्षपदाचे आपले नाव मागे घेतले व श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनाच निवडून देण्याविषयी त्यांनीही प्रकट विनंती केली. श्री. भाऊसाहेब माडखोलकर आपल्या पॅनलसह अविरोध निवडून आले.

१२ वे विदर्भ साहित्य संमेलन ४ व ५ फेब्रुवारी १९५० रोजी चन्द्रपूरच्या ऐतिहासिक भूमीवर प्रा. डॉ. माधव गोपाळ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडले. या संमेलनात साहित्य मंदिराचा भावगंध सर्वत्र दरवळला. डॉ. देशमुखांनी पुढल्या १९५०-५१ च्या भरीव कार्याकरिता संघाध्यक्षाची सूत्रे श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या स्वाधीन केली. भाऊसाहेबांनी निर्वाचित सदस्यांव्यतिरिक्त अध्यक्षांनी स्वीकृत करावयाच्या दोन सभासदात (१) सर्वश्री ए. श्री. पटवर्धन व (२) पुरुषोत्तम दिवाकर उर्फ बाळासाहेब ढवळे यांना आपल्या कार्यकारिणीत सर्वप्रथम समाविष्ट करून घेतल्याची घोषणा केली. आणि याच अधिवेशनात पहिल्याच ठरावाद्वारे त्या वेळचा भाषाविषयक वाद लक्षात घेऊन मराठीचे कार्यक्षेत्र वाढविण्याकरिता "विदर्भ साहित्य मंदिर" उभारण्याचे, अमरावतीचे केन्द्रीय कार्यालय व दप्तर नागपूरास हलविण्याचे व तावडतोब जागेच्या प्रयत्नास लागण्याचे याच चन्द्रपूर अधिवेशनात घोषित केले.

त्यावरोबरच संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी नवीन कार्यकारिणीही घोषित केली. या संमेलनापूर्वी संमेलनाचे कर्तबगार सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी हे मोटर अपघातात ठार झाल्याने त्यांच्या जागी **सरचिटणीस** : श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी, **चिटणीस** : श्री. रा. पु. सगदेव आणि **सल्लागार** : न्यायमूर्ती के. तु. उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ती, श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. ए. श्री. पटवर्धन. याच सभेत ठराव करून दोन उपसमित्याही निर्माण करण्यात आल्या. : (१) निधी समिती व (२) मंदिर समिती.

निधी समितीचे **अध्यक्ष** न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व **आमंत्रक** श्री. बाळासाहेब ढवळे तर मंदिर समितीचे ही **अध्यक्ष** न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व **आमंत्रक** श्री. ए. श्री. पटवर्धन यांची योजना करण्यात आली.

भूमी प्राप्त झाली

संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी २० फेब्रुवारी १९५० रोजी नागपूरच्या डेप्युटी कमिश्नरकडे आवेदनपत्र देऊन विदर्भ साहित्य संघ भवनाकरिता जागेची मागणी केली होती. या आवेदनाचा विचार होऊन १ मार्च १९५० रोजी जेलरोड (हल्लीचा पं. जवाहरमार्ग) व उत्तर अंबाझरी रोड यांच्या कार्नरवरील ०.७५ एकर (३२,००० चौ. फूट) जागेस स्वीकृती देण्यात आली. या जागेचे वार्षिक भाडे केवळ एक रुपया आहे. पण ही जागा अपुरी पडेल असे दिसून येताच पुनः सरकारकडे अधिक जागेची मागणी करण्यात आली. ही मागणी स्वीकृत होऊन संघाला आता १.२० एकर म्हणजे ५२,५०६ चौ. फू. भूमी निश्चित झाली. तिचे रजिस्ट्रेशन झाल्यावर मंदिराच्या उभारणीस प्रारंभ झाला.

भूमिपूजन

२० ऑक्टोबर १९५० रोजी सकाळी ९-३० वाजता विजयादशमीस भूमिपूजनाचा समारंभ संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांचे शुभहस्ते उत्साहात पार पडला. या समारंभास सर्वश्री. अण्णासाहेब मंगळमूर्ती, ए. श्री. पटवर्धन, बाळासाहेब ढवळे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. वा. कृ. चोरघडे, रा. पु. सगदेव, डॉ. मा. गो. देशमुख, नानासाहेब जोग, ना. रा. शेंडे, ग. नी. भवाळकर, कुंदर दिवाण, केशवराव केळकर, सुरेश डोळके प्रभृती सानथोर उपस्थित होते.

नानासाहेब जोग यांचा 'रुपया निधी'

भूमिपूजनाच्या वेळी भूमिपूजनाच्या भूमीवरच श्री. नाना जोग यांनी मंदिर उभारणीसाठी आपली पहिली देणगी म्हणून एक रुपया कोषाध्यक्षांचे हाती देऊन "रुपया निधी" सुरू केला त्यांच्या या औचित्यपूर्ण कल्पनेचे सर्वांनी सहर्ष स्वागत केले. व तिथल्या तिथे बराच निधी जमाही झाला. अशाप्रकारे विजयादशमीच्या मुहूर्तावर आलेला श्री. जोगांचा निकट संबंध विदर्भ साहित्य मंदिर व पुढे वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिराचे काम सुरू होईपर्यंत आजीव राहिला. भाऊसाहेब माडखोलकर योग्य माणसे योग्य कामी जोडण्यात मोठे कुशल होते. ए. श्री. पटवर्धन, बाळासाहेब ढवळे

यांच्या बरोबरीने कुशल कार्यकर्त्यांत नानासाहेब जोगांची विशेषत्वाने भर पडली. त्यांची कामगिरी मंदिर उभारणीत ऐतिहासिक अशी चिरस्मरणीय ठरली आहे.

लोकनायकांची भेट व आशीर्वाद

बिहारचे राज्यपाल लो. बापूजी अणे यांनी नव्या वर्षारंभी १ जानेवारी १९५१ रोजी विदर्भ साहित्य संघ भूमीस भेट दिली व रु. १,००० ची देणगी जाहीर करून मंदिर उभारणीच्या कार्यास आपला शुभाशीर्वादही दिला.

पहिले आश्रयदाते

यानंतर २६ मार्च १९५१ रोजी श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांनी रु. ५,००० ची उदार देणगी देऊन ते विदर्भ साहित्य संघाचे पहिले आश्रयदाते झाले. या देणगीमुळे साहित्य मंदिर उभारणीच्या कार्यास उत्साही चालना मिळाली. तसेच सर्वश्री. माडखोलकर, ढवळे व पटवर्धन यांच्या शिष्टमंडळाने केलेल्या जिकिरीच्या प्रयत्नामुळे दुसरी देणगी मध्यप्रदेश वऱ्हाड शासनाची सुद्धा रु. ५००० हाती आल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला.

विदर्भ साहित्य मंदिराची कोनशिला

१५ एप्रिल १९५१ रोजी रामनवमीच्या मुहुर्तावर विदर्भ साहित्य मंदिराची कोनशिला बसविण्याच्या समारंभ मध्यप्रदेश वऱ्हाड शासनाचे गृहमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या हस्ते मोठ्या थाटाने पार पडला. त्याप्रसंगाची स्मृती म्हणून विदर्भ साहित्य मंदिरावर खालील लेख कोरलेला आहे–

> ॥ श्री ॥
>
> **विदर्भ साहित्य संघ**
>
> विदर्भ साहित्य मंदिर–कोनशिला स्थापना
> नामदार पंडित द्वारकाप्रसाद मिश्र
> गृहमंत्री, मध्यप्रदेश यांच्या हस्ते
>
> मिती रविवार, चैत्र शुद्ध ९, शके १८७३
> दि. १५ एप्रिल १९५१
>
> संघाध्यक्ष : श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

या कोनशिलेसोबत विदर्भ साहित्य मंदिराच्या पायात ठेवण्यासाठी जो ताम्रपट तयार करण्यात आला होता तो संपूर्ण पुढे दिला आहे.

> ॥ श्री ॥
>
> **विदर्भ साहित्य संघ**
>
> स्थापना : उमरावती येथे शालिवाहन शके
> १८४४ इ. स. १९२३ या वर्षी
>
> संस्थापक : बळवंत गणेश खापर्डे,
> प्रथम संमेलनाध्यक्ष : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
> कार्यक्षेत्र : वऱ्हाड आणि मध्यप्रदेश
>
> उद्देश : मराठी भाषा व साहित्य यांच्या
> अभिवृद्ध्यर्थ सर्व दृष्टीने प्रयत्न करणे

जुन्या कार्यकारिणीची बैठक

सकाळी हा कार्यक्रम आटोपल्यावर दुपारी ३–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्याच "प्रसाद" बंगल्यावर जुन्या पदाधिकाऱ्यांची सभा घेण्यात येऊन खालील निर्णय घेण्यात आले.

(१) विदर्भ साहित्य संघाचे पहिले आश्रयदाते श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांचा सत्कार, (२) श्री. ग. श्री. उर्फ नानासाहेब जोग यांची मंदिर समितीवर स्वीकृती, (३) विदर्भ साहित्य संघाचे बोध चिन्हास स्वीकृती.

विदर्भ साहित्य संघाचे १३ वे अधिवेशन अकोला येथे २८ व २९ एप्रिल रोजी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली अपूर्व थाटात पार पडले. स्वागताध्यक्ष विदर्भ केसरी ना. ब्रिजलाल बियाणी होते. सारेच कार्यक्रम वैभवशाली झाले. त्यांची फिल्मदेखील घेण्यात आली होती. नवनिर्वाचित संघाध्यक्षा प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांचे स्वाधीन संघाची सूत्रे करण्यात आली. स्वत: श्री. माडखोलकर हे संघाचे सरचिटणीस पदावर आले. याच कार्यकारिणीपासून प्रस्तुत लेखकाचा विदर्भ साहित्य संघाच्या कार्यात प्रवेश झाला.

पुष्करिणी व लोहकुटी

यानंतर थोड्याच अवधीत नागपूरचे दानशूर रसिक श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबूरावजी देशमुख यांनी विदर्भ साहित्य मंदिरासाठी एक थोरली विहीर बांधण्याचा संपूर्ण खर्च करण्याकरिता विदर्भ साहित्य

संघाला रु. २,५०० ची उदार देणगी श्रीमंत सौ. सत्यभामाबाई तथा माईसाहेब देशमुख यांच्या तर्फे देवविली. पुष्करणी तयार होत असतांनाच विदर्भ साहित्य संघाने स्वत:चे कार्यालय थाटण्याकरिता शेजारीच एक प्रशस्त "लोहकुटी" तयार केली. या स्वत:च्या लोहकुटीत कार्यकारिणीची पहिली सभा १६ सप्टेंबर १९५१ ला रविवारी झाली. या वेळपावेतो कार्यकारिणीच्या त्रैमासिक सभा संघाध्यक्षांच्या निवासस्थानीच होत होत्या.

गृहप्रवेश

गृहप्रवेशाचा मुहुर्त ९ जुलै १९५१ हा ठरला. त्रिविध कार्यक्रम आखला गेला. (१) पुष्करणीचे जलसंस्करण, (२) गृहप्रवेश व (३) वृक्षारोपण. या कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री. दामलेगुरुजी यांचेकडे सोपविले होते. सकाळी ८-१५ ला गृहप्रवेश करण्यात आला. गृहप्रवेशाच्या वेळी अग्रभागी हातात ताम्रकलश घेतलेल्या संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे, त्यांच्या दोन्ही बाजूंना हातात मंगलदीप व नैवेद्य असलेल्या सौ. विमलाबाई देशपांडे व सौ. सिंधुताई जोग, नंतर हातात सरस्वतीची मूर्ती घेतलेले उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, नंतर संघाचे धन चांदीच्या ताटात घेतलेले कोषाध्यक्ष बाळासाहेब ढवळे या पदाधिकाऱ्यांव्यतिरिक्त संघाचे आश्रयदाते श्री. ब्रिजलालजी बियाणी, न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती व त्यांच्या मागून पूर्वाध्यक्ष प्रा. दादासाहेब बनहट्टी, डॉ. भाऊसाहेब कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. नानासाहेब जोग, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, रा. पु. सगदेव अशी गृहप्रदक्षिणेची आयोजना करण्यात आली होती. प्रदक्षिणेनंतर आपल्या स्वत:च्या मालकीच्या टुमदार उभारलेल्या लोहकुटीत प्रवेश करण्यात आला. शेवटी मंत्रपुष्प होऊन सर्वांना प्रसाद वाटण्यात आला.

आजपर्यंत संघाच्या कोणत्याही सभा संघाध्यक्षांच्या घरी होत असत. पण गृहप्रवेशानंतर या लोहकुटीत त्या होऊ लागल्या व कार्यालयही त्यातच थाटण्यात आले.

धनिकांची व शासनाची मदत

पाहता पाहता मंदिर उभारणीच्या कार्याला जोर चढला. तीन लाखाची मंदिर योजना निश्चित केल्या गेली. विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीकरिता 'रुपयानिधी' नंतर श्रीमंत दामूअण्णा व सौ. सगुणादेवी देशमुख, पूर्णचन्द्रराव बुटी व बंधु, लो. टिळक पर्स फंड, गडकरी स्मारक समिती, संशोधन समिती अशा व्यक्ती व समित्यांकडून देणग्या प्राप्त झाल्या. त्याचप्रमाणे त्यावेळचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल, अर्थखात्याचे उपमंत्री ना. खं. उर्फ बाळासाहेब तिरपुडे यांनीसुद्धा मंदिराच्या बांधकामासाठी सढळ हाताने अनुदाने देण्यात तत्परता राखली व राज्यपुनर्रचनेच्या कालात शेवटले रु. साठ हजार संघाच्या हातात येताच मंदिरावर कळस चढला.

विश्वस्तमंडळ

चन्द्रपूर येथील १२ व्या अधिवेशनात नवनिर्वाचित संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी विदर्भ साहित्य संघासाठी "विदर्भ साहित्य मंदिर" उभारण्याचे ५ फेब्रुवारी १९५० रोजी घोषित केले. व १ मार्च १९५० रोजी मंदिराच्या जागेस त्यांनी स्वीकृती मिळविली. तडकाफडकी अमरावतीचे केन्द्रीय कार्यालय नागपुरात आणण्यात आले. संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर, सरचिटणीस श्रीमती शकुंतलाताई दिवाणजी, चिटणीस श्री. रा. पु. सगदेव आणि सल्लागार न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती व श्री. पु. य. देशपांडे, आमंत्रक श्री. बाळासाहेब ढवळे व श्री. ए. श्री. पटवर्धन प्रभृतींच्या कार्यदक्षतेने लवकरात लवकर मंदिर साकार झाले.

विश्वस्तमंडळ निर्माण समिती

आता हा वाढलेला निधी, समित्या व अन्य सर्व व्याप लक्षात घेऊन विश्वस्तांची निकड भासू लागली म्हणून विश्वस्तांची योजना करण्याकरिता इ. स. १९५२ मध्ये न्यायमूर्ती के. तु. मंगळमूर्ती त्यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघ केन्द्रीय कार्यकारिणीने एक समिती निर्माण केली ती अशी,

न्यायमूर्ती के. तु. मंगळमूर्ती,
डॉ. यशवंत खुशाल देशपांडे व
श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

या समितीने शिफारस केल्याप्रमाणे पहिल्या विश्वस्त मंडळावर खालील श्रेष्ठींना घेण्यात आले—

(१) बिहारचे राज्यपाल लो. माधव श्रीहरी उर्फ बापूजी अणे.

(२) न्यायमूर्ती श्री .केशव तुकाराम उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ती.

(३) डॉ. शं. दा. पेंडसे (पदसिद्ध विदर्भ साहित्य संघाध्यक्ष.)

उपरोक्त विश्वस्त आजीव या पदावर होते. ही प्रथा आजतागायत चालू असून या पहिल्या विश्वस्त मंडळानंतर डॉ. म. म. वा. वि. मिराशी, न्या मू. चंद्रशेखर धर्माधिकारी, अॅड. भाऊसाहेब बोवडे विश्वस्त मंडळावर होते. आजमितीस माजी न्यायमूर्ती श्री. एन्. एल्. अभ्यंकर, श्री. वामन शिवदास बार्रालिंगे आणि डॉ. मधुकर आष्टीकर (पदसिद्ध) हे वि. सा. संघाचे विश्वस्त आहेत.

विदर्भ साहित्य संघाचा प्रभाव

१९५१ मध्ये श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी स्वत: होऊन सरचिटणीसपदाची जबाबदारी अंगिकारिली व स्वतंत्र कार्यालय निर्माण केले. तेथे कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली. तेव्हापासून भाषा, साहित्य व कला यांचा प्रभाव विदर्भात सर्वत्र पडू लागला. अमरावती, अकोला, खामगाव, चन्द्रपूर, वर्धा, यवतमाळ, बुलढाणा, पुसद, भंडारा, गोंदिया व तुमसर वगैरे बृहन् विदर्भात संघाचे कार्य, शाखा, परीक्षा केन्द्र, शाखांचे वार्षिकोत्सव, व्याख्यानमाला, परिसंवाद, नाटके, संशोधन वगैरे साधनांनी स्वयंस्फूर्त तळमळीने सुरू झाले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात अभिमानास्पद कार्य होऊ लागले.

५

वि. सा. मंदिराचा पायाभरणी–समारंभ

मंदिरनिर्मीचा संकल्प एक लाखाचा होता. चोहो बाजूंनं सहाय्य होऊ लागले. विदर्भातील नाटयसंस्था, साहित्य मंडळे, संशोधन संस्था यांचे संघाशी संलग्नीकरण करण्यात आले. त्यावेळचे मध्यप्रदेश–वऱ्हाडचे मुख्यमंत्री ना. पं. रविशंकर शुक्ल यांच्या शुभहस्ते विदर्भ साहित्य मंदिराचा पायाभरणी समारंभ १९ ऑक्टोबर १९५२ रोजी समारंभाने करण्यात आला. मंदिरात (१) राम गणेश गडकरी यांचे स्मारक करण्याचे ठरले. (२) देणगीदारांचे व आश्रयदात्यांचेही कक्ष निर्माण करण्याचे ठरून त्यातून ग्रंथालय, संशोधन, कला यांच्या शाखा, उपशाखा चालविण्याच्या योजना आखण्यात आल्या. आणि या विदर्भ साहित्य मंदिराचे एकावर एक मजले चढू लागले. भाऊसाहेब माडखोलकर, अण्णासाहेब मंगळमूर्ती, नानासाहेब जोग यांच्या रात्रंदिवस परिश्रमाने मंदिराचा दर्शनी भाग उभा झाला.

मंदिर नामकरणाचा निरर्थक वाद

विदर्भ साहित्य संघाचे भव्य भवन उभे होताच या भव्य व सर्व सोयींनी सुसज्ज अशा सुन्दर भावनाला नाव काय द्यावे असा एक प्रश्न काही आगाऊ व अगांतुक तरुणांनी उपस्थित केला. हा वाद विशेषत: प्रा. बनहट्टींचे "समाधान" साप्ताहिक, श्री. माडखोलकरांचे "तरुणभारत" दैनिक व श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या "महाराष्ट्र" दैनिकातून काही दिवस चांगलाच गाजला. एकाने सुचविले होते, या भवनास "डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर भवन" असे नाव द्यावे तर काहींनी सुचविले होते, ही प्रादेशिक संस्था आहे तेव्हा हिला सर्वसमावेशक असे प्रादेशिकच नाव असावे. व या भव्य भवनातील कक्षांना दालनांना व सभागृहांना या प्रदेशात होऊच गेलेल्या थोर साहित्यिकांची, आश्रयदात्यांची नावे द्यावीत. आम्हीही त्यावेळी या वादात उडी घेतली होती व समाधानमधून या भवनास प्रदेशवाचक असे सर्वसंग्राहक–

"विदर्भ साहित्य मंदिर"

असे व्यापकच नाव असावे अशी बाजू मांडल्याचे स्मरते. या आमच्या मतास डॉ. ल. वा. पडोळे प्रभृतींनी उचलूनसुद्धा धरले होते. 'काकतालीयन्याया'ने शेवटी हेच नाव भवनावर झळकले व हा वाद जिथल्या तिथे विरला.

धार्मिक वास्तुप्रवेश

लौकिकदृष्टया साहित्यमंदिराचा भव्य उद्घाटन समारंभ व्हावयाचा असेल तेव्हा तो होईल, पण धार्मिक दृष्टया वास्तूप्रवेश व्हावयास पाहिजे असे एक मत श्रीमंत देशमुख दांपत्याकडून पुढे आले व इ. स. १९५४ च्या श्रीरामजन्मनवमीच्या शुभ मुहूर्तावर तो पारही पाडण्यात आला. मंदिराच्या उभारणीकरिता स्वयंस्फूर्त पहिली व सर्वात मोठी देणगी देणारे सौ. सगुणादेवी देशमुख (वाढोणेकर) यांनी इच्छा दर्शविल्यावरून हा समारंभ करण्यात आला. या गृहशांती विधीस लागणारा पाऊणशे रुपयांचा खर्चसुद्धा त्यांनीच केला. हा विधी त्यांचे पती श्रीमंत दामूअण्णा देशमुख यांच्या समवेत हौशीने साजरा केला गेला.

विदर्भ साहित्य मंदिराचे भव्य उद्घाटन

मधल्या १९५० नंतरच्या काळात श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (१९५०–५१), प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे (१९५१–५२), प्रा. डॉ. शंकर दामोदर पेंडसे (१९५२–५३), प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित (१९५३), व सा. भू. प्रि. हरि नारायण नेने (१९५४), हे या क्रमाने संघाध्यक्ष पदावर तळपून गेले. याच काळात विदर्भ साहित्य मंदिर उभे होताच संघाध्यक्ष प्रि. नेने यांच्या कारकीर्दीच्या आरंभीच या भव्य व देखण्या मंदिराच्या उद्घाटनाचा सुवर्णयोग सर्वांपुढे उभा ठाकला. अशा अपूर्व साहित्य भवनास उद्घाटकही तितक्याच तोलामोलाचा असावा ही सर्वांची महत्त्वाकांक्षा ! इच्छा आहे तेथे मार्ग सापडतोच. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती देशगौरव डॉ. बाबू राजेन्द्रप्रसाद यांनी मध्यप्रदेश हिन्दी साहित्य संमेलनाच्या मोर भवनाच्या उद्घाटनाचे निमंत्रण स्वीकारले होते. त्या निमित्ताने ते नागपूरला येणार होते. याशिवाय अन्य कार्यक्रमांचीही फार गर्दी होती. त्यांना वेळ मुळीच नव्हता. पण, "वेळ साधील तोच तोरण बांधील" या न्यायाने ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांची मध्यस्थी सफल होऊन मंगळवार दि. २७ एप्रिल १९५४ ला सकाळी ६–१५ चा रामप्रहर निश्चित झाला. सर्वत्र आनन्दी आनन्द उसळला.

राष्ट्रपतींचे आगमन

या ऐतिहासिक समारंभासाठी मंदिराची भव्य इमारत आणि तिचे प्रशस्त प्रांगण उत्कृष्ट रीतीने शृंगारलेले होते. मंदिराच्या (जवाहर मार्गावरील) प्रवेश द्वाराजवळ कुंकुमांकित मंगलघट दोन्ही बाजूंना ठेवलेले होते व प्रवेशद्वारापासून अंतर्भागापर्यंत दोन्ही बाजूंनी सुन्दर कलात्मक रंगीत रांगोळ्या रेखलेल्या होत्या. पहाटे पाच वाजल्यापासून श्री. धोंडीबुवा गायकवाड यांच्या मंजुळ सनईसह चौघड्यांचे निनाद वातावरणात दुमदुमत होते. मंदिराच्या पार्श्वभागी पश्चिमाभिमुख सुन्दर शामियाना उभारलेला होता. तो प्रातःकाळी सहाच्या सुमारालाच नगरातील व बाहेरील स्त्री–पुरुषांनी चिकार भरून गेला होता व त्या बाहेरही पटांगणात अनेक प्रेक्षक व श्रोते उभे होते.

भारताचे पहिले नागरिक राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद हे बरोबर ६–१५ वाजता मध्यप्रदेश वऱ्हाडचे राज्यपाल श्री. पट्टाभिसीतारामय्या आणि मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्यासह मंदिराच्या पूर्वेकडील केळींचे खांब आणि अशोक – आम्र – पल्लवाच्या तोरणांनी शृंगारलेल्या प्रवेशद्वारातून आत येताच स्टेट हेडक्वार्टर्स गर्ल्स गाईडच्या पथकाने "जनगणमन" हे राष्ट्रगीत वाजवून त्यांना मानवंदना दिली. विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारी विश्वस्त न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती यांनी त्यांचे सहर्ष स्वागत केले व प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस शिस्तीने उभे असलेले वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रि. ह. ना. नेने, पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. सौ. कुमावतीताई देशपांडे, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. भ. श्री. पंडित, आणि चालू कार्यकारिणीचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे, चिटणीस श्री. ल. वि. पांढरीपांडे, सा. भू. तु. ना. काटकर, श्री. व. बा. शव्दे व सदस्य प्रा. पां. कृ. सावळापूरकर, श्री. पां. वा. गडकरी, श्री. केशव केळकर, श्री. रा. पु. सगदेव, श्री. त्र्यं. द. देशमुख (पारवेकर), श्री. य. शं. धर्माधिकारी आणि गडकरी-स्मारक समितीच्या कार्याध्यक्ष कु. ताराबाई प्रधान व मंदिररचना समितीचे कार्यवाह श्री. ग. श्री. उर्फ नानासाहेब जोग यांच्याशी परिचय करून दिला. त्यावेळी राष्ट्रपतींनी प्रत्येकाशी हस्तांदोलन केले.

विदर्भ साहित्य मंदिराचे उद्घाटन

पुढे राष्ट्रपती मंदिराच्या पायऱ्या चढून वर आले. श्री. नानासाहेब जोग यांनी पुढे केलेल्या चांदीच्या तबकातील चांदीच्या कैंचीने महाद्वाराला लावलेले केशरी सूत्रातील तोरण कापून त्यांनी या भव्य साहित्य मंदिराचे उद्घाटन करताच स्वयंस्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटाने आसमंत दणाणून गेले. नंतर आत कार्यकारी विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांच्यासह राष्ट्रपती व्यासपीठावर येताच समोरील सर्व स्त्री–पुरुषांनी स्वयंस्फूर्त उत्थान देऊन पुनः टाळ्यांच्या गजराने त्यांचे स्वागत केले. समारंभाच्या सर्व भागाची माहिती ध्वनिवर्धकावरून उपस्थितांना देण्याची खास व्यवस्था नागपूर नभोवाणीच्या सहाय्याने करण्यात आली होती. व्यासपीठावर राष्ट्रपतींच्या डाव्या बाजूस राज्यपाल व मुख्यमंत्री व उजव्या बाजूस संघाध्यक्ष आणि गृहमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र बसले होते.

पुण्यश्लोक राष्ट्रपती डॉ. बाबू राजेन्द्रप्रसाद स्थानापन्न होताच संघाध्यक्ष श्री. हरिभाऊ नेने यांनी त्यांना पुष्पहार अर्पण केला. सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री व गृहमंत्री यांनां पुष्पहार अर्पण करताच संघाध्यक्ष श्री. नेने यांनी आपले स्वागतपर भाषण करून वेळात वेळ काढून साहित्य मंदिराचे उद्घाटन संपन्न केल्याबद्दल राष्ट्रपतींचे मन:-पूर्वक आभार मानले व शुभाशीर्वाद मागितला.

राष्ट्रपतींचा आशीर्वाद

"आज के यह ऐतिहासिक समारोह में शरीक होना मेरे लिए बड़ी प्रसन्नता की बात है। नागपूर का एक बहुत बडा स्थान है कि वह ठीक भारत के केन्द्र में पडता है। उत्तर जहाँ हिन्दी की प्रधानता है उससे मिला जुला है। पश्चिम में महाराष्ट्र है। महाराष्ट्र के अंतर ही मराठी है। और दक्षिण जहाँ दाक्षिणात्य आरंभ होता है तो वह भी यहीसे आरंभ होता है। एक तरफ तेलगू, दुसरी तरफ हिन्दी, कुछ हिस्से तक बंगाल के पासतक चला जाता है तो उसमें कोई आश्चर्य की बात नहीं। ऐसे एक केन्द्र को सब तरफ से उन्नत होना आवश्यक है। और यहाँ हवाई जहाज का जो अड्डा बन गया जहाँ चारों तरफ से हवाई जहाज आते है। बंबई से कलकत्ता चलो तब यहाँ, कलकत्तासे बंबई–मद्रास से दिल्ली चलो या दिल्ली से मद्रास–हर हालत में हवाई जहास से या रेलसे–यहाँ हमे उतरनाही पड़ता है। ठहरनाही पड़ता है। गुजरनाही पड़ता है। यह कृत्रिम नहीं है, स्वाभाविक है। इस केन्द्र यह स्थूल रुपसे जो महत्व है वैसेही सांस्कृतिक इतिहास में भी भाषा के इतिहास में भी नागपूर का वही एक केन्द्रका स्थान है। यहाँ पर जो कुछ है उसे उन्नत होना चाहिये। यह भारत का हृदय है। भारतीय सब भाषाओं की उन्नत्ति हो!

"मैं आप सब बहनों–भाईयों को धन्यवाद देता हूँ कि आपने मुझे मौका दिया कि आपसे मैं मिल सका। और इस समारोह में थोडी देर के लिए भी शरीक हो सका। जय हिन्द!!"

"वन्दे मातरम्"ने गोड शेवट

अंती येथील सुप्रसिद्ध गायिका सौ. कुसुमताई मोहनी यांनी आपल्या खड्या सुरेल आवाजात "वन्दे मातरम्" गीत म्हटल्यावर हा भव्य दिव्य वैशिष्टयपूर्ण ऐतिहासिक समारंभ समाप्त झाला.

समारंभाची नितान्तस्मृती

राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी आपले स्वत:चे सुन्दर छायाचित्र आजच्या उद्घाटनाच्या मंगल समारंभाचे संस्मरण म्हणून विदर्भ साहित्य संघाला भेट दिले. जे मंदिरात प्रवेशताच "बोधचिन्हा" चे वर दर्शनीय स्थळी लावण्यात आले आहे.

सुवर्णाक्षरांकित स्मृतीशिला

तसेच या ऐतिहासिक उद्घाटन समारंभाची चिरस्मृती म्हणून महाद्वाराच्या उजव्या बाजूस खालील सुवर्णाक्षरांकरित शिला दर्शनभागी बसविण्यात आली आहे–

॥ श्री ॥
विदर्भ साहित्य संघ
उद्घाटनाचा समारंभ
राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद
यांच्या हस्ते
मिति : मंगळवार चैत्र वद्य २, शके १८७६
दि. २७ एप्रिल १९५४
संघाध्यक्ष : श्री. हरि नारायण नेने

मंदिराचे समर्पण

नंतर मंदिर समितीचे आमंत्रक श्री. गणेश शिवराम उर्फ नानासाहेब जोग म्हणाले, "गेल्या तीन वर्षांत सर्वश्री भाऊसाहेब माडखोलकर, ए. श्री. पटवर्धन, बाळासाहेब ढवळे, पु. य. देशपांडे, न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्तींपासून ना. रा. शेंडेपर्यंत असंख्य व्यक्तींचे सढळ आर्थिक सहाय्य, निढळाचा घाम गाळणारे परिश्रम, हार्दिक सल्ला आणि सदिच्छा ही हे मंदिर आजच्या आकाराला येण्यास कारण झाली आहेत. विटेवर वीट रचली जात असताना ह्या महान घटनेची पाहणी मी करीत होतो. आज या मंदिराचा एक तृतीयांश भाग माझ्या हातावेगळा होत आहे. आजच्या आणि उद्याच्या साहित्यकारांच्या हाती तो आता पडत आहे. संकल्पाचे उदक सोडताना आपल्या राष्ट्रपतींसारख्या थोर पुरोहितांनी मंत्रोचार केला आहे. अशा ह्या भाग्याच्या प्रसंगी झालेली माझी मन:-स्थिती सुबुद्ध साहित्यिकांना निस्संशय कळू शकेल. शब्दापुढे शब्द रचून पूर्ण झालेला ग्रंथ हातावेगळा होत

असतानाची ही मन : स्थिती आहे. ह्या मंदिराचे ठिकाणी पावित्र्याची स्थापना करणे आणि त्याचे रक्षण करणे मी त्यांच्यावरच सोपवितो.

" विदर्भ साहित्य संघ " कार्यकर्त्यांच्या धडाडीमुळे आता ही केवळ प्रादेशिक संस्था राहिली नसून प्रदेशाच्या सीमा ओलांडून त्यांनी राष्ट्रीय पातळी गाठली आहे; हे आजच्या उद्घाटन सोहळ्यावरून सिद्ध झाले आहे.

संघाध्यक्षांच्या त्यागावर उभारलेले भवन

कै. श्री. हरि नारायण नेने यांनी १९५० मध्ये केलेल्या त्यागाच्या पायावर विदर्भ साहित्य मंदिराचे हे भव्य भवन आज उभे आहे असे म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती वाटत नाही. पण, दुर्दैवी कुयोग असा की वर्षाअखेर विदर्भ साहित्य संमेलनाध्यक्षाचे मयुरासनावर आरूढ होण्यापूर्वीच ते २२ नोव्हेंबर १९५४ रोजी थोडचा दिवसाच्या आजारात इहलोक सोडून गेले.

६

नवे संघाध्यक्ष : श्री. बाबासाहेब खापर्डे

हा लोक सोडण्यापूर्वीच हरिभाऊंनी अध्यक्षाचे सर्व अधिकार संघोपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचे स्वाधीन केलेले होते. घटना क्र. १४ (इ) प्रमाणे बाळासाहेबांनी ५ डिसेंबर १९५४ रोजी कार्यकारिणीची सभा बोलावून तीत श्री. बाळकृष्ण गणेश उर्फ बाबासाहेब खापर्डे यांची एकमताने संघाध्यक्षपदी निवड करण्यात आली. व पुढे त्यांचीच संमेलनाध्यपदावर निवड होऊन नागपूरचे १७ वे विदर्भ साहित्य संमेलन आणि इ. स. १९५५–५६ च्या निवडणुकीचा दिनांक योगायोगाने १९ फेब्रुवारी १९५५ हा एकच आला होता. याच १९५५ सालात १८ वे विदर्भ साहित्य संमेलनसुद्धा श्री. बाबासाहेब खापर्डे यांचेच अध्यक्षतेखाली तुमसर (जि. भंडारा) येथे राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांच्या उपस्थितीत २४ व २५ डिसेंबर १९५५ ला पार पडले. या संमेलनात राष्ट्रसंतांच्या "ग्रामगीते"चे प्रकाशन संमेलनाध्यक्षांच्या हस्ते होऊन ग्रामगीतेवर प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. श्री. ना. वनहट्टी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित प्रभृतींची समीक्षात्मक भाषणे झाली होती. महाराजांनी कार्यकारिणीच्या सर्व सभासदांना व पदाधिकाऱ्यांना "नित्य पाठासाठी" म्हणून एक एक ग्रामगीतेची प्रत भेट दिली होती.

न्यायमूर्तींची भीष्मप्रतिज्ञा

नागपूर येथील संमेलनात स्वागतपर भाषण करतांना स्वागताध्यक्ष न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती प्रतिज्ञा करून गेले : "गेल्या वर्षी वि. सा. संघाचे प्रमुख असे एक तृतीयांश कार्य पार पडले. अजून दोन तृतीयांश काम व्हावयाचे आहे. सामुदायिक शक्तीच्या जोरावर हे काम पूर्ण करू. ते पूर्ण झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. अजून मायभाषेची सेवा फार मोठचा प्रमाणात करावयाची आहे. हे काम चालू असताना कित्येक रात्री मी येथे घालविल्या आहेत. हे प्रचंड काम पूर्ण झाले नाही तर मी छाती फुटून मरेन. देशाचे भवितव्य साहित्यिकच घडवू शकतो. याचा विचार साहित्यिकांनी केला पाहिजे."

तीन वर्षांची कार्यकारिणी

१९ जानेवारी १९५६ च्या विशेष सर्वसाधारण सभेत एक वर्षाच्या कार्यकालात योजलेले कार्य कार्यकारिणीला पूर्ण करणे अशक्य होते, म्हणून कार्यकारिणीचा कार्यकाल कमीत कमी तीन वर्षांचा करण्यात यावा असा ठराव विस्तृत चर्चेनंतर अविरोध संमत करण्यात आला. त्यामुळे दर वर्षीच्या निवडणुकावरील लक्ष उडून ते कार्यावर केंद्रित झाले.

या नंतर याच वर्षात निवडणूक होऊन २१ फेब्रुवारी १९५६ रोजी संघाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर उर्फ बाळासाहेब ढवळे आपल्या पॅनलसह १९५६–५७ ते १९५८ ते ५९ करिता निवडून आल्याचे निवडणूक अधिकारी श्री. मु. ह. मुंजे यांनी घोषित केले.

वि. सा. संघ–रंगमंदिर शुभारंभ

साहित्य मंदिरानंतर रंगमंदिरावर सर्व साहित्यिक श्रेष्ठींचे लक्ष एकवटले. संघाध्यक्षापासून सभासदांपर्यंतच्या स्वाक्षऱ्यांनी " रंगमंदिर निधीला सहाय्य करा ! " पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. वि. सा. संघाच्या रंगमंदिराच्या बांधकामाचा शुभारंभ वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर गुरुवार दि. १२ एप्रिल १९५६ रोजी मध्यप्रदेशाचे स्थानिक स्वराज्य मंत्री ना. पु. का. देशमुख यांच्या शुभहस्ते थाटाने संपन्न झाला. २० एप्रिल १९५६ रोजी रंगमंदिर समितीची सभा समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती यांचे

अध्यक्षतेखाली भरली. त्यामध्ये एक उपसमिती निर्माण करण्यात येऊन तिचे उपाध्यक्ष श्री. रा. वि. काळीकर व सदस्य इंजिनियर श्री. य. अ. खरे व श्री. मणीलाल एच्. पटेल आणि श्री. नानासाहेब जोग यांनी या बांधकामाची व्यवस्था पहावी असे एकमताने ठरले.

कोनशिलेची प्रतिष्ठापना

१८ ऑक्टोबर १९५६ रोजी भारत सरकारचे भूतपूर्व अर्थमंत्री व युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिटीचे अध्यक्ष श्री. चिंतामण द्वारकानाथ देशमुख यांचे हस्ते साहित्य मंदिराच्या पार्श्वभागी उभारलेल्या शामियान्यात थाटा-माटात रंगमंदिराचा कोनशिला प्रतिष्ठापना समारंभ भव्य स्वरूपात पार पडला. ती कोनशिला–

> ।। श्री ।।
> **विदर्भ साहित्य संघ**
> रंगमंदिराची कोनशिला स्थापना
> जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ
> श्री. चिंतामण द्वारकानाथ देशमुख
> यांच्या हस्ते
> मिति : गुरुवार आश्विन शुद्ध १४
> शके १८७८
> दिनांक १८ ऑक्टोबर १९५६
> संघाध्यक्ष : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

यानंतर संकल्पित रंगमंदिराची कल्पना देणारे श्री. नानासाहेब जोग यांचे विस्तृत भाषण झाले.

रंगमंदिराची उभारणी

या संकल्पित रंगमंदिराच्या उभारणीकरिता साहित्यश्रेष्ठींच्या वजनाने मध्यप्रदेश शासनाकडून ५० हजार व नव्या मुंबई राज्य शासनाकडून ५० हजार अनुदान प्राप्त झाले. या कार्यास मुख्यमंत्री श्री. यशवंत-राव चव्हाण व समाजकल्याण मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे यांनी आस्थापूर्वक सहाय्य दिले, त्याबद्दल विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. मदतीकरिता काही नाट्यप्रयोगही करण्यात आले. परंतु ह्या सर्वात अभि-मानाची गोष्ट ही आहे की मंदिरनिधीमधील फार मोठी रक्कम विदर्भातील गरीब व मध्यमवर्गीय जनतेने दिलेल्या एक रुपया, दोन रुपये, पाच रुपये अशा लहान लहान देणग्यातून जमा झाली आहे. वि. सा. संघाचे हे अद्यावत रंगमंदिर खऱ्या अर्थाने वैदर्भीय जनतेने आपल्या घामातून निर्माण केले आहे. बांधकाम चालू असताना प्रत्येक वीट कशी बसविली जाते ह्यात श्री. नानासाहेब जोग जातीने लक्ष घालीत असत. शेवटी शेवटी तर रंगमंदिराच्या जागेतील एक खोलीच त्यांनी आपले चोवीस तासाचे निवासस्थान बनविली होती. नाना म्हणजे रंगमंदिर व रंगमंदिर म्हणजे नाना असे हे समीकरण होऊन बसले होते. हाती आलेला पैसा कमी पडल्याने ते व्यथीत होते.

रंगमंदिराच्या योजनेत रंगमंच आणि प्रेक्षागृह हे दोन भाग मुख्य असल्यामुळे त्यांच्या उभारणीसाठी पैसा अपुरा पडला. तेव्हा त्यांच्या उभारणीसाठी मोठ्या देणगीची आवश्यकता होती. ही बाब लक्षात घेऊन मंदिर रचना समिती आणि श्री. नाना जोग यांनी एक-मताने असे निर्धारिले की, ५० हजार रुपयांची देणगी देणाऱ्या उदारधी दात्याचे नाव या रंगमंदिराला द्यावे व त्या दृष्टीने देणगी मिळविण्याचे प्रयत्न जारीने सुरू झाले. तरीपण अशी मोठी देणगी मिळण्याचे सुचिन्ह दिसेना.

रंगमंदिरावर वज्राघात

हे निकराचे प्रयत्न चालू असतानाच थोर नाटक-कार, श्रेष्ठ रसिक व वि. सा. संघ रंगमंदिराचे प्राण **श्री. गणेश शिवराम उपाख्य नानासाहेब जोग** यांचे अकस्मात १ मे १९५८ रोजी सकाळी ७·५० वाजता हृदयाक्रिया बंद पडून दुःखद निधन झाले. रंगमंदिरावर वज्राघात झाला. पण या बलीदानातच धनवटे कुटुंबि-यांच्या दातृत्व भावनेला सत्प्रेरणा मिळाली. आणि त्यांनी ५१ हजाराची उदार देणगी देण्याचा निर्णय तत्काल घेतला. नानासाहेबांच्या इच्छेनुसारच कार्यकारी विश्वस्तांनी लगेच ' विदर्भ साहित्य संघाचे धनवटे रंग-मंदिर ' हे नाव जाहीर केले.

श्री. अण्णिगेरींचा निर्धार


नानासाहेब गेले ते आपल्या अंतःकरणातील ज्योत दुसऱ्याच्या अंतःकरणात पेटवूनच ! त्यांच्या अंत्य-विधीच्या सभेतच श्री. बाळासाहेब अण्णिगेरी यांनी घोषणा केली की, " हे रंगमंदिर पूर्ण करण्याचा मी माझी सर्व शक्ती पणाला लावून प्रयत्न करीन." आणि आपले हे शब्द त्यांनी तितक्याच दायित्वाने व करारी-बाण्याने पूर्ण केले.



वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिराचे शिल्पकार स्व. नाना जोग यांचा अर्धपुतळा व पुष्करिणी

अनुक्रमणिका





वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिर बाहेरून आणि आतून

म्हणूनच या रंगमंदिराचे खरे श्रेय या दोन कलावंतांनाच द्यावयास पाहिजे.

पुढे पाहता पाहता रंगमंदिर पूर्ण झाले.

विदर्भ साहित्य संघ धनवटे रंगमंदिराचा उद्घाटनसमारंभ

नानांच्या प्रयाणानंतर केवळ सात महिन्यांनीच मंदिराच्या उद्घाटनाचा शुभयोग आला. तो शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर १९५८ दिवस विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे.

यावेळी साहित्यमंदिरासह रंगमंदिर विद्युद्दीपांनी लखलखत होते. व्यासपीठावर उद्घाटक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण, विश्वस्त लोकमान्य डॉ. बापूजी अणे, न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती, संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, श्रीमती सिंधुताई जोग, पूर्वाध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि श्रीमंत बाबूराव धनवटे व मारुतीराव धनवटे विराजिले होते.

प्रारंभी "अर्पुनी हे भावसुमन" हे स्वागतगीत होताच रंगमंदिर समितीचे चिटणीस श्री. श्री. गु. तथा बाळासाहेब अण्णिगेरी हे रंगमंदिराच्या बांधकामाचा इतिहास निवेदन करतांना म्हणाले : "ह्या रंगमंदिराच्या कणाकणावर कै. नाना जोगांचे नाव कोरले आहे." नंतर उद्घाटक ना. यशवंतराव चव्हाण यांनी श्रीमंत बाबूराव व मारुतीराव धनवटे यांना पुष्पहार अर्पण करून त्यांचा सत्कार केला व उद्घाटनाच्या "शिलापटा"वरील पडदा दूर करून वि. सा. संघ धनवटे रंगमंदिराचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले.

थोरांचे शुभसंदेश

या इतिहासप्रसिद्ध समारंभास आलेले शुभसंदेश सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी समारंभसमयी वाचून दाखविले. त्यातील प्रमुख : भारताचे उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन, मध्यप्रदेशाचे राज्यपाल श्री. हृ. वि. पाटसकर, पंजाबचे राज्यपाल श्री. न. वि. गाडगीळ, ओरिसाचे राज्यपाल श्री. सुखटणकर, भारत सरकारचे कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. पट्टाभिसीतारामय्या, मुंबई राज्याचे समाजकल्याण मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे, श्री. आ. रा. देशपांडे व सौ. कुसुमावती देशपांडे, श्री. मामा वरेरकर, रँगलर र. पु. परांजपे, प्रा. अनंत काणेकर, प्रा. अ. का. प्रिरोळकर प्रभृती शेकडो चाहत्यांचे संदेश आले होते.

ना. यशवंतराव आपल्या चव्हाण उद्घाटनाच्या भाषणात म्हणाले : "विदर्भ साहित्य संघाने उभारलेल्या ह्या रंगमंदिरासारखे नाटचगृह पुणे-मुंबईसारख्या शहरातही नाही ही गोष्ट नागपूरकरांना खास अभिमानाची आहे. रंगमंदिरातील "मंदिर" ह्या औचित्यपूर्ण शब्दामागे पावित्र्याची भावना आहे व ही भावना टिकविण्याची जबाबदारी संघावर आहे. जीवनात केवळ आर्थिक विकास होऊन चालत नाही. त्याला सांस्कृतिक विकासाची जोड हवी. ह्या संस्थेच्या द्वारे मराठी जीवनाचा सांस्कृतिक विकास घडून येईल, अशी आशा मी व्यक्त करतो." शेवटी शासकीय मदतीबरोबरच खाजगी देणग्याही ह्या रंगमंदिराला मिळाल्या ह्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

कै. नानांच्या तैलचित्राचे अनावरण

नंतर मुख्यमंत्री ना. चव्हाण यांच्या हस्ते कै. नानासाहेब जोग यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले व तैलचित्राला विदर्भ साहित्य संघ आणि कै. जोग यांचे नातलग श्री. चक्रदेव यांचेतर्फे हार अर्पण करण्यात आला. ह्याच वेळी तैलचित्रावर वरून पुष्पवृष्टी झाली.

शेवटी श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी आभार मानल्यावर "वन्देमातरम्" होऊन हा नागपूरच्या साहित्यसृष्टीतील अभूतपूर्व अविस्मरणीय आणि हृदयस्पर्शी समारंभ समाप्त झाला.

रंगमंदिरातील पहिले नाटक

रात्री ९-३० वाजता या अद्यावत रंगभूमीवर कै. नानासाहेब जोग-कृत "**सोन्याचे देव**" ह्या नाटकाचा प्रयोग नागपूर नाटच मंडळातर्फे सादर करण्यात आला. हा प्रयोग विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांकरिता व देणगीदारांकरिता विनामूल्य ठेवण्यात आला होता. ह्या नाटकात श्री. सखारामपंत जोशी, श्री. म. ना. परांजपे, श्री. प्रा. रत्नपारखी, सौ. अनसूयाबाई वाडेगावकर, कु. जोशी, श्री. बबन भांबूरकर यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या.

अज्ञानी वादाचे सज्ञानी समर्थन

विदर्भ साहित्य मंदिर उभे होताच जसा त्याच्या नावाबद्दल निरर्थक वाद काही संघापासून दूर असलेल्या तरुणांनी निर्माण केला होता; तसाच वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिर पूर्ण झाल्यावर मुंबई येथील "मौज"

साप्ताहिकामधून नागपूरचे श्री. बाळकृष्ण देशपांडे यांनी "धनवटे रंगमंदिर का ?" असा वाद १८ मे १९५९ ला सर्वप्रथम उपस्थित केला. त्यास श्री. चंद्रशेखर फडणीस यांनी उचलून धरले व १ जून १९५९ च्या मौजमधून प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी समर्थन केले. त्यांचे म्हणणे "नागपूरच्या रसिक जनतेने जोग व धनवटे या दोघांच्याही त्यागाबद्दल व सेवेबद्दल न्याय्य आदर दाखविण्यास शिकले पाहिजे." असा निःपक्षपाती तृतीयपंथी दृष्टिकोनातून यांनी प्रांजळ सल्ला दिला होता.

शेवटी त्याच मौजेच्या १२ सप्टेंबर १९५९ च्या अंकातून संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी कै. नानासाहेब जोग यांची अंतिम इच्छा व त्यांच्या बलीदानातून श्रीमंत दादासाहेब धनवटे यांचे उदार दातृत्व यांचे मंडण करून वाद उपस्थितांचे व त्यास उचलून धरणारांचे खंडण करून या व्यर्थ वादास मूठमाती दिली.

८

कै. नानासाहेब जोग यांचे स्मारक

नागपूरची कलाप्रेमी जनता धनवटे व जोग या दोघांचीही ऋणी आहे. रंगमंदिराला धनवटे यांचे नाव देऊन त्यांची अंशतः फेड केली आहे तर त्याच रंगमंदिराच्या प्रांगणात कै. गणेश शिवराम उर्फ नानासाहेब जोग यांचा ब्राँझचा अर्धपुतळा उभारून त्यांच्याही ऋणाची चिरस्मृती कायम ठेवली आहे.

२६ ऑगस्ट १९६० गणेश चतुर्थी हा कै. नानासाहेबांचा ६० वा जन्मदिवस! या दिवशी सकाळी ६ वाजता विदर्भ साहित्य मंदिरासमोर ब्राँझचा अर्धपुतळा बसविण्यात आला व वि. सा. संघाचे कार्यकारी विश्वस्त न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती यांच्या शुभ हस्ते पुतळ्याचे अनावरण टाळ्यांच्या गजरात करण्यात आले.

यावेळी नागपूर नाट्य मंडळ, रंजनकला मंदिर आणि नागपूर साहित्य सभा, विदर्भ संशोधन मंडळ या संस्थांच्या वतीने नानांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पिण्यात आले. सुरुवातीला श्री. बाळासाहेब ढवळे यांनी प्रास्ताविक भाषण केले व कै. नाना जोग स्मारक निधीला मदत करणाऱ्या दात्यांपैकी २५ रु. चे वर देणग्या देणाऱ्यांची नावे वाचून दाखविली.

नंतर न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती, भाऊसाहेब माडखोलकर, ह. ना. वैद्य, पु. व्यं. दारव्हेकर यांची नानांच्या गुणगौरवपर भाषणे झाली. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी समारंभाचा समारोप केला. शेवटी श्री. बाबूराव चिमोटे यांनी या पुतळ्याचे शिल्पकार पुणे येथील श्री. प. वा. केळकर यांचे व जोग स्मारक निधीला सहाय्य करणारे दाते आणि उपस्थितांचे आभार मानल्यावर हा समारंभ संपला. या पुतळ्यास पाच हजार रु. खर्च आला.

९

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

नागपूरचे प्रसिद्ध उद्योगपती श्रीमंत पुरुषोत्तम बाळकृष्ण काळे, यांच्या धर्मपत्नी व सुविख्यात देशसेविका सौ. अनसुयाबाई काळे ह्या म. गांधी युगातील सामाजिक व राजकीय काँग्रेस नेत्या होत्या. त्या १३ आगस्ट १९५८ रोजी बंगलोर येथील मेडिकल हॉस्पिटलमध्ये थाम्बासिस ऑफ दि ब्रेनच्या आजारात कैलासवासी झाल्या. त्या सच्च्या देशभक्त होत्या. देशाच्या स्वातंत्र्यासाठीच त्यांनी आपले संपूर्ण जीवन वेचले होते. त्यांच्या पवित्र देशसेवेच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रीमंत पु. बा. काळे यांनी वि. सा. संघाच्या "श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयासाठी" रु. तेवीस हजारांची उदार देणगी दिली. या ग्रंथालयाचा आराखडा असा होता. एकूण क्षेत्रफळ ६,४३१ चौ. फूटामध्ये (१) पुस्तक विभाग, (२) नियतकालिके विभाग, (३) त्वरित संदर्भ विभाग, (४) ६,००० ग्रंथ ठेवण्याची कपाटे, (५) अध्ययन कक्ष (आठ खोल्या), (६) परिसंवाद कक्ष (सोळा जागा), (७) ग्रंथपाल कार्यालय, (८) नूतन ग्रंथ कक्ष, (९) पुस्तक बांधणी विभाग व (१०) श्री शिवाजी महाराजांचा पुतळा.

बांधकामाचा मुहूर्त

या ग्रंथालयाच्या बांधकामाचा शुभारंभ मुहूर्त शुक्रवार दि. १२ आगस्ट १९६० रोजी सकाळी ८–३० वाजता श्रीमंत पु. बा. काळे यांचे हस्ते विदर्भ साहित्य मंदिरात करण्यात आला. पूजाविधी झाल्यावर संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी प्रस्तावना स्वरूप भाषण केले. त्यानंतर श्रीमंत काळे यांनी आपल्या भाषणातून सौ. अनसूयाबाई काळे यांच्या देशसेवेच्या स्मरणार्थ हे वि. सा. संघाचे श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय प्रदीर्घ काळ जनमानसात राहो! अशी इच्छा व्यक्त केल्यावर न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व तरुणभारतकार श्री.

भाऊसाहेब माडखोलकर यांचीही अशीच शुभेच्छादर्शक भाषणे झाली. शेवटी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी आभार व्यक्त केल्यावर प्रसाद होऊन हा छोटासा पण गोड समारंभ समाप्त झाला. पुढे १९६३–६४ मध्ये या ग्रंथालयास केंद्रीय शासनाकडून रु. ३२ हजाराचे अनुदानही प्राप्त झाले.

हल्ली या संदर्भग्रंथालयातील ग्रंथांची संख्या सुमारे दहा हजार आहे.

श्रीशिवाजी शलाकाशिल्पाचे उद्‌घाटन

पुढे इ. स. १९७४ ते १९७७ या श्री. अ. रा. देशपांडे अनिल यांच्या संघाध्यक्षीय कारकिर्दीत वि. सा. मंदिराच्या दर्शनीभागावर संस्थेचे बोधचिन्ह व श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयासमोर श्रीशिवछत्रपतींच्या शलाकाशिल्पाचे मनमोहक व अभिनव कलाकुसरीचे काम झाले. या शिल्पाचे उद्‌घाटन वर्तमान राष्ट्रपती सरदार श्री. ग्यानी झैलसिंह यांनी पंजाबचे मुख्यमंत्री असताना १७ ऑक्टोबर ७७ रोजी केले. वि. सा. संघाचे मानचिन्ह व शिवछत्रपतींचे शलाकाशिल्प श्री. अनिल मनोहर संवत्सर व सौ. नील अनिल संवत्सर यांनी श्री. विलास बजरंग भिंगारदिवे, श्री. मनीरामजी विश्वकर्मा (मिस्त्री), श्रीराम मोतीराम राऊत व शामराव दिनाजी खाणकुरे (अपंग कारागिर) यांच्या सहाय्याने नागपूरच्या अपंग सेवा उद्योग कार्यालयात बनविले.

मुंबईत विदर्भ साहित्य भवन

इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यावर विदर्भ साहित्य संघाशी घनिष्ट संबंध असलेले त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे बांधकाममंत्री ना. मा. सां. उर्फ दादासाहेब कन्नमवार यांच्याशी संधान बांधून मुंबई नगरात विदर्भ साहित्य मंडळ स्थापन करावे व त्यांच्याकरिता हक्काचे विदर्भ साहित्य भवन उभारले जावे असा एक सुविचार पुढे आला होता. त्याप्रमाणे मलबार हीलवरील दादासाहेबांच्या 'उद्यान' बंगल्यावर २४ जुलै १९६२ रोजी एक सभा बोलविण्यात आली. या सभेस वि. सा. संघातर्फे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व सौ. सुमतीदेवी धनवटे ह्या उपस्थित होत्या. त्यांनी या औचित्यपूर्ण निर्णयाचे या सभेतच स्वागत केले. या कार्यास मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचाही आशीर्वाद होता.

पण, १९६३ मध्येच अकल्पितपणे दादासाहेब हा लोक सोडून गेले आणि हा प्रश्न मागे पडला, तो कायमचाच ठरला, असे म्हणण्यास सध्या तरी काही हरकत नाही.

साहित्य मंदिरातील साहित्यिक स्मृती

२७ एप्रिल १९५४ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्ते मंदिराचे उद्‌घाटन झाले. त्याच दिवशी त्यांच्या छायाचित्राची पहिली देणगी त्यांच्याकडून या संस्थेस प्राप्त झाली. त्यानंतर श्रीमंत बाबूराव जी देशमुख व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सत्यभामाबाई उर्फ मायी यांची छायाचित्रे, नंतर दामूअण्णा देशमुख व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सगुणादेवी यांची छायाचित्रे, गडकरी हॉलमध्ये श्री. राम गणेश गडकरी "गोविंदाग्रज", प्रा. ना. के. बेहेरे, संघसंस्थापक कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे यांची छायाचित्रे लावण्यात आली. १८ जाने. १९६१ रोजी म. ज्योतीराव फुले यांच्या तैलचित्राचे ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते अनावरण झाले. तर श्रीमंत के. बालमुकुंद यांनी दिलेल्या देणगीतून कै. के. चिरंजीवराव दालानाचा उद्‌घाटन समारंभ न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती यांचे हस्ते झाला. ६ डिसेंबर १९६२ रोजी डॉ. भी. रा. उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केले.

१४ जानेवारी १९६२ रोजी चित्रशाळेचे (आर्ट गॅलरी) उद्‌घाटन चित्रकला महाविद्यालयाचे प्रा. वसंतराव देहाडराय यांचे हस्ते झाले. या समारंभाचे आमंत्रक श्री. दि. के. मनोहर तर सहआमंत्रक मधुकर पारळकर होते. १५ मार्च १९६२ रोजी रावसाहेब स्व. गं. म. ठवरे यांच्या तैलचित्राचे अनावरण श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे हस्ते पार पडले.

१५ जून १९६३ रोजी प्रसिद्ध "संदेश"कार श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या छायाचित्राचे अनावरण लो. बापूजी अणे यांच्या हस्ते न्या. मू. भवानीशंकर नियोगी यांच्या हस्ते झाले.

२७ डिसेंबर १९६५ लोकनायक डॉ. माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे यांच्या तैलचित्राचे अनावरण केन्द्रीय रेल्वे मंत्री ना. स. का. पाटील यांनी केले. तर ७ सप्टेंबर १९६९ रोजी श्रीमंत पु. बा. काळे व

सौ. अनसूयाबाई काळे यांच्या छायाचित्रांचे अनावरण बॅ. शेषरावजी वानखेडे यांच्या हस्ते पार पडले. "ज्ञानकोश"कार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या तैलचित्राचे अनावरण मुंबईचे चित्रकार श्री. नी. म. केळकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे होते.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात डॉ. य. खु. देशपांडे अभ्यासिकेचे उद्घाटन २७ नोव्हेंबर १९७१ रोजी कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते झाले. व नटवर्य केशवराव दाते यांच्या तैलचित्राचे अनावरण श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते संपन्न झाले तर डॉ. द. रा. गोमकाळे यांच्या छायाचित्राचे अनावरण १३ मे १९७२ रोजी डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते पार पडले. तसेच श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या छायाचित्राचे अनावरणही झाले.

१४ जानेवारी १९७६ ला न्यायमूर्ती भा. अ. मासोदकर यांच्या हस्ते वि. सा. संघाचे कार्यकारी विश्वस्त न्यायमूर्ती के. तु. उपाख्य अणासाहेब मंगळमूर्ती यांच्या छायाचित्राचे अनावरण झाले.

१०

रंगमंदिरानंतरची प्रगतीपर वाटचाल

इ. स. १९५८ नंतर सात संघाध्यक्षांच्या कारकीर्दीत चौदा साहित्य संमेलने झाली आहेत. **संघाध्यक्ष :** श्री. ना. रा. शेंडे (१९५९ ते ६२), श्री. अ. रा. देशपांडे उर्फ कविवर्य 'अनिल' (१९६२ ते ६५), प्रा. वा. कृ. चोरघडे (१९६५ ते ६८), श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (१९६८ ते ७१) दुसऱ्यांदा, खास त्यांचे गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाकरिता संघाध्यक्षपदावर आले होते. श्री. दि. ब. पंडित, (१७ नोव्हेंबरला निधन) – डॉ. वि. भि. कोलते (१९७१ ते ७४), श्री. अ. रा. देशपांडे, दुसऱ्यांदा (१९७४ ते ७७) आणि प्रा. डॉ. मधुकर आष्टीकर (१९७७ ते १९८३ दोन कारकीर्दी)

संमेलनाध्यक्ष : यवतमाळ : १९५८ : श्री. अ. रा. देशपांडे, तळोधी (बाळापूर) : १९५९ : प्रा. यादव मुकुंद पाठक, सावरगांव–डुकरे १९६० श्री. ना. रा. शेंडे; नागपूर : १९६१ कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णासहेब खापर्डे हे विदर्भ साहित्य संघाचे २३ वे अधिवेशन २९ व ३० एप्रिल १९६१ रोजी पार पडले. स्वागताध्यक्ष संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व उद्घाटक पंजाबचे राज्यपाल श्री. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ होते. या संमेलनास प्राचार्य सोनोपंत दांडेकर उपस्थित होते. एवढेच नव्हे तर रात्री त्यांचे वारकरी कीर्तनही झाले होते. वाशिम (वत्सगुल्म) १९६१ : म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास. ३० व ३१ डिसेंबर रोजी झाले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. रां. गो. तथा अण्णासाहेब डबीर व उद्घाटक मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. ह. वि. पाटसकर होते. पुसद : २५ वे रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलन. २५ ते २८ डिसेंबर १९६४ ला प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली झाले. या संमेलनाचे उद्घाटक ना. यशवंतराव चव्हाण होते तर प्रदर्शनीचे उद्घाटक मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक व स्वागताध्यक्ष प्राचार्य प्र. वा. उर्ध्वरेषे होते. संमेलनानंतर येथून माहूरची सफरही साहित्यिकांनी केली होती. काटोल : येथे १७ व १८ डिसेंबर १९६६ रोजी २६ वे वि. सा. संमेलन प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. मुख्यमंत्री ना. नाईक एकाएकी आजारी झाल्याने महाराष्ट्राचे अर्थमंत्री बॅ. शेषराव वानखेडे यांनी या संमेलनाचे उद्घाटन केले होते. स्वागताध्यक्ष आमदार जीवनलाल चांडक होते. वर्धा येथे २५ व २६ नोव्हेंबर १९६७ रोजी २७ वे वि. सा. संमेलनाध्यक्ष श्री. पु. भा. भावे यांचे अध्यक्षतेखाली झाले. यांचे संमेलनाध्यक्षीय भाषण स्वयंस्फूर्त होते त्यामुळे ते अनुपलब्ध आहे. या संमेलनाचे उद्घाटक कविवर्य ग. दि. माडगूळकर होते. आणि स्वागताध्यक्षय श्री. रामेश्वर बजाज हे होते. आर्वी : येथे १४ व १५ फेब्रुवारी १९७० रोजी २८ वे वि. सा. संमेलन प्रसिद्ध लोकवाङ्मय संग्राहक श्री. शं. ग. सुरडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या संमेलनाचे उद्घाटक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक होते. वणी : २५ ते २७ डिसेंबर १९७० रोजी २९ रोजी २९ वे वि. सा. संमेलन जानपद गीतांचे वैदर्भीय कवी श्री. पां. श्रा. गोरे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. स्वागताध्यक्ष तत्कालीन राज्यमंत्री ना. त्र्यं. द. उपाख्य आबासाहेब देशमुख (पारवेकर) तर उद्घाटक महाराष्ट्र विधान सभेचे सभापती श्री. बाळासाहेब भारदे होते. सोमनाथ येथे ३० वे, साहित्य संमेलन १८ व १९ नोव्हें. १९७२ रोजी

अनुक्रमणिका

॥ अध्यक्ष ॥

प्रथम अध्यक्ष



स्व. केशवराव कोरटकर
(१९२३-३७)



स्व. लोकनायक बापूजी अणे
(१९३७-४४)



स्व. श्री. ना. वनहट्टी
(४४-४५)



स्व. य. खु. देशपांडे
(४५)



श्री. पु. य. देशपांडे
(४५-४६)



डॉ. वि. भि. कोलते
(१९४६-४८, ७२-७४)



स्व. मा. गो. देशमुख
(४९-५०)



स्व. ग. त्र्यं. माडखोलकर
(५०-५१, ६८-७१)



स्व. सौ. कुसुमावती देशपांडे
(५१-५२)

अनुक्रमणिका






स्व. शं. दा. पेंडसे (१९५२-५३)

स्व. भ. श्री. पंडित (५३-५४)

स्व. ह. ना. नेने (५४)

श्री. पु. दि. ढवळे (५६-५९)






श्री. ना. रा. शेंडे (१९५९-६२)

श्री. वा. कृ. चोरघडे (६५-६८)

स्व. दि. व. पंडित (७१-७२)

स्व. आ. रा. देशपांडे (६२-६५, ७४-७७)



आजचे अध्यक्ष

॥ अध्यक्ष ॥

डॉ. मधुकर आष्टीकर (१९७७ पासून)

सुविख्यात कादंबरीकार श्री. विश्राम बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली निसर्गदत्त वातावरणात संपन्न झाले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते महर्षि बाबासाहेब आमटे तर उद्घाटक प्रा. नरहर कुरुंदकर होते. **उमरखेड :** प्रा. शरच्चन्द्र टोंगो यांच्या अध्यक्षतेखाली हे ३१ वे वि. सा. संघाचे अधिवेशन ८, ९ व १० मार्च १९७५ रोजी पार पडले. उद्घाटक डॉ. वि. भि. कोलते व स्वागताध्यक्ष श्री. ब. ना. एकबोटे. **अचलपुर :** ६, ७ व ८ फेब्रुवारी १९७६ रोजी प्रा. डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली हे ३२ वे विदर्भ साहित्य संमेलन संपन्न झाले. उद्घाटक अर्थमंत्री मधुकरराव चौधरी व स्वागताध्यक्ष भय्यासाहेब देशमुख होते. वि. सा. संघाचे जनक कविभूषण प्रा. ब. ग. तथा अण्णासाहेब खापर्डे यांचे २५ जून १९७७ ला दुःखद निधन झाले. भंडारा येथे ३३ वे संमेलन ४ जून १९७८ रोजी वणी येथील लो. टिळक महाविद्यालयाचे विद्वान प्राचार्य राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली धुमधडाक्याने पार पडले. उपमुख्यमंत्री ना. बाळासाहेब तिरपुडे उद्घाटक आणि श्री. जीवनचंद्र निर्वाण हे स्वागताध्यक्ष होते.

तसेच विदर्भ साहित्य संघाच्या वर्धा शाखेने वर्धेला इ. स. १९६९ साली मराठी साहित्य परिषदेचे ४८ वे संमेलन प्रा. पु. शि. रेगे यांचे अध्यक्षतेखाली; विदर्भ साहित्य संघाचे वतीने लेखक संघाचे महाराष्ट्र संमेलन नागपूर येथे १६ व १७ ऑक्टोबर १९७६ ला खासदार यशपालपाल यांचे अध्यक्षतेखाली तर चंद्रपूर येथील गोंडवन शाखेने ५ व ६ जानेवारी १९७९ रोजी चंद्रपुरास प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली ५३ वे मराठी साहित्य संमेलने घेऊन कोणत्याही साहित्यिक क्षेत्राचे साहित्यविषयक कार्य आम्हाला दुजे नाहीत हे प्रत्यक्ष कृतीने दाखवून दिले आहे. या संमेलनांचे उद्घाटक प्रसिद्ध उद्योगपती रावसाहेब गोगटे होते तर स्वागताध्यक्ष खासदार शांताराम पोटदुखे होते.

११

समारोप

एका कविराजाने म्हटले आहे. "पुढे पुढे जातांना मागे वळून पहा इतिहास !" हा विदर्भ साहित्य संघाचा साठ वर्षांचा जिवंत इतिहास आहे. तो लिहित असताना मला एका सत्याची सतत जाणीव होत होती. ती वरचेवर सावध करीत होती. मला एका विशाल साहित्य संस्थेच्या इतिहासाचे सिंहावलोकन करावयाचे आहे. "येंवे येंवे तळे साचे" न्यायाने तो व्यक्ती-व्यक्तीने घडलेला एका संस्थेचा इतिहास आहे. शेकडो सहस्रावधीजणांचा त्यांत अंतर्भाव आहे. यांत अनेकांचे श्रम सार्थकी लागले आहेत. लो. बापूजी अणे यांचेपासून श्री. अ. ल. लिमयेपर्यंत. सर्वश्री कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. ना. ना. कृ. दिवाणजी, ग. त्र्यं. माडखोलकर, ए. श्री. पटवर्धन, बाळासाहेब ढवळे, नानासाहेब जोग; न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती, बाळासाहेब अणेगिरी, श्री. ना. रा. शेंडे, प्रा. श्री. गो. काशीकर, आ. रा. देशपांडे, ल. वि. पांढरीपांडे, रा. पु. सगदेव, बाबूराव चिमोटे, गो. स. देहाडराय, ह. ना. नेने, पां. ब. गडकरी, द. रा. गोमकाळे, प्रा. तु. वि. गेडाम, प्रा. माणिक वैतूले, प्रा. पु. ह. घनकर, डॉ. आष्टीकर तसेच पं. रविशंकर शुक्ला, पं. द्वारकाप्रसाद मिश्र, ना. पु. का. देशमुख, ना. बाळासाहेब तिरपुडे, कर्मवीर ना. मा. सां. कन्नमवार, श्रीमंत बाबूरावजी देशमुख, श्रीमंत दामूअण्णा देशमुख, पूर्णचन्द्रराव बुटी, गणपतराव बुटी, भास्करराव बुटी, टिळक पर्स फंड आणि सहस्रावधी गरीब व मध्यमवर्गीय जनता या सर्वांचा हातभार या महान कार्यास लागला आहे. त्यांचे विस्मरण होणे कदापि शक्य नाही.

संस्थेच्या पुनरुज्जीवनानंतर संस्थेची घटना निर्माण झाली. प्रचार व प्रसाराकरिता संस्थेचे मुखपत्र "युगवाणी" तसेच मराठी प्रवेशपासून साहित्य पारंगत, साहित्याचार्यपर्यंत परीक्षा सुरू झाल्या. आवश्यकतेप्रमाणे गडकरी स्मारक समिती, सांस्कृतिक कार्यक्रम समिती, नाटय समिती, व्याख्यान समिती, निधी समिती, विश्वस्त मंडळ, रंगमंदिर समिती, नाटय समिती, संशोधन समिती, सत्कार समिती, पुस्तकालय समिती, क्रमिक पुस्तके समिती, नाटय महोत्सव समिती, डॉ. केदार ग्रंथ समिती, आगरकर चरित्र समिती, नियुक्ती समिती, निविदा समिती आदींचा पसारा वाढला.

या केन्द्रीय संस्थेच्या शाखांचा विस्तार चन्द्रपूर पासून खामगावपर्यंत वर्धा, हिंगणघाट, पुलगाव, भंडारा गोंदिया, तुमसर, गडचिरोली, मूल, नागभीड, तळोधी; (बा.) वरोरा, वणी, यवतमाळ, नेर–परसोपंत, बोरी–

अरब, बुलढाणा, सावरगाव (डुकरे), उमरेड, काटोल, सावनेर, अकोला, मेहकर, घुग्गुस.

वार्षिक कार्यक्रम : संस्थेचा वर्धापनदिन, गडकरी दिन, रवीन्द्रनाथ टागोर, लो. टिळक, टॉलस्टॉय, म. गांधी, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, नाटचाचार्य काकासाहेब खाडीलकर स्मृतीदिन अनेकविध व्याख्यानमाला : आणि नाटचस्पर्धा असा हा विस्तार झाला आहे. जणू महान वटवृक्षच !

हीरक महोत्सव

या महान संस्थेचा १३ जानेवारी १९८३ पासून "हीरक महोत्सव" पुढे सात दिवसपर्यंत विविध अशा भरगच्च कार्यक्रमांनी चालावयाचा आहे. त्याकरिता केन्द्रीय मंत्री ना. वसंतराव साठे यांच्या अध्यक्षतेखाली हीरक महोत्सव समिती गठित झाली आहे.

हीरक महोत्सवी स्मृती : "साहित्य वाचस्पती"

विदर्भ साहित्य संघाचे १९४५ मध्ये पुनरुज्जीवन झाले. नवीन घटना तयार झाली व दोन उपक्रम सुरू झाले. (१) त्याचे मुखपत्र "युगवाणी" मासिक प्रकाशन जानेवारी १९४६ पासून विदर्भाचे "रामशास्त्री" श्री. वा. ना. देशपांडे यांच्या संपादकत्वाखाली चालू झाले. त्याच प्रकाशनाचा "हीरक महोत्सवी विशेषांक" १४ जानेवारी १९८३ रोजी प्रकाशित होत आहे.

तद्वतच दुसरा उपक्रम सर्वसाधारण समाजात भाषा, वाङमय व साहित्यांची अभिरुची वाढीस लागावी म्हणून प्रवेशप्रारंभ परीक्षांपासून "एम्. ए." समकक्ष "साहित्य पारङ्गत" पर्यंत परीक्षा सुरू केल्या. पहिले परीक्षा संचालक होते. प्रा. डॉ. वि. भि. कोलते. पण पुढे १९५४ मध्ये साहित्य पारङ्गत नंतर पुढील "पीएच्. डी." समकक्ष अभ्यास करणारांची इच्छा अतृप्त राहू नये म्हणून सा. भू. काटकरांनी तसा ठराव कार्यकारिणीपुढे आणला व कार्यकारिणीनेही तो अविरोध स्वीकृत केला. "पीएच्. डी." समकक्ष "साहित्याचार्य" परीक्षा सुरू केली. त्याचे परीक्षा मंडळही निर्माण केले. या मंडळात प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. मा. गो. देशमुख आणि पदसिद्ध परीक्षा संचालक. पुढे या परीक्षेत साहित्याचार्य ही उच्च उपाधी प्राप्त करणारी होती एक युवती.

१९८३ मध्ये या महान संस्थेचा "हीरक महोत्सव" सुरू होत आहे. या महोत्सवाची परीक्षा विभागीय स्मृती म्हणून "डी. लिट्." समकक्ष "साहित्य वाचस्पती" ही सर्वोच्च परीक्षा सुरू होत आहे. असा निर्णय विद्यमान कार्यकारिणीने नुकताच घेतला आहे व तिची नियमावलीदेखील तयार झाली आहे. तिचे आपण स्वागत करू या !


गेल्दा साठ वर्षात ज्ञात–अज्ञात सहस्रावधी साहित्यप्रेमी, कवी, गायक, रसिक जनांच्या केन्द्रस्थानी असलेल्या या साहित्य संस्थेशी संबंध येऊन त्यांचा भाषा, साहित्य, संस्कृती व कलेच्या वृद्धीसाठी करभार लागला आहे, श्रम खर्ची पडले आहेत. पूर्वदिव्य ज्यांचे त्यांना लखलाभ आहेत. भावी जनासाठी रम्यकाळ त्यांचे स्वागत करायला धर्मज्ञातिभेदातीत हे साहित्य मंदिर सर्वांसाठी सदासर्वकाळ खुले आहे–

"पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना, रम्य भावीकाळ ।
बोध हाच इतिहासाचा, सदासर्व काळ ॥"

△ △ △

विदर्भ साहित्य संघ, कार्यकारिणी १९८१-८३

१. मधुकर आष्टीकर, अध्यक्ष २. तु. वि. गेडाम, उपाध्यक्ष ३. अ. ल. लिमये, सरचिटणीस ४. योगेश बऱ्हाणपुरे, चिटणीस ५. मनोहर म्हैसाळकर, आमंत्रक, ध. रं. मं. ६. शरद कोलारकर, संपादक, युगवाणी ७. प्रकाश देशपांडे, कार्यकारी संपादक, युगवाणी ८. श्रीपाद कोषाध्यक्ष व मुंजे, आमंत्रक, प्रकाशन समिती ९. मदन गडकरी, आमंत्रक, नाटचसमिती १०. चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक, शिवाजी संदर्भ ग्रंथालय ११. शं. त्रि. बालेकर, अमरावती, चिटणीस १२. पंढरीनाथ मांडवगणे, अकोला, चिटणीस १३. मा. तु. दलाल, भंडारा, सदस्य १४. गो. स. देहाडराय, सदस्य १५. माणिक वैतुले, सदस्य १६. बजरंग सरोदे, आकोट, सदस्य १७. पु. ह. उपाख्य मदन धनकर, चंद्रपूर, सदस्य १८. म. ग. मानकर, यवतमाळ, सदस्य.



॥ दिनकथा ॥

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

शापित

नववीत देशमुख

रात्रीच्या दाट काळोखात सातपुड्याचा विशाल डोंगर एखाद्या आदिमानवासारखा निश्चल उभा होता. डोंगराच्या निमुळत्या कड्यावर बहिरमबुवाच्या देवळा-तली मशाल धगधगत होती. झाडाझुडपातल्या रात-किड्यांच्या आवाजाने डोंगराचा परिसर भेसूर वाटत होता.

घनश्यामनं डोळे उघडले.

असंख्य चांदण्यांनी फुलारलेलं आभाळ त्याला दिसलं. क्षणभर त्याला कळलं नाही आपण कुठे आहोत म्हणून. त्यानं उठून बसण्याचा प्रयत्न केला, पण शरीरातलं हाडन् हाड खिळखिळं झाल्यागत वाटलं. डोकं जड झाल्याचं जाणवलं. त्यानं डोक्यावर हात ठेवला. कसलासा करडा–वाळला–स्पर्श त्याला जाणवला. म्हणजे आपल्या डोक्यातून रक्त येत होतं... काय झालं आपल्याला ? या ठिकाणी कसे आलो आपण ?

तो कसा तरी धडपडत उठून बसला.

समोर बहिरमबाबाची मूर्ती पाहून त्याच्या लक्षात आलं की आपण बहिरमबाबाच्या देवळात आहोत. पण इतक्या रात्रीचे आपण डोंगरातल्या या देवळात कसे आलो ? त्यानं बरंच आठवायचा प्रयत्न केला. पण डोक्याची शीर अन् शीर तारवटल्यासारखी वाटली. बहिरमबाबाच्या मूर्तीला त्यानं बसल्या जागे-वरूनच हात जोडले. दोन्ही हातांमधून विलक्षण कळा उठल्या.

किती तरी वेळ तो तसाच बसून राहिला. आजू-बाजूच्या डोंगराळ अंधारात त्यानं डोळे फाडून बघितलं. भीतीनं त्याचं अंग शहारलं. किती तरी वेळ आपण ह्या डोंगरातल्या देवळात मेल्यासारखे पडून होतो. एखाद्या जनावराला वास लागला असता, तर असाच फरफटत डोंगरात घेऊन गेला असता. पण बहिरमबाबाची कृपा ही !

त्यानं मूर्तीजवळ डोकं टेकवलं. मूर्तीजवळच्या दगडी खांबावर पेटलेल्या मशालीकडे त्याचं लक्ष गेलं. मशालीच्या प्रकाशानं बहिरमबाबा उजळून निघाले होते. शेंदरानं माखलेली त्यांची अवाढव्य मूर्ती लोभस-वाणी वाटत होती.

त्याचं लक्ष पुन्हा खांबावरल्या मशालीकडे गेलं. हवेनं मशालीच्या ज्वाळा एकाच दिशेनं फडफडत होत्या. लालबुंद धूसर ज्वाला...त्याला जाणवलं...आपल्याही मनात असल्याच धगधगत्या ज्वाला आहेत. त्याला आठवू लागलं...सगळं सगळं. एकेक प्रसंग...घनश्याम सुखदेव पाटील...शापित भव्य वाड्याचा दुसरा वारस-दार. नांदगाव...सातपुड्याच्या कुशीतलं लहानसं गाव...

त्यानं एकेका प्रसंगाची संगती लावण्याचं प्रयत्न केला...

* * *

...आकाश ढगांनी भरून आलेलं.

पाण्याचे टपोरे टपोरे थेंब पडायला लागले, तसा घनश्याम मारोतीच्या पारावरून उठला. मावशीच्या घराकडे चालायला लागला. रोज सकाळ संध्याकाळ या पारावर येऊन बसायचं. कुणाशी फारसं बोलायचं नाही. तरी एखादा गांवकरी विचारी "पाव्हणं कोण्या गावचं." 'नांदगाव बहिरम.' कोणाकडे आला ? तर दुसराच एखादा सांगायचा "विठाताई नव्हं का, तिचा भाचा हाये." गावकऱ्यांचं बोलणं ऐकत बसायचा. कुठल्या कुठल्या गप्पा व्हायच्या. तो मात्र कान देऊन ऐकत बसायचा.

पंधरा दिवस हे असेच निघून गेले. त्याच्या मनात आलं, आधीच मावशीचं घर पोराबाळांनी भरलेलं–म्हातारे–कोतारे काही कमी नाहीत. तशात आपली भर. विचारातच तो चिंब पावसानं भिजत मावशीच्या घरात शिरला. आतल्या खोलीतून विजेच्या लोळासारखे शब्द त्याच्या कानावर आदळले–"तो मेला पंधरा दिवसापास्नं फुकट येऊन पडलाय् त्याच्या उरावर चार भाकरी रोज घालाव्याच लागतात." त्यानं ओळखलं, हे शब्द मावशीचे निश्चित नव्हते. मावशीची सासू, तो घरात नाही असं समजून, वाटेल ते बडबडत होती. त्यानं पुन्हा कान टवकारले, "सांग मेल्याला नीव इथून म्हणून. त्याच्या बापजाद्यानं इस्टेट नाही पुरून ठेवली इथं."

ढगांच्या गडगडाटानं तो भानावर आला. त्याला वाटलं, फार लाचारी झाली ही. निघायलाच हवं इथनं. आपल्या गावातही लाचारासारखे–कुत्र्यासारखे–जगलो आपण. सखारामदादा म्हणेल तेच करायचं. त्यानं हुकूम सोडायचा. आपण ताबेदार व्हावं सखारामनं बस म्हटलं तर बसायचं. नाही तर त्याच्यासमोर तासन् तास उभं राहायचं. आपण लग्न करायला नाही म्हणालो तर तोच म्हणाला, "असा कसा लग्न करत नाही." त्याच्या सांगण्यावरून आपण लग्नाला तयार झालो. आपल्या वाटचाची, हक्काची चाळीस एकर जमीन देखील आपल्याला मागता आली नाही. काय कमी आहे आपल्याला. का म्हणून हे असं कुत्र्यासारखं दारो-दार फिरायचं सखारामनं. शांतीला विहिरीत ढकलल्या-पास्नं आपण हे असे भटकतोय्. आपल्या हक्काच्या बायकोला, आपल्या डोळ्यादेखत सखारामनं विहिरीत ढकललंय्. आपण साक्षीदार आहोत. मग पोलीसात का नाही गेलो ? शांतीला वाचवण्यासाठी सखारामला का नाही अडवू शकलो ?

आभाळातली वीज काडकन् आभाळ कापी-गेली, तसा तो दचकला. आपण अजूनही मावशीच्या घरातच आहोत या विचारानं तो अर्धमेला झाला. एखाद्या पुतळ्यागत तो घराबाहेर पडला. रस्त्यावर मुसळधारा कोसळत होत्या.

किती तरी वेळ घनश्याम एकसारखा चालत होता. आपण किती दूर आलो याचंही त्याला भान नव्हतं. फक्त चालायचं...खूप चालायचं...मावशीच्या या घरापास्नं खूप दूर याच एका विचारानं तो झपा-टल्यासारखा चालत होता.

पाऊस थांबला होता.

आकाशातले काळे ढग सैरावैरा धावून आभाळ स्वच्छ करीत होते. अंगावरचे कपडे ओलेचिंब होऊन त्याच्या अंगाला चिकटले होते. त्यातून थंडगार झुळ-कीनं अंगावर काटे उभे राहात होते. मनातल्या वादळानं तो पार दमल्यागत झाला होता.

आपण सखारामचा विरोध करू शकलो नाही. शांतीला वाचवू शकलो नाही.

विहिरीत पडताना तिचे डोळे शेवटच्या क्षणाला आपलाच शोध घेत होते. आपण माडीवरल्या पायऱ्या-वरनं बघत होतो...फक्त बघत राहिलो पाळीव कुत्र्या-सारखे. छे ! भयानक आपण स्वतःच आहोत. माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला हक्क नाहीय्. रक्त गोठल्यासारखे–पुतळ्यागत जगलो आपण. मग का जगतोय्...मरण येत नाही म्हणून जगतोय्. मरायला देखील हिंमत लागते.

रस्त्याच्या कडेला बाभळी–निंबाची झाडं उभी होती. त्यांच्या हिरवेपणात तो हरवला. त्याच्या डोळ्या-समोर हिरवा शालू नेसलेली, हिरव्या बांगड्या घात-लेली पहिल्या रात्रीतली शांती उभी राहिली.

'कोणी बघंल की–'

'अग, नवरा बायकोला कुणी पाह्यलं म्हणून काय झालं ?'

'तो दिवा...'

'असू दे.'
'अं हं ! मला लाज येतीय्.'
'लग्न झाल्यावर लाज धरायची नसते.'
'मी बाई माणूस'
'नवऱ्या जवळ बाईनं माणूसच बनावं.'

शांतीचा लाजरा बुजरा चेहरा क्षणभर त्याच्या डोळ्यांसमोर तळरला. तसा तो अधिकच अस्वस्थ झाला. आपण बायकोला पहिल्या रात्री माणूस बनायचा उपदेश केला आणि स्वत: मात्र...

शांतीच्या आठवणीनं त्याचे डोळे पाणावले.

एखादी काठी उचलून सखारामच्या टाळक्यात हाणायला पाहिजे होती. नाही जमलं आपल्याला. अर्वाच्य शिवीगाळ करीत सखारामनं शांतीला फरफटत विहिरीजवळ आणलं. विहिरीत लोटली, तरी देखील आपण न्याडासारखे वागलो. गावातली माणसं वाड्यातल्या विहिरीभोवती जमली. आपणही त्या माणसांपैकी एक होतो. जणू वाड्याशी-शांतीशी-आपला काहीएक संबंध नव्हता. पोलीस पंचनामा झाला. बकुळेनं, सखारामनं, दिवाणजीनं सांगितलं-विहिरीत पाय घसरून पडली. त्यावेळी सखारामचे मोठाले डोळे आपल्यावर होते. त्या डोळ्यांत शांतीचं रक्त दिसलं आपल्याला. आपण मुके झालो. तोंडावाटे एकही शब्द उच्चारला नाही.

चुलत भावाचं-रक्ताचं नातं सांगणारा सखाराम आपला भाऊ की वैरी. रक्ताच्या नात्यातही इतकं वैर असतं, हे आपण पहिल्यांदाच अनुभवत होतो. सखारामनं शांतीला विहिरीत का ढकललं, फक्त आपणच जाणतो. आदल्या रात्रीच ती म्हणाली होती-"सखाराम भाऊंची नियत काही बरी नाही. आपण दुसरीकडं राहायला जाऊ. आपल्या हिश्श्याची जमीन घ्या मागून. शेतातच झोपडं उभं करू. राजाराणीसारखं आनंदात राहू."

दिव्यांच्या झगझगाटानं त्याला जाणवलं आपण शहरात येऊन पोचलो म्हणून. अंगावरचे कपडे कोरडे झाले होते. नांदगावकडे जाणारा शेवटचा टाइम केव्हाच निघून गेला होता. स्टॅण्डवरच्या एका बाकड्यावर त्यानं अंग झोकून दिलं. केव्हा झोप लागली त्याला कळलंदेखील नाही.

* * *

सकाळच्या पहिल्या एस. टी. नं. घनश्याम नांदगाव फाट्यावर उतरला. दीड दोन मैलांच्या अंतरावर नांदगाव होतं. सातपुड्याचा निळा डोंगर त्याला फार जवळ वाटत होता. डोंगरातलं बहिरमबाबाचं देऊळ अस्पष्ट दिसत होतं.

पायवाटेनं तो नांदगावकडे निघाला. त्याच्या मनात येत होतं -आपण गावात जाऊन सखारामला हक्काची जमीन मागू. कुत्र्यासारखं आता जगायचं नाही. सुखासुखी आता सखारामला जगू द्यायचं नाही. असेल त्याचा गावात दरारा ! आपण भ्यायचं कारण नाही. नाही तरी आपलं आयुष्य धुळीला मिळाल्यागत झालंय्. सखारामचा ढोंगीपणा गावभर सांगायचा. त्यानं पुढाकार घेऊन गावात शाळा आणली. दवाखाना आणला. त्याच्या कर्तृत्वाखाली गाव दबलंय्. पण आपण गाववाल्यांना ओरडून सांगणार. शाळा-दवाखाना गावात आणणारा सखाराम पापं झाकायसाठी हे सगळं करतोय्.

पायवाटेनं तो एकटाच चालत होता. कालच्या पावसाचा ओलेपणा जाणवत होता. त्याच्या मनात आलं, निसर्गानंच नियम मोडलेत. भर उन्हाळ्यात पाऊस येतो. पावसाळ्यात कडक उन्ह तापतं म्हणूनच माणसांनीदेखील धरबंद सोडले. सखारामसारखी माणसं; गावची पोलीस पाटील म्हणवतात. किती अमानुष वागतात. आपणही काळाबरोबर बदलायला पाहिजे. इतकं लाचार जगणं नको.

त्याचं मन वाड्यात जात होतं.

सखारामनं दुसरं लग्न केलं. बकुळा...ती दुसरी सखी वाड्यात आणून ठेवलीय्. अगदी सखाराम सारखीच...मायेचा ओलावा नसलेली. सगळी कुळं खाणारी. थोरली वहिनी किती चांगली होती. स्वतःच्या ताटातली भाकरी देणारी...तासन् तास आपली वाट पहाणारी...दुखलं-खुपलं तर बहिरमबाबाच्या देवळातून अंगारा आणणारी. मूल होत नाही म्हणून सखारामनं तिला कायमची माहेरी पाठवली. थोरल्या वहिनीच्या आठवणीनं त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याला वाटलं हे जग चांगल्या माणसांसाठी नाहीच मुळी. इथं सखारामसारखी माणसंच राज्य करू शकतात. थोरली वहिनी वाड्यात असती, तर आपल्यावर हा असला प्रसंग कधीच आला नसता. पण सखारामनं तिलाही कदाचित शांतीची वाट दाखवली असती.

समोरचा डोंगर गावावर स्वतःचं पांघरूण टाकून उभा होता. घनश्यामला वाटलं, अगदी असंच या डोंगरासारखं, सखारामनं गावावर पांघरूण घातलंय्. काटयासारखं...रुतणारं. नांदगावचा तो राजा. मनात आणील तर गाव जाळून टाकील. त्याच्या सहा फूट उंच शरीरासमोर आपल्याला उभंदेखील राहता येणं कठीण आहे. मग का जातोय गावाकडे ? जमिनीचा मोह् आपल्याला ओढून नेतोय्, का आणखी कुठल्याशा मोहानं आपण खेचल्या जातोय् गावाकडे ?

त्याला काही कळत नव्हतं.

* * *

विचाराच्या तंद्रीतच तो वाडयासमोर येऊन उभा राहिला. वाडयाचा लाकडी दरवाजा सताड उघडा होता.

तो तसाच दरवाज्याजवळ घुटमळला.

किती तरी वेळ. काळया दगडांनी बांधलेल्या या जुनाट वाडयात आपल्या किती तरी पिढया नांदून गेल्याय्त. त्याचं मन वाडयाच्या ऐकीव इतिहासात नकळत शिरलं.

...आपल्या वडिलांपासूनची मागची पीढी.

...आपले वडील सुखदेव पाटील. त्यांचे सख्खे भाऊ आपले काका अजाबराव. अजाबराव वयानं मोठे...नांदगाव पाटलाच्या या घराण्यात दोन सारखे भाऊ, दोन मुलं कुण्याच पिढीत झाली नाहीत. आधीच्या सगळ्या पिढयांत चार मुली अन एकच मुलगा. या दोन मुलांच्या जन्मानं सगळया सातपुडयात पाटील घराण्यात आनंद वाटला. दोघंही कर्तबगार निघाली. सज्जन निघाली. दोघांची लग्नं. दोन वर्षाच्या अंतरानं. दोघांनाही पुन्हा मुलीच झाल्या. बहिरमबावाला नवस केला. पुढे दहा वर्षानंतर सखारामचा जन्म. चार वर्षाच्या अंतरानं आपला जन्म. देवीची लागण गावभर झाली. सखारामच्या दोन बहिणी अन् आपल्या दोन बहिणी एकाच वेळी दगावल्या. चार प्रेतं वाडयातून एकाच वेळी उचलल्या गेली.

कुणी म्हणे बहिरमबावाचा कोप.

कुणी म्हणे घराण्याला शाप आहे. असं काही ना काही वैभव राहील पण उपभोगणारे राहणार नाहीत.

वाडा रिकामा होत गेला.

सखाराम मोठा, स्वतंत्र. बेभान......स्वैराचारी बनला. सदैव दारू. अत्याचार. गावातल्याच कित्येक पोरीबाळी नासवल्यात.

तक्रार करणारे सातपुडयाच्या डोंगरात नाहीसे झाले.

त्याला समोर ती विहीर दिसली.

नकळत त्याचे पाय तिथपर्यंत ओढल्या गेले. ह्याच विहीरीत सखारामनं शांतीला लोटलं. त्यावेळी आपण ह्या बाजूच्या माडीवरल्या पायऱ्यांवर उभे होतो. त्यानं विहिरीत डोकावून पाहिलं. विहिरीच्या तळात आकाश उतरल्यासारखं वाटलं त्याला. त्यातून शांतीची छबी अस्पष्टपणे त्याला दिसली. विहिरीच्या तळातून शांतीचा आवाज त्याला ऐकू आला– " सखारामभाऊंची नियत काही बरी नाही. आपण दुसरीकडं राहायला जाऊ. आपल्या हिश्याची जमीन घ्या मागून. शेतातच झोपडं उभं करू. राजाराणीसारखे आनंदात राहू–"

त्याचे डोळे भरून आले.

डोळयांचं पाणी विहिरीतल्या पाण्यात पडलं.

" कोण ते ? "

करडया आवाजानं तो भानावर आला. समोर सखाराम उभा होता. त्याच्यापाठीमागे वकुळा. वाडयातली गडी माणसं सखारामपासून बरंच अंतर राखून उभी होती.

सखारामच्या लालबुंद डोळयांकडे त्यानं एकवार पाहिलं. त्याचं सर्वांग थरथरलं. कसं तरी साहस एकवटून तो म्हणाला–

" मी........ मी घनश्याम. "

" कुंठ गेलतास इतके दिवस ? "

घनश्याम अबोल झाला, तसा सखाराम गरजला– " आरं बोल की कुटं गेलतास ?"

मावशीकडं........सुरगावला.

"सुरगावला ! अन् ह्या अवतारात !"

घनश्याम मुकाटयानं ऐकत राहिला. सखाराम बोलत होता–

" नांदगावच्या सखाराम पाटलाचं नाव ह्या सातपुडयाच्या दऱ्याखोऱ्यातून ऐकू येते, अन् त्याचा हा भाऊ भिकाऱ्यासारखा दारोदार भटकतोय् " क्षणभर थांबून सखारामनं पुन्हा विचारलं–

" मग माघारी का आलास ?"

घनश्यामला वाटलं, हीच वेळ आहे जमिनीच्या वाटणीचा विषय काढण्यासाठी.

म्हणून धीटपणानं तो म्हणाला,

" मला माझ्या हिश्श्याची जमीन पाहिजे."

इतकं मोठं सलग वाक्य तो पहिल्यांदाच सखाराम समोर बोलला होता. त्याच्या बोलण्यानं सखारामच्या कपाळावरच्या रेषा . आक्रसल्या गेल्या. वाड्यातल्या गडी माणसांसमोर आपला लहान भाऊ, ज्यानं कधीच तोंड उघडलं नव्हतं तो, जमिनीची वाटणी मागत होता. सखारामचे ओठ थरथरले–

" जमिनीच्या हिश्श्यासाठी आला नाही का तू ! बरंच बोलणं शिकलास बाहेर जाऊन."

घनश्याम फक्त ऐकत राहिला.

" कोणासमोर बोलतोस तू हे काही माहीत आहे का ?

" नांदगावच्या सखाराम पाटलासमोर."

घनश्यामची हिंमत वाढली होती. त्याच्या या बोलण्यानं सखारामचा चेहरा लालबुंद झाला. कपाळावरच्या शिरा ताठरल्या. दोन्ही हातांच्या मुठी गच्च आवळून थरथरत तो कसा तरी स्वतःला आवरीत उभा होता. बकुळेकडे पाहून तो म्हणाला, " बघ बकळे तुझा दीर ! शहाणा झाला. खरा मर्द गडी वाटतो आता. याला जमिनीची वाटणी पाहिजे. सखाराम पाटलासमोर याला तोंड उघडता येतं आता ! "

एवढं बोलून सखाराम गोठ्याकडे तरातरा चालत गेला. बैलांना हाकायची वेताची काठी उचलून पुन्हा घनश्याम समोर येऊन उभा राहिला. " काय पाहिजे तुला, जमिनीचा हिस्सा नाही का ?"

घनश्यामनं त्याच्या खुनशी नजरेला नजर भिडवीत म्हटलं, "माझ्या हक्काची जमीन मागतोय्."

" घे मग तुझा हक्क ! " एवढं बोलून सखाराम काठीचे वार त्याच्या शरीरावर हाणीत सुटला...सपा सप...छातीवर–हातावर–डोक्यावर–

घनश्याम किंचाळत होता. रक्तबंबाळ होऊन तो वाडाभर धावत होता. सखारामच्या हातातली वेताची काठी निर्दयपणे त्याला ठेचून काढीत होती. घनश्याम ढोरासारखा ओरडत होता..." शांतीला मार णारा तू हैवान आहेस...अख्ख्या गावाला मी हे सांगणारे..."

पिसाळल्यागत सखाराम त्याला बडवीत होता. वाड्यातली गडी माणसं चित्रासारखी फाटल्या नजरेनं गप्प उभी होती. तडफडत घनश्याम . जमिनीवर कोसळला. त्याच्या नजरेसमोर फक्त अंधार तेवढा दिसत होता.

सखाराम गड्यांकडे बघत ओरडला,

" तुक्या, ह्याला डोंगरात फेकून द्या हरामखोराला."

* * *

...बहिरमबाबाच्या देवळात बसलेला घनश्याम भानावर आला. वाड्यातल्या त्या जीवघेण्या प्रकारानंतर गड्यांनी आपल्याला इथं आणून टाकलं असणार. पण गावात पुन्हा परत येऊन काय मिळवलं आपण ? या विचारांनी त्याचं रक्त उफाळून आलं. डोळ्यात अंगार पेटला. बहिरमबाबाच्या पायावर डोकं ठेवून कसल्याशा निर्णयानं तो उभा राहिला.

त्याला जाणवलं, मघाशी होणाऱ्या शरीराच्या वेदना आता थांबल्या आहेत. अंगात चैतन्य सळसळतंय्. खांबावरली मशाल काढून त्यानं हातात घेतली. देवळाबाहेर आला. देवळाच्या उंच कड्यावरून त्यानं खाली पाहीलं.

खाली नांदगाव शांतपणे झोपलं होतं.

* * *

' बहिरमबाबा पेटला–'

सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यांतून एकच आवाज उठला. बहिरमबाबाच्या अंगावरचा शेंदूर धगधगत होता. गावंच्या गावं चमत्कार बघायला आली. लोक होते,

' पापं वाढली म्हणून बाबा पेटला '

' सखाराम पाटलानं लय पापं केलती.'

' बाबानं वाड्यासकट जाळला त्येला '

कुणीसं म्हणालं, ' भावाला मारून डोंगरात दिलान् टाकून.'

' बाबाचा कोप, त्येला बी ठिवला न्हाई.'

'पाटलाच्या वाड्यालाच शाप होता की, वैभव राहील पन मानसं राहणार नाईत.'

'शंभर एकर जमीन कुनाच्या मालकीची आता.'

लोकं असं एकेक बोलत राहिले.

दरवर्षाला बहिरमला यात्रा भरते. हजारो भाविक जमतात. त्यात एक गोसावी असतो. तो गावात येतो. पाटलाच्या जळून पडलेल्या वाड्याच्या जागी येतो. विहिरीजवळ थोडा वेळ बसतो. वाड्याचे काळे ठिक्कर पडलेले मोठे मोठे दगड न्याहाळतो. गावातले लोक म्हणतात–

"सखाराम पाटलाचा भाऊ घनश्यामच आहे तो."

△ △ △

युगवाणी कथास्पर्धा

स. न.

प्रा. नववीत देशमुख 'शापित' प्रथम, सौ. प्रतिमा इंगोले 'नागवेल' द्वितीय, असे कथांचे अनुक्रम माझ्या मते लागत आहेत.

श्री. प्रफुल्ल यशवंत अत्रे आणि श्री. पद्माकर पाटील अनुक्रम 'कलंदर' व 'खेळ' या दोन कथा उत्तेजनार्ह आहेत.

विदर्भ साहित्य संघाने हीरक महोत्सवानिमित्त 'युगवाणी'चा विशेषांक काढायचे ठरवुन त्यात कथा स्पर्धा आयोजिक केली ही स्पृहणीय बाब आहे. कथांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या संधीचा फायदा घेऊन 'युगवाणी'ने मराठी कथांचे असेच वातावरण निर्माण करून ते कायम ठेवल्यास कथा प्रकाराला वाढीवपणा येईल.

स्पर्धेसाठी आलेल्या कथा चांगल्या आहेत. स्पर्धा म्हटल्यावर कथा आणि कसब दोन्ही लक्षात घ्यावे लागते. काहींची कथाबीजे चांगली आहेत तर कसबात कमी पडतात. काही कथांमध्ये कसब दाखवण्याचा प्रयत्न आहे पण कथा फारच क्षीण आहे. या दोन्हींचा समन्वय असणाऱ्या कथांना क्रमांक दिलेला आहे.

कथा हा तसा 'एकत्र प्रवास' आहे. तरी त्यासाठी चर्चा, प्रशिक्षण वगैरे आवश्यक असते. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी'ने त्या दृष्टीने प्रयत्न करावेत ही विनंती.

कथा–कथन हा प्रकार या निमित्ताने वाढीस लागला तर उत्तम होईल.

आपल्या उपक्रमास शुभेच्छा.

स्नेहांकित

प्रभाकर पुराणिक

नागवेल

प्रतिमा इंगोले

डोक्यावरचं भाकरीचं टोपलं तिनं झोपडीच्या वरंडीवर ठेवलं. पायातली चप्पल काढून कौलाच्या फटीत खोचून ठेवली. आणि पदराची ओटी करून ती पानं खुडायला निघाली. गवताने व पानांनी शाकारलेल्या तांड्याजवळ येताच, तिने त्याचं गवताचंच फाटक उघडलं, आणि आंत पाऊल टाकलं. आत शिरताच, तिथल्या हिरव्या गारव्यानं, संसारतापानं शिणलेल्या तिच्या मनाला अंमळ बरं वाटलं. ती भान हरपून न्याहाळायला लागली समोरच्या नागवेली...!

मागच्या वर्षी तिच्या सासऱ्यानं ह्या वेली लावल्या होत्या आणि यावर्षी त्या नवतीनं बहरून लहरत होत्या. वाऱ्याच्या झुळकीबरोबर लवलवत होत्या. त्यांचा कोवळागार हिरवेपणा सगळ्या तांड्याला व्यापून उरला होता. तिच्या मनातही तो ढुशी मारून शिरलाच !...तिला वाटलं...हळूच पुढे व्हावं, आणि नाजूक अलवार हातानं वेलीला थोपटावं, तिच्याशी गुज बोलावं. बेभानपणे ती न्याहाळायला लागली, ते लहरतं, थरारतं, लवलवणारं विश्व...

आणि कुठेतरी नातं जुळलं...का कोणास ठाऊक ? हे असं नेहमीच होतं. इथे तांड्यात आली की, ती देहभान विसरते. सगळे ताप, माहेरच्या विसाव्यात आल्यागत ती विसरते. नाहीतरी लहानपणापासूनच तिला ही नागवेल, आपली सखी वाटत आली आहे. हरतालिकेच्या पूजेच्या वेळी पार्वतीला भेटली होती, तशी !

ती लहान असतानाच, आई धोतराचा पाळणा करायची. आणि त्यात तिला झोपवून, गळ्याशी तो पाळणा बांधायची व झपाटत मळ्यात यायची. अशाच झोपडीच्या...वल्लीला मग तो पाळणा टांगून द्यायची व पानं खुडायला जायची. पानं खुडून आल्यावर ओट्यातली पानं खाली टाकून, त्याच ओट्यात तिला घ्यायची. तेव्हाही...कदाचित...तिच्या हृदयीचं अमृतपान करताना...तिलाही नागवेलीचं पान झाल्यागतच वाटायचं...

दुडदुडत्या चालीनं ती मोठी झाली. त्यांचं घर म्हणजे पंधरावीस जणांचा गोतावळा ! एकूण चौघा भावांचा विस्तार ! पण तिच्या वडिलांना ती एकटीच ! सगळ्या निमी, चिमी, वमी, पिसी, बेबी वगैरे...पण तिचं नाव मात्र कौतुकानं लता ठेवलेलं ! सगळेच तिला तोंड भरून लताबाई म्हणत.

ती पावलं टाकायला लागली, तीसुद्धा या नागवेलीच्याच साक्षीनं ! अशीच...आई तिला कडेवर घेऊन आली होती व तांड्यात घेऊन गेली होती. पानं

खुडायला लागल्यावर आईने तिला अलगद जमिनीवर उभे केले होते. समोरच लुकलुकतं, चमकतं, हलणारं नागवेलीचं पान तिला मोहवू लागलं होतं. त्याला मुठीत घ्यायला ती हळूच झेपावली होती. आणि केव्हा चालायला लागली, ते त्या नागवेलीलाही कळलं नव्हतं. मग...रोजच ती आईसोबत यायची...त्या हिरव्या विश्वात रमायची...भान हरपायची...भुलायची...

शेजारच्या कमळीने पाटलीची नथ केली. तेव्हासुद्धा तिने या तांडयातच, आईपाशी हट्ट धरला होता–

"माँ! मले देन वं! अशी नथ करून?"

आई मात्र कौतुकानेच दटावीत तिला म्हणाली होती,

"अई माय! आपल्याले कुठी नथ घालता येते? आपली नथ त या नांगीलले वायेल हाये!"

"काऊन माँ?"

"अव! अशीच तुयासारखी एक येळीखुळी चिळी होती. लगन झालं, तशी मालकाच्या यठी गेली. आता सासू, सासरे, ननदा, देर, साऱ्याइले पावून घावबरून गेली. तिले काई सुदरेना...जीव कसा कावरबावरा करे! अशीच...पानं खुडयाले आली. आता वय पायलं लान? त्यात नाकात नथ! नथीच्या वझ्यानं नाक निऱ्हा भलवारं झालं...पन नथ काळचाची सोय नायी? काऊन का? सासू काय म्हनीन? हा धाक! तांडयात आली त...घरचं कोनीच नोतं. तांडं असंच नवतीचं...त्यानं मंग पान खुडयाले खाल्यानी लवा लागे! त्यानं नथ लमके! नाक आखीनच दुखे! तिले वाटलं...आता आपल्याले कोन पायते? अल्लादी नथ काहाडली! आन देल्ली अळकून, आकोळचाच्या पानाले! आन मंग भुलून गेली...संध्याकायी घरी आली. तशी, नथीची आठोन आली. दुसऱ्यादिवशी तांडयात गेली. नांगीलपाशी जाऊन उभी रायली पायते त...नथीले हात पुरेचना? नथीचं पान आपलं वघरं–वघरंच जाये...तितल्यात तिले आवाज आला...'तुयी नथ तुया आमाले वायली. ते आता आमची झाली.' तवापासून आपल्या साऱ्या बारगनातल्या बायाइन नथ घालनं सोळली."

नागवेलीचं कारण, आणि गोष्ट ऐकताच ती आपला हट्टच विसरली. दहाव्या बाराव्या वर्षापासूनच ती नखूलं घालून पानं खुडायला शिकली. पान खुडायची...फॉकच्या ओच्यात गोळा करायची...अन् झोपडीत आणून पद्धतीर लावायची. आई कशी व्यवस्थित पानं सादायची...पन्नासाची एक जुडी! एकापाठोपाठ देठांची रांग! जसं नुकतंच उगवणाऱ्या ज्वारीचं तासच जणू? आईला मोजताइ येत नव्हतं. तरी आपली वीसाच्या हिशोबानी पानं मोजायची. पन्नास, पन्नास सादायची आणि पाटीत अलगद, हळूवार, गोलाकार, मांडायची. पानांचं हिरवंगार चक्रच मग पाटीत तयार व्हायचं! तिचे बाबा मग, माळेगावच्या बाजारात पानं विकायला जायचे. ती पानं सादायला बसायची...आई तिला शिकवायची...

"साज़रे– सुजरे, मोटे मोटे, पानं वघरं लावावं!

पण...ती पानं लावता लावता... त्या पानावरच्या टिकलीच्याच शोधात असायची. आणि...अवचित तिला टिकली गवसायची! तशीच पोपटसर... नाजूक नाजूक गोल, एकाला एक चिपकून, पुन्हा षटकोनी, गोलाकार, अष्टकोनी झालेली! ती हळूच पानाची टिकली काढायची...आणि दोन भुवयांच्यामध्ये लावायची...तिचं बाळपणीचं लेणं तेच होतं! आणि...म्हणूनच की, काय? लग्न झाल्यानंतर ती कुंकू जरी लावत असली, तरी...कुंकवाच्या धन्यानं; तेच जीवन तिच्या पदरी घातलं होतं.

लग्न ठरलं तेव्हा, प्रथम नागवेलीलाच आपलं फुललेलं मन, ती दाखवायला आली होती. पण...त्याच वेळी तिला नागवेल दुरावल्याचंही दुःख होतंच! कारण...वडिलांनी हे तांडं विकूनच तिचं लग्न ठरवलं होतं. जणू काही...ती आणि नागवेल! दोघींचं अतूट नातं...एकीसाठी दुसरीनी विकल्या जावं! इतपत घनिष्ट...

नाईलाजानेच वडिलांनी, ती आणि नागवेल, दोघींचाही विरह स्वीकारला होता. कारण...मुलगा "कंपाऊंडर!" पुन्हा घरी शेती! आधीच त्यांच्या "बारी" समाजात, कोणीसुद्धा शिकत नव्हते. सगळे पुरुष, आपले तांडयातच राबायचे! त्यामुळे मागतील तितका हुंडा देणं, भागच होतं.

लताबाईचं लगन! लताबाईचं लगन! सारा वाडा हरीकला होता. आनंदात भिजत होता. उत्साहात तिचं लगीन पार पडलं...सासरी जाताना वादळवाऱ्याने नागवेल थरथरावी...तशीच ती आईवडिलांच्या मायेने

नागवेलीचं एकेक पान उमलावं...तसे तिला हुंदक्याचे अनावर कढ उमलून येत होते...

सासरी आल्यावर...तिला अनेक गोष्टी कळायला लागल्या. तिच्या सासरीही "नांगीलचं तांडं" होतंच ! त्यातल्यात्यात समाधानाची हीच गोष्ट ! पण...तिला आत्ता हे पटतंय् ! लग्न झाल्यावर काही दिवस तर...ती आपल्या सखीलाही विसरली होती ! वेगळीच धुंदी वेगळंच हिरवेपण तिच्या मनात अंकुरलं होतं ! आणि तेच तिला बेभान करीत होतं ! सुटी संपल्यावर तिचे यजमान नोकरीच्या गावी जायला निघाले. तेव्हा मात्र पुन्हा तिने थरथरलेपण भोगलं होतं. आयुष्यभराचा धीर एकवटून नागवेलीप्रमाणेच लटपटत्या मनाने तिनं विचारलं होतं...

"आता, कंदी याल तुमी ?"

"यिल, आता सुट्टी भेटल्यावर !"

"नायी ! मले तठी, तेल्हाऱ्याले कदी नेनार ?"

"हे पाय तठी खोली हाये निऱ्हा लान ! त्यात संसार काई निभत नायी. त्यापरस तू अशीच राय ! मायलेइ आसरो व्हते. आन सुट्टीत मी अठी येतोच !"

आता मात्र ती उन्मळून पडण्याच्या बेतातच होती. पण तिने मनाला सावरले. नवऱ्याची तयारी करून दिली. पण ... तयारी करतानाही दिली तिला तिच्या मैत्रिणीचं विमलचंबोलणं आठवत होतं

"अव ! बंबईले खोल्याच भेटत न्हाईत. आमाले निऱ्हा या न्हानीएवढीच खोली हाये. त्यातच रा लागते."

तिला वाटायचं.........विमलचा संसार लहान खोलीत होऊ शकतो ! मग आपलाच का होऊ शकणार नाही ! पण ती नागवेलीगतच मुकी झाली होती ! नवोढा पत्नीगत बुजली होती. पण... नंतर मात्र तिला नवऱ्याने तेल्हाऱ्याला न नेण्यामागचं कारण समजत होतं तिथे म्हणे, एक नर्स होती ! आणि तिचं आणि तिच्या नवऱ्याचं, कुंकवाच्या धन्याचं, काहींतरी लफंड होतं. आणि त्यामुळेच तो तिला, तिथे न्यायला तयार नव्हता. पुन्हा ती उन्मळता उन्मळता सावरली होती, आईवडिलांच्या मायेच्या चिवट धाग्याने...मग मात्र तो सुटीतही येईनासा झाला. ती आपली रोजच आंघोळीनंतर आरशात कुंकू लावायची. मनागत गोल रेखायची, पण आता त्या कुंकवाचा चेहराच अस्पष्ट होऊ लागलेला ! मग मात्र तिने आपल्या जुन्या सखीला पुन्हा साद घातली. आणि तिचा हिरवेपणा लुटून आपल्या तापल्या जीवावर लेप देऊ लागली.

पण आताआता वेगळंच घडायला लागलं... तिचा नवरा दर सुटीत यायला लागला. आणि... तिला पैसे मागू लागला. एक तारखेला तो विनाशोभाट, पगार नर्सच्या चरणी वाहायचा, आणि आपल्या गरजा भागवायला हक्काच्या बायकोपाशी यायचा. आज सायकल हवी, तुझ्या वडिलांना मागून दे ! आज रेडिओ हवा, तुझ्या वडिलांना मागून दे ! ती आपली दोन्हीकडून पेचात पडायची......आणि सांडशीत सापडलेल्या जीवागत तळमळायची.......वडिलांच्या आधीच वाटण्या झालेल्या ! त्यात हिश्यावर आलेलं तांडं हिच्या लग्नासाठीच विकलेलं ! त्यादिवशी मात्र तिने स्पष्टच सांगितले.

"हे पा ! आता मी बापूले पैसे मांगणार नायी !"

"चाल्ली जाय न मंग त्याच्या घरी ! रायतं कायले यठी ? म्या काई तुले हे डोमळं कातळं पावून केलं नायी ! म्हनलं... बापाले एकली हाये. आपल्या कामात यीन ?"

"तुमाले वागोयाचं असीन त वागोवा ! पन मी पैसे मांगनार नाही !"

तिनं असं म्हणताच तिच्या नवऱ्याचा राग अनावर झाला. "तोंडोतोंडी येते रांड !" असं म्हणून, त्यानं तिला काठीने बदडायला सुखात केली. दर सुटीतच असं घडायला लागलं...बरं...माहेरी जावं ? तर...तिला वाटायचं ! आधीच आपण एकुलत्या ! आपल्या संसाराचं रामायण पाहून आईवडिलांना दु:ख व्हायचं. ती आपली मुक्यानेच घाव सोशीत होती. आणि तांड्यात आल्यावर दु:ख विसरत होती.

आजतर तिच्या नवऱ्याचा राग खूपच अनावर झाला होता. काठी न सापडल्याने, त्याने चुलीतल्या लाकडानेच तिला बदाडले होते. आणि तिचे सगळे अंग, काळपट डाग पडल्यामुळे, नांगीलच्या पानासारखे-भाजून निघाले होते. न जेवताच ती मळयात आली.

टोपलं ठेवलं. तांड्यात शिरली. तसा तो हिरवेपणा तिला पुन्हा भुलवू लागला. ती मनाला ताकीद देऊ लागली...या हिरवेपणाला भुलायचं नाही !

तिला वाटलंच...आपलं जीवनंही अस्सं नागवेलीगतच आहे ! आपणही आधाराला वृक्ष समजून कवटाळलं ! तो वृक्ष नव्हताच ! तर...नागवेलीप्रमाणेच तिच्या नशिबी आला होता, एक बांवू ! आणि तोही कुजलेला ! ती मात्र आपलं...सर्वस्व या नागवेलीगतच लुटत होती आणि नागवल्या जात होती' तिच्या आईवडिलांसह !

पण बाबांनो ! नांगीलचं पान हे खायलाच असते, पण जरा सावकाशीने खा ना ? त्यात काथ टाका ! चुना टाका ! सुपारीचं खांड ! आणि मग पहा ? विडा रंगतो की नाही ?

आज ना उद्या, ती एकटीच असल्याने वडिलांचा पैसा त्यांची जमीन, त्यांची इस्टेट, तिचीच होती ना ? पण म्हणून...त्यांच्या देखतच त्यांना मागत लुटायचं ? ते स्वतः या लग्नामुळेच कर्जबाजारी असतानाच ? मग त्यांच्या म्हातारपणाचं काय ? कोण त्यांची काळजी घेईल ? विचारांनी तिचं डोकं फुटायची वेळ आली होती. पुन्हा पुन्हा ती उन्मळून पडण्याच्या बेतात होती. आज मात्र असह्य झालं होतं. तिच्या नवऱ्याने, तिला स्पष्ट बजावलं होतं.

" तुज्या बापाले दोन हजार मांगून आन ! नाई त मायायठी राबू नोको. मी तुले उवं कापून टाकणार हावो. "

तिला वाटलंच...कशाला राहायचं मग इथं ? नाहीतरी तिच्या भावना नागवेलीच्या पानागत खुडल्या जात होत्याच. तिच्या आकांक्षा विकल्या जात होत्याच. नवतीचा सगळा बहर तर ओसरत होताच. आणि तो मात्र दुसरीतच गुंगला होता. रमला होता. काय अर्थ आहे, अशा जगण्यात ? खुशाल माहेरी जावं...वडिलांच्या कुशीत शिरावं...सगळं सांगावं...आणि सगळेच पाश तटातट तोडून टाकावेत...पण... मग खरंच ' आपल्याला जगता येईल ?

न जगता यायला काय झालं ? नाहीतरी इथे कोणतं सुख आहे ? नवरा असून नसून सारखाच ! उलट तिच्या नवथर भावना नवतीच्या पानागत तो खुडतोच आहे. पुन्हा कचाकच चावून त्या पानागत, तो थुंकतोच आहे. त्याला कुठे हवं आहे—तिचं नवतीच्या भावनांचं पान ? त्याला कुठे वेळ सबुरी आहे. त्यात काथ व चुना टाकायला ! तिच्या मनाच्या तळाशी मात्र नागवेलीगतच भुंड्या काड्यांची वेटोळी तयार झाली आहे. सगळ्या रूक्ष भावना... भावनावेगाने ती नागवेलीच्या साक्षीनेच थरथरत होती ...व्याकूळ होत होती...विव्हळत होती....

हळूच ती समोर गेली. आणि एका नागवेलीला अलगद बांबूपासून सोडवले. तशी ती लटपटली आणि अलगद भुईवर झेपावली. हे पाहताच तिला बरं वाटलं म्हणजे...वेल उन्मळून पडलीच नव्हती ! ती फक्त भुईसपाट झाली होती. बांबूचा आधार तुटताच जमीनीवर झेपावली होती.

आणि पाहता पाहता तिलाही वाटलंच...आपणही असाच आधार सोडावा...अलगद मोकळं व्हावं...आणि भुईवर कलंडली ! आणि गडबडा लोळत मोठमोठ्यानं हसायला लागली.


"येवू नसला तरी नांगील मरत नाही. ते फकत पायदयनी पळते. तुडोल्या जाते. "

असे म्हणत ती हसू लागली...हसता हसता रडू लागली...नागवेलीच्याच साक्षीनं !

△ △ △

आभार !

कथास्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व कथाकारांचे आभार. श्री. प्रभाकर पुराणिक यांनी या कथांना क्रम दिला. प्रथम क्रमांकावर आलेली ही कथा प्रा. नवनीत देशमुख यांची आहे. कथेसोबतच्या नामनिर्देशात 'नववीत' देशमुख असा उल्लेख आहे, तो चूक आहे. द्वितीय क्रमांकाची कथा सौ. प्रतिमा इंगोले यांची आहे. उत्तेजनार्ह ठरलेल्या दोन कथा युगवाणीच्या पुढील अंकात.



॥ संवाद ॥

अनुक्रमणिका

नव्यांचे व्यासपीठ व्हा

मनोहर सप्रे

कुठलीही संस्था वरवर एक रचना असली तरी तिची मूळ निर्मिती प्रयोजन-स्वरूप असल्यामुळे तिच्या अस्तित्वाचे समर्थन हे प्रयोजन पार पाडण्याच्या तिच्या कार्यक्षमतेवरून करता येते. याच दृष्टीने मी वि. सा. संघाला संस्था न मानता 'एक कार्य' मानतो. हे कार्य कोणते हा या दृष्टीने सर्वप्रथम महत्त्वाचा प्रश्न ठरतो.

समाजात चालणाऱ्या विविध कार्यात्मक प्रक्रियांत सुसंगती आणि नियोजनबद्धता यावी म्हणून संस्था अपरिहार्य ठरतात. या दृष्टीने त्यांचे अस्तित्व ही एक लाभदायक बाब ठरते, पण या सोबतच संस्था या परंपरेच्या त्वरित वाहक ठरतात. हा त्याचा एक ठळक दोष असतो. सिद्धांत कायम ठेऊन व्यवहार सहज बदलता येत असल्यामुळे बहुतेक संस्थांची मूळ उद्दीष्टांपासून फारकत होते व नकळत त्या प्रस्थापितांच्या हातचे साधन बनतात. बदलाची मागणी करणारे व या संस्था यांच्यात मग संघर्ष सुरू होतो. बदल नाकारून ज्या संस्था टिकून उरतात त्यांची स्थिती 'सिंह आला पण गड गेला' अशी होते. आमची अ. भा. मराठी साहित्य सम्मेलने हे याचे उत्तम उदाहरण आहे. आजवर भारतात शिक्षण हा प्रचारच मुळी मूठभर उच्चवर्णियांपुरताच सिमित राखण्यात आला होता. त्यामुळेच वाचक आणि लेखक दोन्ही या वर्गापुरतेच मर्यादित ठरले होते.

स्वातंत्र्यापूर्वीच्या सामाजिक चळवळी आणि नंतरच्या स्वातंत्र्याने सोबत आणलेल्या शिक्षणाच्या सोयी आणि सवलती यांनी भारतीय इतिहासात प्रथमच सुशिक्षित वर्गाचा विस्तार झाला. यातूनच वाचक आणि लेखक या वर्गाचाही विस्तार झाला. नव्या लेखकांनी आपापल्या वर्गाच्या संवेदना शब्दांकित केल्या. मग या नव्या साहित्याला मराठी साहित्यात स्थान मिळावे ही मागणी होणेही अटळ ठरले. नव्यांनी स्वत:सोबत आणलेली साहित्य-समृद्धी नाकारण्याचे करंटेपण प्रस्थापितांनी केले. त्यामुळे मूळ सहकार्यासाठी समोर आलेले हात संघर्षासाठी सिद्ध झाले. साहित्य-सम्मेलने उधळणाऱ्यांना नांवे ठेवणाऱ्यांनी त्यामागचा मूळ उद्देशच दृष्टीआड केला. हक्काची कोणतीही चळवळ सुरुवातीला आततायी असते पण तीमागचा मूळ उद्देश 'तोडणे' हा नसून 'जोडणे' हा असतो, हे लक्षात घेतल्या जात नाही. सुरुवातीची दलित चळवळ मूळ स्वीकाराची चळवळ होती; पण ते अशक्य केल्या गेल्याने तिचे पर्यावसान पुढे धर्मान्तरात झाले. आज साहित्य-सम्मेलने उधळणे बंद झाले आहे. कारण दलित साहित्य चळवळ प्रस्थापितांपासून विभक्त होऊन आता स्वतंत्र झाली आहे. वस्तुत: हा जय नसून पराजयच आहे. आपले प्रयोजन पार पाडताना हा सगळा संदर्भ वि. सा.

संघाने लक्षात घ्यावा असे आवर्जून सांगावेसे वाटते. बदलांच्या प्रक्रियेत जुने जसे धरून ठेऊन कायम टिकवता येत नाही तसे भविष्यही फार अलिकडे ओढून आणता येत नाही. वर्तमानाच्या 'क्षण-पातळीवर' 'असणे' हा जीवनाचा मूळ धर्म आहे. वर्तमानाचे हे चिरतारुण्य हाच कोणत्याही संस्थेच्या निरोगीपणाचा एवमेव निकष ठरतो. वि. सा. संघ सदैव समकालीन ठरावा ही या दृष्टीने एक अपेक्षा आहे. दारिद्र्य आणि मागासलेपणाचा वारसा असलेल्या विदर्भात नव्या कल्पना, नवे प्रयोग, औद्योगिकरण आणि त्यातल्या नव्या संभाव्यता यांच्या माध्यमातून आधुनिकीकरण येऊ घातले आहे. या संदर्भात नव्या-जुन्यांच्या सीमारेषेवर संघर्ष अटळ आहेत. या संघर्षातून सध्या जात असलेल्या नव्या जाणिवा अभिव्यक्तींसाठी व्यासपीठ शोधताहेत. त्यांना वेचून त्यांच्या समोर एक रंगमंच म्हणून वि. सा. संघाने सादर होण्यात त्याचे प्रयोजन साठवलेले आहे.

वि. सा. संघाने कला-चळवळी उभाराव्यात ही अपेक्षा बाळगणे चूक आहे, कारण ते त्याचे प्रयोजन नाही. कुठल्याही कलात्मक चळवळीसाठी हे व्यासपीठ उपलब्ध आहे असा विश्वास देणारे वातावरण तयार व्हावे व ते कायम रहावे; यातच वि. सा. संघाचे सार्थक आहे. तशा कलात्मक चळवळी आकाशवाणी, वृत्तपत्रे, संगीत सम्मेलने, नाटके आदि इतर प्रसारण माध्यमातूनही अभिव्यक्त होत असतात. या सगळ्यांना एका प्रातिनिधिक भूमिकेतून संघटित करण्याची निकड पूर्ण करण्यात वि. सा. संघाने यशस्वी ठरावे हीच या हीरक महोत्सवाची शुभेच्छा.

△ △ △

वि. सा. संघाचे अध्यक्ष

(१) स्व. न्यायमूर्ती केशवराव कोरटकर (१४ जाने. १९२३ ते १९३७) (२) स्व. लोकनायक डॉ. माधव श्रीहरी अणे (१९३७-४४) (३) स्व. प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी (१९४४-४५) (४) स्व. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे (१९४५) (५) श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे (१९४५-४६) (६) डॉ. वि. भि. कोलते (१९४६-४८) (७) स्व. प्रा. डॉ. माधव गोपाळ देशमुख (१९४९-५०) (८) स्व. ग. त्र्यं. माडखोलकर (१९५०-५१) (९) स्व. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे (१९५१-५२) (१०) स्व. डॉ. शं. दा. पेंडसे (१९५२-५३) (११) स्व. डॉ. भ. श्री. पंडित (१९५३-५४) (१२) स्व. प्रा. ह. ना. नेने (१९५४) (१३) स्व. बाबासाहेब खापर्डे (१९५४-५६) (१४) श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे (१९५६-५९) (१५) श्री. ना. रा. शेंडे (१९५९-६२) (१६) स्व. श्री. आ. रा. देशपांडे (१९६२-६५) (१७) प्रा. श्री. वामन कृष्ण चोरघडे (१९६५-६८) (१८) स्व. ग. त्र्यं. माडखोलकर (१९६८-७१) (१९) स्व. दि. ब. पंडित (१९७१-७२) (२०) डॉ. वि. भि. कोलते (१९७२-७४) (२१) स्व. आ. रा. देशपांडे (१९७४-७७) (२२) डॉ. मधुकर आष्टीकर (१९७७ पासून).

समकालाचा चेहरा नाही

यशवंत मनोहर

वाचकपणा प्राप्त झाला तेव्हापासून बघतो आहे; मराठी साहित्यातील रंगपंचमी, लक्ष्मीपूजन, नरकचतुर्थी आणि गणपतीउत्सव. असे गणपती उत्सव ज्यात गणपती बसवणारे वेगळे असतात आणि उठवणारे वेगळेच असतात.

–त्याहून बघतो आहे विदर्भ, विदर्भ साहित्य संघ आणि त्याचे एक शून्य मासिकराव युगवाणी ! एखादा माणूस कायम खाटेला खिळून राहावा आणि क्रमाने तो लोकांच्या लेखी संपल्यात जमा व्हावा, तसे हे युगवाणी मासिक कायम आसन्नमरण. " पोर खाटेवर " प्रमाणे.

समुद्र आणि सत्ताकेंद्र असल्याने केवळ, मुंबई मराठी साहित्याचीही राजधानी बनलेली आहे. आधुनिकत्वाच्या प्रारंभकाळी हे राजधानीपण पुण्याच्याही वाटचाला आले आहे. पण काही मान्यवर प्रतिभावंतांचे अपवाद वजा जाता आजवर पुण्याने डोक्यावरली महापगडी काही काढली नाही...आणि मुंबईने तिकडे डोक्यावरली हॅट काढली नाही...हे आजवर ! शैल्यांचे नवनवे नेत्रदीपक नखरे व्हाया मुंबईच मराठीत पसरले. पण या शैलींच्या तंत्रयुक्त्याद्वारा मुंबईचे जे मन मराठीच्या साहित्यात जमा झाले ते मात्र सनातनीच होते. शैल्या नव्या, आधुनिक–इंग्रजीतल्या. मन मात्र जुने–मध्ययुगीन. हे दुखणे तर मराठी साहित्याच्या वाटचाला आलेले हमेशाचेच आहे. आता औरंगाबाद समर्थपणे हक्क सांगत पुढे येत आहे. धुळे, मनमाड, कोल्हापूर, सातारा अशी नवनवी केंद्रे जागृत होत आहेत. प्रज्वलंत होत आहेत. ठिकठिकाणी अशी नवी सामध्ये वादळून येत आहेत. पण विदर्भ, विदर्भ साहित्य संघ आणि त्याचे एक शून्य मासिकराव साहित्यकलातील जिवंतपणाच्या सर्जनाच्या संदर्भात, काही नवे वादळ उभारण्याच्या संदर्भात केवळ असमर्थ ठरत आहेत. यापुढेही हीच प्रगती राहिली तर विदर्भ साहित्य संघाला 'दर्भ साहित्य संघ' हेच नाव पडून जाईल.

असे दिसते की विदर्भ ही सरस्वतीची जन्मभू आहे. या एका वाक्याच्या समाधानात विदर्भ आजवर निवांत झोपू शकला. पण प्रत्यक्षात विदर्भ ही सरस्वतीची जन्मभूही नाही आणि विलासभूही नाही, हे आता कठोर नजरेने पाहता आले पाहिजे. येथील साहित्यातील प्रातिनिधिक मने पारंपारिक आहेत. ती नव्या जाणिवांचे सजंक होऊ शकत नाहीत. नव्याला सामोरी जाऊ शकत नाहीत. नव्या जाणिवांचे उड्डाण घेऊ पाहणारी किंवा नव्याला सामोरी जाणारी प्रतिभा इथे गौरविलीही जात नाही. वाङ्मयात विदर्भ कुणाला मोठे करू शकत नाही. मोठे झालेल्या कुणाला मोठे म्हणू शकत नाही. पुण्या–मुंबईच्या निर्णयांवर उदर-

निर्वाह करण्यांत विदर्भ धन्यता मानतो. नाहीतर परंपरासंवर्धक कौल देऊन मजेत राहतो. विदर्भात साहित्याचे, कलांचे, रसिकतेचे हवामान का नाही? हा सततचा वाटावा असा प्रश्न आहे. दिवाळी, गणपती उत्सव, शिमगा, रामनवमी, दसरा, जुनी भजने–कीर्तने, यात्रा–उत्सव, शारदोत्सव, सतिमाया, बाबा–बुवांचे उत्सव, मोठ्या राजकीय नेत्याचे आगमन, सिनेमा यांच्या तुलनेत विदर्भात साहित्याला काहीच किंमत नाही. विदर्भातली पुस्तकेही पुणे–मुंबई घेईल तेव्हा खपतात. अन्यथा लेखक–प्रकाशकांच्या घरी थप्प्या पाहून घ्या! इकडच्या लेखकांचेही साहित्यिकपणावर जेवढे प्रेम असते तेवढे साहित्यावर कधीच नसते. अशी ही उच्च दर्जाची रूक्षता, निःसंदर्भता. कुठली उत्कट गोवणूकच नाही. सिनेमाची गाणी आणि जुनी भजने ह्यावर पोसलेले इथले सामान्य मन स्वरांतून काहीही दिले तरी मजेने हसत पचविते हा विशेष मात्र डोळ्यात भरावा असाच आहे...तरी साहित्यिक राजकारणात दुय्यम कचरा म्हणून येथील साहित्यिकसमाज सतत उत्साहाने भूमिका वजावीत आहे...आणि वाङ्मयात विलक्षण हौसेने जिलक्र्याची...काही गोष्टींना मोलच नसते. अर्थात् व्यक्तिगत सामर्थ्याने मस्तीत फुलणाऱ्या चारदोन अपवादांबद्दल हे खोटे ठरेल, हे खरेच आहे.

तर असे का घडत आहे? नव्या प्रेरणा, नवी उद्दीपक सामर्थ्ये इथे का उभारली जात नाहीत? आम्हाला समुद्र नाही ही तक्रार कुणी करू शकला तर ती खरीच आहे. तरीही मोठमोठी बंदरे तर आमच्याकडे आहेतच की नाही? तेव्हा उपरोक्त सुतक कशाखातर? तर विदर्भाची एकूण प्रकृतीच सांस्कृतिक, वाङ्मयीन-दृष्टचा सुन्न आहे. स्थितिशील आहे...काही तरतरीत लोक यात्रेला वा शहरगावी जातात. तिथून काही हलके-सलके आणून यात्रेला वा शहरगावी न गेलेल्यांना दाखवून भाव खातात. आपणच त्या बनविल्याचा आविर्भाव आणून लोकांना बनवितात. यात्रेला वा शहरगावी न गेलेल्यांनाही हे सर्व भारी वाटत असते. त्याप्रमाणे असे वा तसे पाश्चात्य खाणींशी संपर्क साधून असलेले इकडील गावठी नजरांना प्रभावीत करीत असतात. म्हणजे मुळात उष्टे खाणारे हेच ज्यांचे आदर्श, त्यांचे काय खरे असणार असा प्रश्न आहे. तरी गर्भहौशींचे नृत्यसमारंभ आणि प्रदर्शने नित्य सुरूच असतात. तक्रार याबद्दल नाही, तक्रार विदर्भाची रसिकता इथेच मोक्षप्राप्ती करून घेते इथे आहे.

खरे तर असे आहे की मुंबई दुसरी कार्बन कॉपी आहे. पुणे–औरंगाबाद तिसरी, चौथी. इतरत्र नंतरच्या दोनतीन कॉपीज होतात. विदर्भात पार फेन्ट सातवी–आठवी वगैरे. तर असे का? याची कारणे इथल्या विलक्षण मातीत असली पाहिजेत. प्रमुख साहित्य संस्था या नात्याने विदर्भ साहित्य संघाच्या प्रकृतीत असली पाहिजेत. इथल्या वाङ्मयातील कर्त्यासिरवत्या मंडळींच्या वाङ्मयीन बांधिलकीत असली पाहिजेत. एरव्ही साहित्य संघाला, युगवाणीला सतत या विदर्भात नव्या ठिणग्यांची पेरणी करता आली असती. नवे तेजःपुंज वातावरण उभे करता आले असते. पण हे झाले नाही. आणि आजवर साहित्य संघ व युगवाणी ज्या स्थितीत आहेत ती स्थिती कायम ठेवून काही होणे शक्यही नाही. माणिकरावांच्या नंतर निदान काही अंगांनी सजीव झालेली युगवाणी जी पुढे खाली टाकली गेली ती अजूनही त्याच अवस्थेत आहे. साहित्याच्या युद्धआघाडीवर आज काय चालले आहे याची गंधवार्ताही युगवाणीला नसते. जेव्हा तिला ते कळते त्यावेळी कलेऐवजी कलेवर उरलेले असते. म्हणजे एखादा प्रश्न म्हातारा झाल्याशिवाय युगवाणीला दिसतच नाही. हे तिचे वृद्धप्रेम. युगवाणीला अशाप्रकारे गतयुगवाणी होण्याची सतत ओढ दिसते.

अशा या साहित्यसंघासंबंधी, त्याच्या एक शून्य मासिकरावासंबंधी काही उत्साह – अपेक्षा वाटावी असे कधी वाटतच नाही. येथील काही थोडेच साहित्यप्रेमी साहित्यिक यांचा साहित्य संघ व युगवाणी यांच्याशी संबंधच नाही. साहित्याशी मात्र आहे. म्हणजे साहित्य संघ वा युगवाणी नसले तरी काही महत्त्वाचे मनस्वी आपल्या मस्तीत अस्तित्वात असतातच. त्यांच्यासाठी संघ वा युगवाणीची गरज लागत नसली तरी नव्या नव्या प्रश्नांना भिडणे, नव्या जाणिवा जन्माला घालणे, नव्या जाणिवांनी उत्कटून आलेल्या मनांचा वेध घेणे, नव्या प्रेरणांची वादळे उभी करणे इत्यादी गोष्टी साहित्यसंघाने व्यापक प्रसाराच्या दृष्टीने करायला काहीच हरकत नाही.

दलित साहित्याची गेल्या पंधरा/वीस वर्षात मराठीत एक मध्यवर्ती साहित्य प्रवाह मानून सतत चर्चा होत आहे. अस्मितादर्श तर सोडाच पण प्रतिष्ठान,

सत्यकथा, समाजप्रबोधन पत्रिका, नवभारत इत्यादी मासिकांनीही त्या संदर्भात जाणकारांचे लेखन प्रसिद्ध केले. सातारा, महाबळेश्वर, जालना अशा अनेक ठिकाणी दलितेतर साहित्य संस्थांनी शिबिरे, परिसंवाद इत्यादी उपक्रम केले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी साहित्य-सम्मेलने भरली, मेळावे भरले. माय मराठी, हिंदीतील संचेतना इत्यादी मासिकांनी, महाराष्ट्र टाईम्स, केसरी, सकाळ, युगांतर इत्यादी दैनिकांनी, साप्ताहिकांनी पुरवण्या काढल्या. साहित्य संघाला असे का करता येऊ नये ?

काही वर्षांपूर्वी भद्रावती मुक्कामी पहिले आदिवासी साहित्य सम्मेलन भरले. वणी मुक्कामी मागील्या वर्षी दुसरे साहित्य सम्मेलन भरले. परंतु साहित्य संघ वा युगवाणी यांना या आणखी एका नव्या उन्मेषाच्या संदर्भात अजूनही कोणतीही आस्था नाही. पुढे ती किती वर्षांनी वाटेल ते सांगता येणे सोपे नाही.

नाव घेण्याजोगे एकही मासिक नसलेल्या या विदर्भात युगवाणीला नाव घेण्याजोगे असे एकतरी व्हायला काही हरकत नव्हती. परंतु युगवाणीला असे काही करता आले नाही. इतर साहित्य व्यवहारांच्या संदर्भात सोडाच; पण दलित साहित्यांपुरता जरी विचार केला तरी विदर्भात काही मंडळी दलित साहित्याशी सक्रीय संबंध ठेवून आहेत. युगवाणीने दलित साहित्या-संबंधी विदर्भातून काहीच लेखन का करू नये ? विदर्भातील दलित साहित्याचा आवाज तिने का प्रकाशित करू नये ? या नव्या विद्रोही जाणिवेने भारतभर आगडोंब उठवला. पण युगवाणीच्या ते गावीही नव्हते. युगवाणी साहित्यातील केंद्रीय प्रश्नांपासून सतत दूर होती. साहित्याच्या मध्यधारेपासून ती दूर होती. वेळोवेळी वादळी रूप धारण करणाऱ्या वाङ्मयीन व जीवनविषयक प्रश्नांपासूनही दूर होती. याला काय कारण असावे ? विदर्भाची विशेषतः त्यातील नागपूर या गावाची पुरातन संस्कृती आणि येथील सांस्कृतिक जीवनात वजन मिळवून असलेल्या परंपरावादी शक्ती तर याला कारण नसाव्यात ?

युगवाणी हे नाव किती सुंदर ! समर्पक. पण ही युगवाणी कालच्या स्थितिनिष्ठ युगालाच वाणी का देत राहिली ? समकालाचा चेहरा युगवाणी का धारण करू शकली नाही ? ती भूतवाणी का ठरली ? ती प्रस्थापिताच्याच वर्तुळात का कोंडली गेली ? येथील साहित्यिक जाणिवांचे माप देशोदेशी नेणारे, नवतेच्या जाणिवा जन्माला घालता येऊ शकणारे माध्यम असे पंगू का झाले ? ते वृद्ध मानसिकतेचेच माध्यम का झाले ? नवी तरणी माणसे वृद्ध करण्याऐवजी नव्या उसळत्या रक्ताचे प्रकाशनपीठ ते का झाले नाही ? मुळात वाङ्मयीनदृष्टचा खडकाळ असलेल्या विदर्भात युगवाणीने घेतलेली ही प्रेतभूमिका म्हणजे वाङ्मयातला आणि जीवनातलाही मोठा अपराध आहे. साहित्य संघ आणि युगवाणी बंद पडले तरी होत आहे त्याहून कमी नुकसानीची हमी छातीठोकपणे देता येईल. तीन वर्षे मागे यादवांनी 'मसाप'ला स्वजन साहित्याची ड्रॉईंगरूम करून तिच्यावर अत्याचार केला आणि तसेच नसले तरी स्थूल पाहण्याला जाणवणार नाही एवढ्या व्यापक संदर्भात युगवाणीची जरा निराळी पण ड्रॉईंगरूमच होत आलेली आहे.

युगवाणी खऱ्या अर्थाने युगवाणी ठरायचे असेल तर तिने जिवंत जाणिवांशी, जीवनातील आणि वाङ्मयातील आघाडीच्या केन्द्रांशी केवळच नाते जोडले पाहिजे असे नाही; तर नव्या युगसंगत जाणिवांचे बीजारोपणही तिने करायला हवे. त्यासाठी व्यक्तिगत पातळीवर धगधगत असलेली, मराठीतील आघाडीवरील युद्धात सहभागी असणारी येथील चारदोन केन्द्रे युगवाणीने जवळ करावीत. राजकारणाचा, कंपुशाहीचा आणि त्याच्या सत्तासातत्याचा ध्यास घेण्याऐवजी अशी चार दोन जागृत केंद्रे संघाने – युगवाणीने सन्माननीय मार्गदर्शक म्हणून घ्यावीत. पाश्चात्य वाङ्मयीन जगाशी मुंबईचा जसा आणि जितका संबंध आहे त्याहून अधिक घनिष्ठ संबंध संघाने–युगवाणीने विदर्भाचा त्या जगाशी स्थापावा. या संबंधाचे प्रकाशनपीठ युगवाणीने व्हावे. नव्या समांतर जाणिवांचेही सर्जन तिने करावे. असे झाले तर वाङ्मयीन राजधानीचे स्थलांतर कठीण नाही. साहित्य संघ व युगवाणी यांची तशी इच्छा मात्र हवी. तरच त्यांना अभिनवतेची आणि मौलिकतेची, नव्या शैल्यांची आणि नव्या मानसिकतेची एकाच वेळी वाङ्मयीन लागवड करता येईल !

△ △ △

सहस्पंदन हवे...

वामन तेलंग

वीसेक वर्षांपूर्वीची गोष्ट. श्री. ना. रा. शेंडे हे त्या वेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष होते. आज ज्या खोलीत 'अतिथि-कक्ष' आहे त्या खोलीत अध्यक्षांची बैठक असायची. बैठकीचा एकूण थाट पेशवाई पद्धतीचा असायचा. गाद्या, त्यावर शुभ्र चादर, टेकायला लोड-तक्के वगैरे. नव्या दमाने लिहिणाऱ्यांची एक पिढीच त्यावेळी अमरावतीला होती. मधुकर केचे, सुरेश भट, तुळशीराम काजे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार हे मान्यवर, तर ग. गु. चौधरी, सुलभा हेर्लेकर, प्रभाकर सिरास, वामन तेलंग, ललित् सोनोने, शंकर विटणकर आदी नवोदित. नागपूरला जयंत देवधर, मनोहर अपो-नारायण, सुधाकर नायगांवकर आदी मित्रमंडळी होती. 'युगवाणी' त्याही वेळी प्रसिद्ध व्हायचे, पण वरील-पैकी कुणाही नवोदिताचा 'युगवाणी'त समावेश नसायचा. साहित्यिकदृष्ट्या त्यावेळीही 'युगवाणी'-पेक्षा मराठवाडा साहित्य परिषदेचे 'प्रतिष्ठान' आणि 'सत्यकथा' जुन्या-नव्या लेखक-कवींना अधिक 'आपली' वाटायची. वि. सा. संघ आणि तेथील पदा-धिकारी 'जवळचे' वाटायचेच नाही. सायंकाळी चुकून वि. सा. संघाच्या कार्यालयात गेलो तर अध्यक्ष त्यांच्या कक्षात 'वोर्नव्हिटा' घेत असलेले आढळायचे. नवो-दितांची वास्तपुस्त नाही की साधा शिष्टाचार नाही. नव्याने कोण काय लिहितय् याची अध्यक्षांना जाणीव नसायची आणि त्याविषयी चौकशी करण्याइतके त्यांचे साहित्यिक मन संवेदनशीलही नसायचे. त्यामुळे नव्याने लिहिणारांचा अड्डा त्यावेळी व्हेरायटी चौकातील लाला-जीच्या पानाच्या ठेल्यावर किंवा तेथील दुकानांच्या पायऱ्यांवर असायचा.

वि. सा. संघाच्या अध्यक्षांचे कार्यालय आज वरच्या मजल्यावर गेले आहे. बैठकीचा पुणेरी थाट जाऊन अध्यक्षीय कक्षाला अत्याधुनिक स्वरूप प्राप्त झाले आहे-आणि वि. सा. संघ, त्याचे पदाधिकारी, 'युगवाणी' आजही नव्याने लिहिणारांपासून, नव्या साहित्य चळवळीपासून वा प्रवाहापासून पूर्वीइतकीच अलिप्त आहे.

* * *

परवा अमरावतीला काही तरुणांची बैठक झाली. त्यात लिहिणारे होते, न लिहिणारेही होते. ओसंडता उत्साह हेच कदाचित त्यांचे भांडवल असेल. पण, वऱ्हाडसाठी वेगळी साहित्य संघटना बांधावी, असे त्यांनी बोलून दाखविले. वि. सा. संघ त्यांना आपला वाटला नाही. वाटत नाही. साहित्य-चळवळीच्या संदर्भात या तरुणांचे स्थान न-गण्य असेलही; पण एक वस्तुस्थिती

त्यांच्या एकत्र' येण्यावरून स्पष्ट होते–वि. सा. संघ–त्या अंतर्गत होणाऱ्या साहित्य–चळवळी त्यांना आपल्या वाटत नाहीत.

*   *   *

संवादाच्या अभावीच असे होते का ?

नाही.

विदर्भ साहित्य संघाचा तसा उल्लेख इथे गौण आहे. कारण कुठल्याही प्रस्थापित साहित्य संस्थांच्या बाबतीत हेच घडते.

संस्था ही एका विशिष्टच चौकटीतून जात असते, तर साहित्याच्या एकूणच कलेच्या क्षेत्रात चालणाऱ्या अशक्त, सशक्त, तथाकथित आणि खऱ्याखुऱ्या 'चळवळी' चौकटी मोडूनच उभ्या होत असतात. चळवळीमध्ये–खळाळत्या प्रवाहामध्ये–हरघडी काही तरी नवे घडण्याची–घडवण्याची उफाणती वृत्ती असते, तर संस्था–संचालनात, संस्थांच्या कारभारात पारंपारिक व्यवस्था अधिकाधिक दृढमूल करण्याचा–ती व्यवस्था सातत्याने जपण्याचा भाग महत्त्वाचा असतो. स्वाभाविकच संस्था आणि चळवळी यांचे नाते परस्परपूरक ठरण्याची संभाव्यता कमीत कमीच असते. कित्येकदा तर, अशी संभाव्यताही प्रकट होऊ नये असेच चळवळी आणि संस्था यांचे नाते असते.

वरील कथनाचा एक निष्कर्ष असा येतो की, कलाक्षेत्रातील चळवळी हे साहित्यसंस्थांचे कार्यक्षेत्रच नव्हे. एका अर्थी हा निष्कर्ष बरोबरच आहे; पण तो पूर्णत: बरोबर आहे, असे म्हणता येणार नाही. त्याचे कारण असे की, संस्थांमध्ये आणि चळवळींमध्ये–दोन्ही बाजूला शेवटी काही प्रेरणा, काही तत्त्वे, काही विचार आणि सक्रिय प्रतिभा अग्रेसर असतात. काही व्यक्तिमत्त्वे प्रभावी ठरत असतात. दोन्ही क्षेत्रातील नेतृत्वाची धुरा सरतेशेवटी कुणातरी व्यक्तीकडे असते ही व्यक्ती त्या त्या प्रवाहाला वळण देत असते.

याच ठिकाणी एक आणखी प्रश्न उपस्थित होतो. कलेच्या क्षेत्रातील प्राय: सर्वच स्थापित संस्थांकडून हा प्रश्न उपस्थित केला जात असतो. हा प्रश्न असा : कलाक्षेत्रातील चळवळींचे प्रस्थापित संस्थांनी नेतृत्व करावे म्हणजे नेमके काय करावे ?

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. एरवीच्या परिस्थितीत संस्थांकडून हा प्रश्न विचारला जात नसतो. परंतु जेव्हा जेव्हा कलाक्षेत्रातील चळवळी अधिक सक्रिय असतात, भरात असतात आणि प्रस्थापित संस्था त्याकडे थंडपणे पाहात असतात व त्या संदर्भात जेव्हा प्रस्थापित संस्थांविरुद्ध एकप्रकारचे वादळ घोंगावू लागते तेव्हाच हा प्रश्न उपस्थित केल्या जात असतो. पण ते असो. मुद्दा असा की, प्रस्थापितांकडून हा प्रश्न समोर फेकला जातो. संस्थांकडून येणारा हा प्रश्न – चळवळींच्या प्रेरणांच्या संदर्भात तसा तकलादू असला तरी त्याचे उत्तर देणे आवश्यक ठरते. आणि या प्रश्नाचे उत्तर 'आयडेंडिटी' असे आहे.

कलाक्षेत्रातील चळवळी आणि त्या क्षेत्रात वावरणाऱ्या प्रस्थापित संस्था यांच्या 'आयडेंटिटी'चा मेळ साधला जाणे, महत्त्वाचे आहे.

विदर्भातील सक्रिय कलावंत आणि विदर्भ साहित्य संघ यांच्यात वीस वर्षांपूर्वीही कधी सह–स्पंदन नव्हते आणि ते आजही नाही.

ललित वाङ्‌मयाच्या क्षेत्रात वावरणारे विदर्भातील लेखक / कवी 'युगवाणी'शी संबंधित नसतात; रंगभूमीवर काही तरी करून जाणारे कलावंत वि. सा. संघाच्या तथाकथित नाटच–आघाडीशी फटकूनच वागणारे असतात, चित्रकला, संगीत आदी वेगवेगळ्या ललितकलांचीही स्थिती हीच असते. वेगवेगळ्या कलाप्रकारांचे सोडा, पण कुठल्याही एका तरी कलाप्रकारातील घडामोडींशी वि. सा. संघाचा प्राणभूत संबंध दिसून येतो का, असा प्रश्न जर विचारला तर दुर्दैवाने त्याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागते. आणि माझ्या मते तरी, याचे कारण असे आहे की, या दोन बाजूत कोणत्याही पातळीवर सह–स्पंदनच नाही, 'आयडेंटिटी' नाही. विदर्भ साहित्य संघाने काय किंवा अन्य संस्थेने काय, कलाक्षेत्रातील घडामोडींबरोबर सहकंप पावणे हा भाग महत्त्वाचा आहे व त्यासाठी नेतृत्व–मनाची मूस तशी असणे आवश्यक आहे.

△ △ △

कलाविकासाचा आराखडा

सुधाकर जोशी

साहित्य व कला यांच्या संवर्धनाची जबाबदारी पूर्वीच्या काळी राजेरजवाडे स्विकारीत असत. लोकशाहीचा अवतार झाला आणि भारताच्या संदर्भातच बोलायचे तर; संस्थाने खालसा झालीत. कला व साहित्याला व त्या अनुषंगाने कलावन्तांना व साहित्यिकांना लाभलेला व लाभणारा राजाश्रय नाहीसा झाला. त्यामुळे निर्माण झालेली पोकळी लोकशाही सरकारांनी राज्यस्तरावर राज्यपुरस्कृत परिषदा, मंडळे तर मध्यवर्ती (भारतीय स्तरावर म्हणा तर) स्तरावर साहित्य अकादमी, ललित कला अकादमी या नावाने संस्था काढून; कला व साहित्य प्रान्तात पुरस्कार नेमून, कलाकृती विकत घेऊन, प्रोत्साहन देऊन, द्रव्याश्रय देऊन; भरून काढण्याचा बराच मोठा प्रयत्न केला.

सरकारी प्रोत्साहनाबरोबर निमसरकारी संस्था, चेंबर्स ऑफ कॉमर्स, मील ओनर्स असोसिएशन्स, वगैरे कारखानदार, व्यापारी आदी धनवन्तांच्या शीर्षस्थ प्रातिनिधिक, संस्थांनीही ह्या प्रोत्साहन व द्रव्यबलाच्या प्रक्रियेला हातभार लावला.

अशा प्रकारे कलावंत व लेखकांच्या वास्तविक पातळीवरच्या अस्तित्वाला सुकर करण्याच्या दृष्टीने पूर्वीच्या काळी राजांचा जो हातभार लागायचा तो नष्ट झाला, तरी ह्या धनिक वर्गाच्या संस्थांनी व लोकशाही सरकारांनी नव्याने सुरू केला व अशा प्रकारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे साहित्य व कलांच्या विकासाचा सक्रीय पाठपुरावा केला असे म्हणायला हरकत नाही.

ह्या संस्थांबरोबरच आणखी काही संस्था ह्या संवर्धनाच्या प्रक्रियेत भाग घेत होत्या व आहेत. त्या म्हणजे विद्यापीठे (भाषा विभाग व कला विभाग) व जनतेच्या स्वयंस्फूर्त प्रयत्नातून निर्माण झालेल्या, हे काम करणाऱ्या स्वायत संस्था. पण ह्या संस्था कलावन्त साहित्यिकांच्या वास्तविक जीवनाच्या प्रश्नांना प्रत्यक्ष न सोडवता सरळच कलासाहित्याशी संबंधित असतात.

विदर्भाच्या संदर्भात बोलायचे म्हणजे नागपूर विद्यापीठाचे भाषा विभाग, नागपूरचे चित्रकला महाविद्यालय, नागपूर स्कूल ऑफ आर्टस, विदर्भात इतरत्र असलेली कला विद्यालये (पंधे गुरुजींचे राष्ट्रीय विद्यालय, खामगांव), हिन्दी साहित्य सम्मेलन व विदर्भ साहित्य संघ. गेल्या दोन वर्षापासून सुरू झालेला नागपूर विद्यापीठाचा ललित कला विभागही यात आहे.

ह्या संस्थांपैकी प्रत्येकीच्या प्रयत्नांवर मर्यादा आहेत. ज्या संस्था सरकारी आहेत, त्यांच्या मर्यादा खालील कारणांमुळे असतात.

१. सरकारी दृष्टिकोण हा निर्मळ कला व साहित्याला पोषक असतोच असे नाही. पक्षीय दृष्टीकोण हा सरकारी दृष्टीकोण झाल्यास तो कलेला व साहित्याला पोषक ठरत नाही, ह्याची कित्येक उदाहरणे देता येतील. साहित्याची पारितोषिके बऱ्याचदा ह्याची चांगली निदर्शक असतात.

२. लालफितशाही.

३. उपयुक्तता हे कलाबाह्य मूल्य सरकारी संस्थांच्या कला दृष्टिकोणाचा पाया असते. कलेच्या स्वयंस्फूर्त विनाअटकाव, स्वतंत्र आविष्काराला हे धोरण मारक असते.

शैक्षणिक संस्थांकडून (उदा. विद्यापीठे) होणाऱ्या कला किंवा साहित्य संवर्धनाच्या व नवनवीन मूल्यांच्या स्वीकाराच्या आड बहुधा ह्या संस्थाचे अगोदर ठरलेले अभ्यासक्रम व ठराविक कालमर्यादा येतात.

उदार धनिक व त्यांच्या संघटना–संस्था (मील ओनर्स असोसिएशन, विदर्भ इन्डस्ट्रीज असोशिएशन, वगैरे) रसिकपणा, व उदारपणा दाखवितात. पण ह्या संस्था वा व्यक्ती अटी लादल्याशिवाय हात पुढे करीत नाहीत. विशेषतः कलेच्या संदर्भात बोलायचे झाले तर एखादे तैलचित्र किंवा शिल्प जेव्हा घेतले जाते तेव्हा ते एक तर भरपूर किंमत आहे म्हणून (कलेच्या श्रेष्ठत्वाच्या निकषावर नाही) किंवा प्रस्थापित शैलीतले आहे म्हणून किंवा लहर लागली म्हणून किंवा प्रस्थापित चित्रकाराचे किंवा शिल्पकाराचे आहे म्हणून ! किंवा एजंट सुचवितो म्हणून.)

ज्या निकषावर आधारित हे संवर्धनाचे सोंग चालते त्याला एकतर आश्रयाचा वास येतो व शिवाय हा व्यवहार कलाबाह्य मूल्यांचाच पुरस्कार ठरतो.

अशा परिस्थितीत संवेदनशील जनतेच्या स्वयंस्फूर्तीने निर्माण झालेल्या साहित्य व कलाप्रेमी संस्था व प्रत्यक्ष साहित्यिक व कलावंतांच्या संघटना ह्याच केवळ, कला व साहित्यातील नवीन उन्मेषाला, उर्मींना न्याय देऊ शकतात. कारण अशा संघटना (जर इतर कोणत्याही कन्सिडरेशन्स मार्गात आल्या नाही तर आणि त्या बहुधा येऊ नयेत.) ह्याच उद्देशांनी बांधलेल्या असतात.

ह्या सर्व विवेचनाच्या संदर्भात आता विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचे स्वरूप पाहणे आवश्यक आहे. विदर्भ साहित्य संघाने ६० वर्षे पूर्ण केली असून माझ्या मते थोडेसे सिंहावलोकन करून नवीन संकल्प सोडण्याचीही अत्यंत योग्य अशी ही वेळ आहे.

माझ्या माहितीनुसार विदर्भ साहित्य संघाचे कला प्रान्तातील कार्य असे आहे.

(अ) कला प्रदर्शने भरविण्यास हॉल भाड्याने देणे

(ब) बालकांच्या चित्रकला–रंगकला स्पर्धा भरविणे

(क) चर्चासत्रे, परिसंवाद घडवून आणणे (कला विषयावर अपवादाने, साहित्यावर नेहमीच)

(ड) व्याख्यानमाला, नाटयस्पर्धा, अन्य नैमितिक कार्यक्रम

६० वर्षांच्या ह्या प्रवासात विदर्भ साहित्य संघाने ह्यापेक्षा वेगळे काही केले नाही. नाटयस्पर्धांमुळे होणारे नाटयकलेचे संवर्धन व विकासाचे कार्य सोडले तर नृत्य, संगीत, शिल्प, चित्र ह्या बाबीत विदर्भ साहित्य संघाचे भरीव असे कार्य नाहीच असे म्हणावे लागेल.

संघाचा मूळ उद्देशच 'साहित्य' ह्या शब्दात बद्ध केला असल्याने कदाचित; साहित्याव्यतिरिक्त संघाच्या आजपावेतोच्या पदाधिकाऱ्यांनी इतर बाबींकडे दुर्लक्ष केले असेल किंवा त्यांना इच्छा असूनही न्याय देता आला नसेल. असो. पण ज्याअर्थी 'विसासं' नाटयकलेच्या संवर्धनाचे काम गेले अनेक वर्षे सातत्याने व जिव्हाळ्याने करीत आहे त्याअर्थी कला व कलावन्त ह्या विषयी 'विसासं'ला आपुलकी आहे.

'विसासं'ने वाङ्मय–चळवळीचे जे अध्वर्युपण विदर्भात स्वीकारले त्याला किंचितही धक्का न लावता कला चळवळी, कलामूल्ये, कलेच्या संदर्भातील नवे प्रवाह, नव्या जाणिवा, नवे प्रयोग, त्याचप्रमाणे कलावंत उदयोन्मुख व प्रस्थापित, चळवळे व प्रस्थापित मूल्ये जोपासणारे, बंडखोर किंवा बांधिलकी स्वीकारणारे अशा सर्वच कलाविषयक उलाढालींचा, व्यक्तींचा जाणिवपूर्वक परिपोष करण्याचा व त्यांना योग्य संदर्भात रसिकांसमोर मांडण्याचा (Present च्या अर्थाने) जिव्हाळ्याने प्रयत्न करावा. ह्या संदर्भात 'विसासं'ने पुढाकारच घ्यायला पाहिजे असे माझे मत आहे.

असे कार्य करणारे कलावन्तांचे संघही असू शकतात. स्वरसाधना, सप्तक, विदर्भ कलाकार संघ,

पंचम, बसोली ग्रुप वगैरे मंडळी हे काम करीत आहेत. पण त्यांच्या कार्याला जबरदस्त मर्यादा पडतात. तुटपुंजी साधने, संघटनेचा विस्कळीतपणा आणि विविध कारणांनी निर्माण झालेल्या इतर उणिवांमुळे अशा संघटनांच्या कामात सातत्यही येत नाही व भरीवपणाही.

जशी नजीकच्या मध्यप्रदेशातन भोपाळला मध्यप्रदेश कला परिषद नावाची संस्था ह्या बाबतीत सतत नवनवे प्रयोग करून, वार्षिक समारोह आयोजित करून हे काम करीत आहे, तसेच 'विसासं'नेही हे काम स्वीकारले तर विदर्भ स्तरावर निर्माण झालेली कुंठा नाहीशी होणे सहज शक्य आहे.

साहित्याव्यतिरिक्त, कलेचे नवे परिमाण 'विसासं'ने आपल्या कार्याला दिले तर त्याच्या उपयुक्ततेचे एक नवीन दालन निर्माण झाले असे होईल. ह्या वैविध्यामुळे मोठ्या प्रमाणावर विविध स्तरावरच्या लोकाना, विसासंकडे आकर्षिता येईल.

सध्या विदर्भात अशी कोणतीही रसिकांनी निर्माण केलेली स्वायत्त संस्था ह्या दृष्टीने कार्य करीत नाही. मर्यादित स्वरूपाचे काम करणाऱ्या संघटना हातभार लावण्याचेच काम करीत आहेत. नवीन प्रयोग, किंवा बदलत्या काळाच्या संदर्भात बदलत्या जाणिवा व बदलती कलामूल्ये, त्यांचा बदलती आविष्कार–माध्यमे, कला-स्वातंत्र्याचे नवीन अर्थ व ह्या अर्थाची नवनवी परिमाणे, बदलते विषय व त्यांची नवीन भाष्ये, ह्याच बरोबर त्यात केन्द्रस्थानी असलेले कलावंत त्यांचे भौतिक विश्व व कलाविश्व ह्या सर्वांचा सर्वंकषपणे विचार करून, स्वीकार करून त्यातील त्रुटी भरून काढण्याचा व हा प्रवाह चालू ठेवण्याचा प्रयत्न चांगल्याप्रकारे विसासंघ करू शकते. तपशिलाचा भाग वेगळा.

विदर्भ साहित्य संघाने ६० वर्षे पूर्ण केल्याच्या ह्या निमित्ताने हे करण्याचा संकल्प सोडावा व कलाचक्र परिवर्तनाच्या महत्त्वाच्या कार्याचे यजमानपद स्वीकारावे ही अपेक्षा ह्या क्षणी करणे अयोग्य ठरणार नाही.

या सूचनेचा स्वीकार झाल्यास 'विसासं'ला एखाद्या कार्यक्रम पत्रिकेच्या आधारे योजना आखावी लागेल. वेळापत्रकाबद्दलचा विचार, तसेच इतर अनेक (जसे द्रव्यबळ, अग्रक्रम) घटनांचा विचार करावा लागेल. पण कामाच्या स्वरूपाविषयी फारशी मतभिन्नता निर्माण होणार नाही असे वाटते. कामाचा तपशील जवळपास असा राहावा.

१. कला प्रदर्शन–दालन, रंगशाळा; नृत्यशाळा, संगीत व गायन प्रकार पेश करण्यासाठी छोटे सभागृह व कलावंतांची तात्पुरती राहण्याची सोय (Guest-room) असलेली एक वास्तू बांधणे, व ही वास्तू गरजवन्ताला विनामूल्य किंवा नाममात्र शुल्क घेऊन उपलब्ध करून देणे.

२. अभ्यासक्रम आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

३. कलासमारोह (भारतीय पातळीवरचा) प्रतिवर्षी आयोजित करणे.

४. सोबत किंवा वेगवेगळचा वेळी परिसंवाद, प्रदर्शने, डेमॉन्स्ट्रेशन्स, संम्मेलने, चर्चासत्र, भाषणे.

५. कला संग्रह (Museum) प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरून विविध कलांच्या विकसनाचा मागोवा घेणारे स्थायी प्रदर्शन.

६. शिष्यवृत्या व संशोधनासाठी मदत.

७. प्रकाशन.

८. सत्कार मानधन, प्रोत्साहन व वृद्धकाळात कलावन्ताची उपजीविकेची सोय.

९. पेट्रन्स व कलावन्त ह्यांच्यामध्ये योग्य संबंध निर्माण करणे, आर्थिक बाजू कलावन्त व पेट्रन्स यांना पोषक होईल अशा दृष्टीने सांभाळणे, चित्रे, शिल्पे यांची विक्री, नृत्याचे, संगीताचे कार्यक्रम आयोजिणे.

ह्या सर्वांसाठी लागणारा पैसा खालीलप्रकारे उभा करता यावा.

१. सरकारी अनुदाने.

२. दानशूर रसिक श्रीमंतांकडून देणग्या.

३. शीर्षस्थ संस्थांकडून मिळणाऱ्या देणग्या व अनुदाने.

४. कलावस्तूंच्या विक्रीतून मिळणारे कमिशन.

५. व्यावसायिक नाटक कंपन्यांची नाटके ठेवून.

६. कलावंतांकडून मिळणारी वर्गणी.

७. युनेस्को वगैरे जागतिक संस्थांकडून किंवा इतर समानशील संस्थांकडून मिळू शकणारा पैसा.

△ △ △

सृजलशीलता सांभाळा

भाऊ समर्थ

मराठी रसिक मन विदर्भ साहित्य संघ या संस्थे-कडून कला–आदोलनाचे केन्द्र म्हणून केव्हाही अपेक्षा करणारच ! आपल्या कला–परंपरा जोपासणे, जपावयाच्या परंपरांतर्गतच त्याचा विकास बघणे आणि अपरंपरेचा नवोन्मेषाचा परिचय, उत्तेजन आणि संरक्षण ह्या भूमिका ह्या सांस्कृतिक–साहित्य संस्थांच्या असतात, असाव्यात. परंतु भविष्याकडे पहाणाऱ्या वर्तमानाच्या संदर्भात अपरंपरेचा नवोन्मेष शोधणे हे कला विकसनाच्या ध्येयपूर्तीचे प्रधान कार्य होय. शास्त्रांना पडणाऱ्या स्वप्नाचे कार्य या नवोन्मेषी कलेतच सापडावयाचे. जाणीवपूर्वक वा अजाणता वर्तमान परिस्थितीच्या घात–प्रत्याघाताचा प्रभाव सहजच या नवकलांकुरात सापडतो. परंतु ऐतिहासिक वा प्रचलित कला–साहित्य प्रवाहाच्या पुनर्रचनेतूनच हे नाविन्य घडत असले तरी शंका, कुशंका, प्रश्न, निंदा, आणि संकटांना सामना देत कलाकार कसाबसा अस्तित्वासाठी धडपडतो, तेव्हा वि. सा. संघासारख्या संस्थेने आपल्या दुर्मिळ कलावंताचे पाठिराखेपण स्विकारायला हवे. नाहीपेक्षा असल्या कलावंतांच्या कृतीची सहानुभूतीने दखल घ्यावी, किंबहुना त्याच्या त्रासात किंवा संकटात सहभाग घेऊ नये. सृजनशीलता समजणे, शोधणे, विक-सित करणे हे कुठल्याही राष्ट्रीय कार्यापेक्षा वैश्विक संस्कृती आणि सभ्यतेसाठी सहज असे महान प्राकृतिक कार्य ठरते. पोटासाठी व चैनीसाठी जगणाऱ्या लोकांना ह्याचे महत्त्व नाही हे समजू शकते. पण कला आणि संस्कृतीच्या रक्षकदारांनी मात्र इकडे दुर्लक्ष करणे हे महापाप ठरेल. कारण कलेचे ते प्रथम श्रेष्ठ कर्म होय. सृजनशीलता विकसित करणेच राष्ट्रबल वाढविणे होय. कलेतल्या सृजनशीलतेच्या प्रभावामुळेच विज्ञान आणि उद्योगात ह्या तत्वांचा प्रवाह सुरू होतो.

शासनाचा, रसिक समाजाचा जोर कलापरंपरा जपायसाठी आणि परंपरेच्या सीमेतच विकासासाठी असतो. ते ह्यास्तव धनाचा पूर वाहवतात हे कलेचे दुय्यम कर्म होय. माती, स्थिती आणि काळाला प्रामा-णिक–प्रातिनिधिक सृजनतत्त्वाच्या अभावामुळेच कलेतील वा साहित्यातील नवप्रवाहासाठी आम्ही पश्चिमेकडे आशाळभूत नजरेने पाहतो. तिकडच्या प्रवाहाचे भारतीय कला प्रवाहाशी मिश्रण करून वा रूपांतर करून रसिकांपुढे कृति–साहित्य सादर करतो. हे असेच चालले आहे, थांबणार नाही.

स्मरणशक्ती आणि बौद्धिक चमक नसण्या-मुळे आता जगण्यासाठी काय तर कलेकडे नाईलाजाने वळावे, कारण अंगभूत कलारस आहे म्हणून. अपवाद वगळता कलावंत आणि साहित्यिकांत सृजनशीलतेच्या

संदर्भात जाण विकसित नाही, हे खेदाने म्हणावे लागते. म्हणून कलावंत आणि साहित्यिकांचे सहज सोप्या शब्दात संवाद-चर्चा घडविणारे दिलखुलास कार्यक्रम वारंवार घडवायला पाहिजेत. असले कार्यक्रम मातृत्वाच्या भूमिकेने हळुवार हाताळायचे असतात. कलावंत आणि साहित्यिकांच्या आवश्यक 'अहं'चा पारा केव्हा चढेल आणि विचका होईल ह्याचा नेम नसतो. वारंवार हा संवाद उभारणे कला आणि साहित्याच्या विकसनासाठी, पर्यायाने नवसमाजजीवनाच्या सुशिस्त अस्तित्वासाठी जरूर आहे. वि. सा. संघाच्या पदाधिकाऱ्यांचे हे महान नैतिक कर्मच आहे. कलावंत आणि प्रखर विचारवंतांची सांगड घालणे, योग्य वातावरणाच्या जागेचा अभाव, प्रसंगी कलावंत आणि साहित्यिकांची संकटे, आरोग्य व धनाभाव दूर करण्यासाठी वि. सा. संघाने प्रयत्न केले नाहीत. असे व्हायला नको एवढेच. जात आणि वर्ण असे भेदाभेद इतरांना दाखविण्याची संधी मिळू नये, इतक्या निरिच्छ मनाने असले कार्यक्रम आयोजित व्हायला पाहिजेत.

नगरातील नृत्य, शिल्प, वास्तू या कलेच्या व तज्ज्ञांच्या जवळिकतेसाठी अजूनही संस्थेस बरेच काही करता येणे शक्य आहे.

तसे पाहता कविसंमलने, व्याख्याने, प्रदर्शने, परिसंवाद, वादविवाद, विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, नाटयस्पर्धा आदी चालूच असतात. परंतु ध्येयासक्त कला-साहित्य आदी विविध आंदोलनांचे ह्या संस्थेने केन्द्र ठरावे हीच अपेक्षा! ह्या संस्थेने कला आणि साहित्याचे निरोगी मातृत्व स्वीकारावे.

△ △ △

वि. सा. संघ व पी. एल

सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांचे गाजलेले 'अंमलदार' हे नाटक वि. सा. संघाने प्रथम रंगभूमीवर आणले. 'अंमलदार' प्रथम प्रकाशित करण्याचा बहुमानही वि. सा. संघाला मिळाला. हे नाटक कोणत्याही प्रकारचे प्रतिमूल्य न घेता प्रकाशित करण्याचे पहिल्या आवृत्तीचे अधिकार पी. एल. नी संघाला दिले हे विशेष. या नाटकाचा पहिला प्रयोग विदर्भ साहित्य मंदिराच्या मदतीसाठी नागपूर नाटयमंडळाने शनिवार दिनांक १६ फेब्रुवारी १९५२ रोजी महाराज बागेतील व्ही. टी. आय्. हॉल येथे सादर केला. या प्रयोगाचे उद्घाटक होते-विदर्भाचे नाटयाचार्य वीर वामनराव जोशी. या नाटकाचे दिग्दर्शक होते – म. ना. परांजपे.

या नाटकाचे प्रमुख वैशिष्टय म्हणजे वि. सा. संघाचे दोन माजी सरचिटणीस श्री. बाबुराव चिमोटे व श्री. मा. नी. गलगलीकर यांनी या नाटकात छोटया भूमिका केल्या होत्या. याशिवाय नागपूरच्या नाटयक्षेत्रांतील सौ. कुसुम खांडेकर, सौ. अनसूया वाडेगांवकर, चं. के. घोंगे, प्रभाकर दिवाडकर, सखारामपंत जोशी, भा. द. भावे, त्रि. अ. चोरघडे, ज. स. गोडबोले या मंडळींनी या नाटकात भूमिका करून प्रयोग रंगविला होता. पु. ल. या पहिल्या प्रयोगाला उपस्थित होते हे विशेष.

लोककलांना पुढे आणावे

श्रीकांत तिडके

कलाक्षेत्रात नव्याने येऊ पाहणाऱ्या प्रवृत्ती ह्या कलेच्या सुंदर मानससरोवरात फुलणारी कमलपुष्पे नसतात. समाजातील स्थित्यंतराची, बदलत्या जीवन-मूल्याची स्पंदने कलेत आविष्कृत होत असतात. त्यामुळे कोणत्याही साहित्य संस्थेला बदलणाऱ्या समाजजीव-नाच्या संदर्भात नव्या चळवळीची आस्थियेवाईकपणे दखल घ्यावी लागते. विदर्भ साहित्य संघाने ती घेतली असणारच. कारण विदर्भ साहित्य संघ ही साहित्यसंस्था अशा नव्या जाणिवांना,चळवळींना पाठमोरी झाली असती तर तिचा हीरक महोत्सव साजरा होताच ना. पण कलाक्षेत्रातील चळवळींना साहित्य संस्थांनी पुरेपूर न्याय दिला असे मात्र म्हणता येणार नाही.

कलाक्षेत्रातील चळवळींचा विचार करताना मी प्रामुख्याने साहित्यकलेचा विचार करतो. विदर्भात दलित साहित्याची चळवळ अधिक जोरकसपणे वाढली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'धम्मचक्र प्रवर्तन' नागपूरच्या दीक्षाभूमीवर झाल्याने दलितांमध्ये अधिक जागृती निर्माण झाली. दलित साहित्यिकांची तिसरी पिढी आता लिहू लागली आहे. पण त्यांना व्यासपीठ नाही. विदर्भातील प्रथितयश साहित्यिकांनी (दलित) 'अस्मितादर्श 'सारखे व्यासपीठ या नवोदितांना दिले नाही. प्रस्थापित साहित्यसंस्था, समीक्षामूल्ये नाकारायला निघालेल्या या नव्या लेखकांना अभिव्यक्तीचे माध्यमच नाही. विदर्भ साहित्य संघाने या नव्या लेख-कांना कधी नाकारले नाही. पण बदलत्या जाणिवांच्या संदर्भात त्यांना लिहिते करण्यासाठी काही खास प्रयत्न वि. सा. संघाने केलेत असे वाटत नाही. विदर्भ साहित्य संघाच्या ह्या मर्यादा सर्वच साहित्य संस्थांना (महा-राष्ट्रातल्या) पडलेल्या दिसतील. पण कलाक्षेत्रातील ही प्रभावी चळवळ निकोप वाढीला लागण्यासाठी तिचे स्वागत झाले पाहिजे, अशी माझी अपेक्षा.

गेल्या पाच वर्षात विदर्भ साहित्य संघाच्या शाखा ग्रामीण भागात वाढल्यात ही गोष्ट कौतुकास्पदच आहे. पण अजून खूप ठिकाणी शाखा स्थापन होऊ शकतील. त्यासाठी स्थानिक युवासाहित्यिक पुढे का येत नाहीत ? विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख, गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी आणि ग्रामीण क्षेत्रातील बहुजनसमाजातील धुरिणांच्या प्रेरणेने शिक्षणसंस्था वाढल्या आहेत. त्यामुळे बहुजनसमाजातील लेखकांचा वर्ग संख्यात्मक-दृष्टया वाढलाय. पण त्यांचे लेखनादर्श पांढरपेशेच आहे. जे अनुभवले नाही ते 'अनुभवविश्व' ताकदीने उभे कसे राहणार ? या देशाची अर्थव्यवस्था समाज-व्यवस्था कृषिप्रधान आहे; तर कृषिसंस्कृतीचे दर्शन कृष-कांच्या असंतोषाचे चित्रण साहित्यातून व्हायलाच पाहिजे.

या देशातील अनेक आर्थिक आणि सामाजिक दु:खाचा संबंध शेतीशी आहे. झोपडपट्टीचे चित्रण करणाऱ्या मध्यमवर्गियांनी कधी खोलात जाऊन विचार केलाय की हे शहरात 'किडचामुंग्यां'चे जीवन जगणारे फुटपाथवरचे लोक कुठून आणि का आले आहेत? शेती परवडत नाही; शेतमजूर मिळत नाही म्हणून हा शहराकडे लोंढा चाललाय. याची दखल साहित्याने घेतलीच पाहिजे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पदाधिकारी असलेल्या आनंद यादव यांनी 'ग्रामीण साहित्य चळवळ' चालवून या जाणिवांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. तसे विदर्भात कां होऊ शकले नाही? जनसाहित्यसभा, वऱ्हाडी साहित्य महामंडळ आणि तालुका पातळीवर वेगवेगळया साहित्यसंस्था जन्मतात, आर्थिक बळाभावी अस्तही पावतात. या सर्व साहित्य संस्थांना विदर्भ साहित्य संघाच्या व्यासपीठावरून आपल्या जाणिवा अधिक सामर्थ्याने अभिव्यक्त करता आल्या असत्या. वि. सा. संघाने वऱ्हाडी कवी संमेलन, कथाकथनाचे कार्यक्रम आयोजित केले हे स्तुत्यच आहे. पण अभिव्यक्तीपेक्षा आशय महत्वाचा असतो, हे वऱ्हाडी साहित्यिकाच्या लक्षात आलेले नाही. प्रमाणभाषेत लिहूनही हा आशय व्यक्त होऊ शकतो. विदर्भ साहित्य संघाने या चळवळीचे आशयाच्या अंगाने स्वागत करावे; प्रोत्साहन द्यावे ही अपेक्षा.

'लोकसाहित्य' हे मराठीतील उपेक्षित साहित्य दालन. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे लोकगीतांचा संग्रह नव्हे. त्यातील अनुभूतींची व्यामिश्रता, ग्रामजीवनातील श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांची प्रतवारी शास्त्रशुद्धपणे लावल्या गेली पाहिजे. 'दंढार', महादेवाची गाणी यांच्या शास्त्रीय अध्ययनाची गरज आहे. 'पोहा चालला महादेवा' या नाटच प्रयोगातील मर्यादा मान्य करूनही त्यातील प्रयोगशीलता कौतुकास्पद आहे. आणि ज्या मर्यादा निर्माण झाल्यात, त्याला शास्त्रशुद्ध आकलनाचा अभावच कारणीभूत आहे. खेड्यापाड्यातला कच्चा माल उद्योगांना पुरविला जातो म्हणून उद्योगसंस्कृतीचे वैभव उभे आहे. तसे वैभव साहित्याला या लोकसाहित्यातूनच प्राप्त होऊ शकेल. बहिणाबाई चौधरी यांच्या रसरशीत कवितेने लोकगीतातूनच सामर्थ्य प्राप्त केले आहे. विजय तेंडुलकर यांच्या 'घाशीराम'बद्दल काहीही वाद असोत पण नेपथ्य आणि दिग्दर्शनासाठी त्यांनी लोककलांचा जो समर्पक वापर केला आहे, तो कलात्मक सौंदर्याची प्रतिती देणारा नाही असे कोण म्हणेल? लोकसाहित्याला अशी प्रतिष्ठा मिळू लागली की खेड्यापाड्यातल्या लोककलांचा संपन्न वारसा जोपासला जाईल. साहित्य, नाटच या कलेतील प्रयोगशीलता वाढीस लागेल. विदर्भ साहित्य संघाने दंढारीतल्या कलावंतांना साहित्य संघाच्या व्यासपीठावर वर्षातून एकदा निमंत्रित करावे. चार दोन 'महारी झिल' ऐकू द्या ना सरस्वतीपुत्रांना. गोंधळचाना घालू द्या एखाद दिवस गोंधळ धनवटे रंगमंदिरात. जानपद गीतांचे गायन होऊ द्या, म्हणजे स्त्रियांचे अनुभवविश्व मर्यादित आहे म्हणणाऱ्यांना उत्कट अनुभूतीचे नवे भावविश्व परिचित होऊ लागेल. पण हे सगळे कुणी करावे? विदर्भ साहित्य संघ या लोककलांची निश्चित दखल घेईल, पण ते पोहचविण्याची जबाबदारी कुणी तरी घ्यायला नको का? साहित्य संघाच्या शाखा आणि नागपुरातील केंद्र यांच्यामध्ये या संदर्भात सुसंवाद निर्माण व्हावा अशी माझी अपेक्षा आहे.

साहित्यनिर्मिती हा कलावंताचा अंतर्गत मनोव्यापार आहे. त्यामुळे कलाक्षेत्रात चळवळी होतात हे मान्य न करणारा वर्गही कलेच्या क्षेत्रात आहेच. कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा विदर्भ साहित्य संघाच्या उभारणीत मोठा सहभाग होता. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'कलेने बहुजनसमाजाची बटिक व्हावे. होय हे अगदी खरे. पण ती बटिक नव्हती कधी? फरक एवढाच की, यापूर्वी ती धनाढ्यांची आणि बलाढ्यांची बटिक होती. आता तिने दलितांची, दीनांची उद्धत्री व्हावे–' विदर्भ साहित्य संघाकडून माझ्या कलाक्षेत्रातील चळवळींच्या संदर्भात अशाच काहीशा अपेक्षा आहेत.

△ △ △

शाखांना सक्रीय बनवा

सुरेश गांजरे

वैदर्भीय कलावंतांच्या कलांची जोपासना, त्यांच्या अभिव्यक्तीस प्रोत्साहन व त्यांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रातिनिधिक म्हणवणाऱ्या विदर्भ साहित्य संघाने कितपत यश मिळविले ? याची पुरेशी जाणिव विदर्भाला आहे. तथापि आजवरच्या वाटचालीत वि. सा. संघाने फारसे काही मिळविलेले नाही याची जाणिव ठेवून हीरक महोत्सवाच्या निमित्ताने स्वतःचे आत्मपरिक्षण करण्याची संस्थेला उपरती व्हावी–ही भावी वाटचालीतील एक समाधानाची बाब म्हटली पाहिजे.

कला–साहित्य क्षेत्रातील विदर्भाची एकमेव प्रातिनिधिक संस्था म्हणून विदर्भ साहित्य संघाकडे आस्थेने, आदराने, अपेक्षेने पाहिले जात नाही–कारण संस्था व्यापक प्रमाणांवर विदर्भातील कलावंत–रसिकाभिमुख झाली नाही. संस्थेच्या निष्क्रीयतेपोटी विदर्भात अन्य पर्यायी संस्था, संघटना निर्माण होऊन ह्या चळवळीचा मात्र खेळखंडोबा झाला.

विदर्भ साहित्य संघ ही संस्था फक्त नागपूर शहर नि तेथील मूठभर लोक यांच्या पुरतीच सीमित राहिली आहे–हे कटू सत्य नाकारता येत नाही. विदर्भातील अन्य जिल्ह्यात शहरी, निमशहरी व ग्रामीण परिसरातील साहित्यिक–कलावंत यांना संस्थेत सामील करून घेऊन त्यांना सतत सक्रीय ठेवण्याचे प्रयत्न दुर्दैवाने झाले नाहीत. आजही विदर्भभर विखुरलेल्या संस्थेच्या सभासदांना फक्त निवडणुकीच्या वेळीच विचारले जाते.

विदर्भात विखुरलेल्या असंख्य कलावंत, साहित्यिकांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून–नव्या उपक्रमांच्या माध्यमातून एकत्र केले पाहिजे. वि. सा. संघ हे सहजपणे करू शकते. पण असे होत नाही. काही मोजके कार्यक्रम संस्था नागपुरात घेते. हे कार्यक्रम आणि उपक्रम राबवणारे लोक तेच असतात-त्यांच्याच साठी ते होतात आणि तेच ते बघतात. राजाही तेच अन प्रधानही तेच–कोतवालही तेच अन् प्रजाही तेच ! यापुढे संस्थेने कार्यक्रम असे घ्यावेत, उपक्रम तेच राबवावेत की जेणेकरून त्यात विदर्भातील इतर ठिकाणची जास्तीत जास्त मंडळी सहभागी होऊ शकेल. सुदैवाने संस्थेजवळ धनवटे रंगमंदिर, 'युगवाणी' मुखपत्र–अशी अनेक माध्यमे आहेत–त्यांचा त्यादृष्टीने वापर व्हावा.

विदर्भ साहित्य संघाच्या विदर्भातील बहुतांश शाखा कलाविषयक चळवळीत निष्क्रीय आहेत. 'जयंत्या–पुण्यतिथ्या' या पलीकडे अधिक कार्यक्रम ह्या शाखांमधून होत नाहीत. परिणामतः जिल्हा स्तरा-

वर, ग्रामीण भागात अन्य पर्यायी संघटना उभारणे इतरेजनांना भाग पडत आहे.

संस्थेच्या सर्वच शाखा पूर्णपणे सक्रीय होणे आवश्यक आहे. नाविन्यपूर्ण साहित्यविषयक कार्यक्रम सातत्याने ह्या शाखांनी घेतले पाहिजेत. कविसंमेलना-पासून तर चर्चासत्रापर्यंत आणि नाटकांपासून व्याख्या-नमालेपर्यंत कार्यक्रम त्या त्या शाखांनी आपल्या कार्य-क्षेत्रात घेण्याची गरज आहे.

–आणि भक्कम आर्थिक पाठबळाखेरीज हे होऊ शकत नाही. वि. सा. संघांच्या शाखांची आर्थिक अवस्था हलाखीची आहे. त्या शाखेच्या सभासदांची जी वार्षिक वर्गणी आहे–त्या एकूण रकमेतून त्यांना फक्त काही टक्के रक्कम अनुदान मिळते–बस्स् या पलीकडे काही नाही ! काय डोंबलं होणार एवढयाशा रकमेत ?

संस्थेजवळ भरमसाठ उत्पन्न मिळवून देणारे धनवटे रंगमंदिरासारखे साधन आहे–सरकारचे अनु-दान आहे. तेव्हा संस्थेने आपल्या शाखांना कार्यक्रम घेण्यासाठी किमान त्या त्या कार्यक्रमांचा ५० टक्के तरी खर्च आर्थिक मदत म्हणून द्यावा.


कल्पकतेने विविध कार्यक्रमांचे आयोजन, सर्व-समावेशक असणारे विविध कला–साहित्य विषयक उपक्रम सातत्याने घेण्यात येऊन शक्य तो अधिकाधिक मंडळींना जाणीवपूर्वक सहभागी करून घेण्याचे प्रामा-णिक प्रयत्न झाले पाहिजेत.

मुख्य म्हणजे, व्यक्तिद्वेष–आणि व्यक्तिप्रतिष्ठे-साठी खेळले जाणारे क्षुद्र राजकारण, गचाळ गटबाजी संस्थेमधून समूळ नष्ट करावी. रसिक आस्थेने नव्या प्रतिभेला संस्थेने हक्काचे व्यासपीठ मिळवून द्यावे. तरच काळाच्या वेगवान प्रचंड झोतात संस्थेच्या अस्तित्वाचे तारू टिकाव धरू शकेल !

△ △ △

वि. सा. संघाचे साहित्याचार्य

आचार्य परीक्षार्थी	विषय	मार्गदर्शक
१. १९६३ प्रा. सौ. निलम रत्नाकर हातेकर (वाई)	मराठी नाटकातील स्त्री जीवन	प्रा. माणिक के. बैतुले
२. १९६५–प्रा. सौ. अलकानंदा आकृत (नाशिक)	वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री–जीवन	प्रा. पां. कृ. सावळापूरकर
३. १९७७–प्रा. सौ. सुनंदा शरद कुळकर्णी	आधुनिक मराठी कवितेतील गूढवाद आणि हिंदी कवींचा रहस्यवाद	प्रा. माणिक के. बैतुले
४. १९७८–कु. विजया पुरुषोत्तम मोरे (सौ. शुभदा आगलावे एम्. ए.)	नाटककार कोल्हटकर, गडकरी, स्त्री चित्रणे	प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी
५. १९८०–कु. रत्नमाला रामकृष्ण महाजन	संस्कृत नाटकाचे मराठी अवतार : एक चिकित्सक अभ्यास	प्रा. डॉ. भा. र. आष्टीकर
६. १९८०–सौ. शोभा अरुण उवगडे	कथाकार कै. हरी नारायण आपटे आणि स्व. प्रेमचंद तौलनिक अध्ययन	प्रा. माणिक के. बैतुले
७. १९८१–श्री. विजयकुमार नारायणराव इंगळे	मर्ढेकरांच्या सौंदर्य–शास्त्राचे स्वरूप	डॉ. अ. ना. देशपांडे



॥ कविता ॥

अनुक्रमणिका

गाव

सुनील शिनखेडे

गावात आता काई राम उरला न्हाई
(असं सेहरात गेलेले जवान पोट्टे म्हंतेत)
पर मातीशी बयमानी कऱ्याले मन कचरते.
पडेल चेहऱ्याच्या वावरास्नी
सोन्यावानी दिसाच्या आठवनी सांगत
कुटवर जगनार म्हून
बबन्या पोळ्याले आला तवा इच्यारत हुता
सवन गावचा हिवरेपनाच
खुडून नेला सेहरातल्या कारखान्याईनं.
आता जवारीच्या कनसालेबी
पयलेसारखं हासू फुटत न्हाई.
त्या डोंगरावरल्या म्हादेवालेबी दया येत नसन ?

* * *

आता जवाई पाह्‌ा लागते असं
लक्षुमी त्या रोजी सांगत हुती.
येसवदेले आता चवदावं लागन.
इतल्या वर्सात झोपडीचं छप्परबी
सवारनं नाय झालं
तं पोरीच्या लग्नाची गोठ येऊन गेली.
बबन्याले पयश्याचं इच्यारलं
तं अर्धाक एकर इकून काहून ना टाकत
म्हून त्यानं माहं तोंड बंद केलं
लेकुरवाळ्या सोबतीनी माहेरपनाले आल्या
का येसवदेचं फुल सुकल्यावानी दिसते
आता अवंदा पीक आल्यावर पाहू
म्हून लक्षूमीले सांगतो
अन पोरगी येलावाकावानी वाढतच जाते
तिच्या लग्नाचाबी घोरच हाय.

* * *

सरकार तं कास्तकाराले निरा पान्यातच पाह्यते.
चान्नं पल्ल्यावानी कापसाचं रान फुल्लं व्हतं गेल्या साली
पर भावच न्हाई भेटला.
किती मोर्चे झाले अन् सवा
इजय तं जसा लढाई खेयत हाय सरकारशी
पर राज करनाऱ्या त्या शेतकऱ्याच्या पोराईले
काई पाझर फुटत न्हाई.
दुष्काळ पडला का इमानातून पायनी करनाराले
आमच्या मनातला आंधार कसा दिसन ?

* * *

गाव आता कसं
तब्येत लयच घसरल्या मरीजावानी दिसा लागलं.
बाबा गेला थ्या वक्ती
अजून दम धरून असल्याले चारदोन
पुरान्या हड्डीचे बुढे

डोये बले करून म्हनाले व्हते
मोठ्या मनाचा जमींदार गेला.
ध्याचं हिवरं सपन मातर तसंच
डोयातल्या डोयात न्हाऊन गेलं.

* * *

येकलं न्हायलं का मन लय उदास व्हते.
वाट्टे–इतले वर्स या जमिनीत खपून
आपुन का कमावलं ?
झोपडी तशीच बिनसवारली.
लक्षुमीचा गयाबी कोराच न्हायला.
पोरगं सेहरात गेलं तेई सोताच्याच इचारानं.
अन येसवदेचं वय वाढतच जात हाये.
मंग वाट्टे–पोट्टे म्हनेत तेच खरं हाय
गावात आता तसा काई राम उरला न्हाई-



पर...पर मातीशी बयमानी कऱ्याले
मन आजूनई कचरतेच.
△

वरवटा

रमेश पाटील

घाम गायुन लुगड्याच्या चिंध्या
गाठी बांधुन सवरता सवरता
गवताचे ओझे वाहून
सूर्य नारायन कसा डुबून गेला
बाई, तुया रोजच्या रामरगाड्यात
थकून भागुन मरगळून गेलं
आंग सारं तरी
घरातील रखरख
तुया जिवाले पाझर फोडणाऱ्या
इवल्या इवल्या
आशाळभूत नजरा पाहून
सकायच्याच तेव्हड्याच घाईघुईनं
चुलीच्या घुप्टाशी झुंजून
अंगाभोवती चिवचिवणारी तोंडं
बंद केली
सकायच्या न्याऱ्हीवरची तूं
जीव तोडून कमावून आली
दिवसभऱ्याची तपाळं आलेली तूयीं पोटांतळी
पानी पिऊन भिजू घातली
जीव डोयात आणून
दारात बसली
तुया संसाराच्या विवचनेत गुंतून...
'ते' आजही तर्र पिऊन येईन का ?...
चार पैसे घरात तेलामिठाले...
वाबुच्या कपड्याले...
औपधी पाण्याले...
सारखे वरवटी प्रश्न
मनाच्या पाट्यावर
घासत वसली
उद्याघं बळं जमा करण्यासाठी
मोहाच्या माशीवाणी गुंगून गेली
भूक ताहान ईसरून.
△

कुकाच्या पावली

प्रतिमा इंगोले

लक्‌षुमी आली दारी
        कुकाच्या व पावली
तिले पावून दाराची
        तुयस व हासली.

लेता हयद पिवयी
        जशी सोन्यानं टिपली
हिरव्या लुगळचात दिसे
        जशी वाभूय फुलली.

चालता अल्लादी व
        कशा उमटल्या खुना
लाजे त्यायले पावून
        मांग जलमीचा राना.

मनीची आस फुलवून
        केली हाताची आंजूय
मायेरच्या आठोनीचे
        त्यात भरले तांदूय.

हाती तांदूयाचे दाने
        कसे पळती भरभर
दूर सारता मायेर
        डोये झरती झरझर.

पळता तांदूय हाती
        दिवाच व रायला
त्याच्या उजिळात वाई
        दारी उंबोठा पायला.

वारा उधानानं जो
        नायी इजू देला
देवाजोळ ठेवताना
        धीर त्यानं देला

दिव्याच्या उजिळात
        कुकू लावीन वाटूय
इसरून मायेर व
        करीन सासर डोकूय

△

ग्रामीण कवितास्पर्धा

सप्रेम प्रणाम !

'युगवाणी'च्या स्पर्धेसाठी आलेल्या २७४ कविता मी वाचल्या. त्यातील १६८ नागरी मराठी असून १०६ ग्रामीण आहेत. क्रमांक देऊन गौरव करावा अशा यात रचना नाहीत, हे नवलच ! त्यातल्या त्यात ६ कविता निवडून पाठवीत आहे, ज्या छापता येतील. यापुढील क्रमांक देणे मला तरी अवघड जाणारे आहे.

आपण सोपविलेले हे काम माझ्या व्यस्ततेमुळे थोडे विलंबाने तरीही स्वभावानुरूप बघता अतिशय लवकर पूर्ण करून पाठवीत आहे ! आपण दर्शविलेल्या विश्वासाबद्दल ऋणी आहे.

क्रमांक	१.	सुनील शिनखेडे	गाव
	२.	रमेश पाटील	वरवटा
	३.	प्रतिमा इंगोले	कुकाच्या पावली
	४.	गजानन सावरकर	गिरान
	५.	मनोहर चव्हाण	सितादई
	६.	सुखदेव ढाणके	एक रीत : इथं तिथं

विठ्ठल वाघ

गिरान

गजानन सावरकर

तेलं गेलं तूप गेलं हाती धूपारन आलं
उभा पिकाचं खय डोयातल्या आसवात झालं.


राब-राब राबलो घामाचं उनात रगद केलं
तरी अजून घराले सुखाचं तोरन नाई लागलं
व्हती कयसाची आशा, पायन्यातचं जीनं गेलं.

नेटच्या वस्तीत मजल्यावर मजले चढले
डोये आमचे कसे आडद्यावर झुरनी लागले
जातं फिरतेच जीवाचं, पिठ महालात गेलं.

पारध्याच्या गोड शब्दाले पाखरं भूलून जातात,
जाय़ं आकसलं की मगं पस्तावा करतात
रुतू बदलले तरी नसिब नाई बदललं.

सूर्य येईल कदीतरी म्हनून आमी जगतो
दरोज अंधाराच्या घरी आमी पखाला वाहतो
सूर्य उगवला नाई, जीवाले गिरान लागलं.

△



सितादई

मनोहर चव्हाण

नयतुरन्या पोरीवानी
आली पऱ्हाटी होसात
दिवस हगामाचे आले
न्हाई मावत तासात.

तिचा हिरवा पदर
खाली मालुम मातीले
नानं वोघातलं सांगुन
कसा झाकते छातीले

न्हाई राह्यली लाहान
घेऊन नोका तिचा मुका
फुला पात्यानं लव्हली
लाऊ नोका तिले धका.

आना पाय सावासनी
घेऊन दई भाताचं बोनं
पाळा खंदाळीले गाठ
सितादईचं घ्या औतन.


△

एक रीत : इथं तिथं :

सुखदेव ढाणके

गावात भरली जत्रा
तिथं सत्रा हावसे नवसे
बायको घेते कुकू फनी
दाल्ला हुंगते तमासे.

△



॥ प्रकल्प ॥

अनुक्रमणिका

' युगवाणी 'ची वाटचाल

आशा सावदेकर

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र म्हणून जन्माला आलेले ' युगवाणी ' आज पस्तीस वर्षांच्या वाटचाली-नंतरही नव्या वाटा धुंडाळण्याची उमेद बाळगून आहे त्याबद्दल अभिनंदनच करावे लागेल. विदर्भात नियत-कालिके जन्माला आली आणि संपली. पण ' युगवाणी ' आपला दर्जा आणि सातत्य सांभाळून आहे.

मराठी भाषा आणि मराठी साहित्य यांची अभिवृद्धी करण्याचे धोरण डोळ्यापुढे ठेवून ' प्रांतीयता व जातीयता ' यापासून अलिप्त राहण्याचे सतीचे वाण स्वीकारून १९४६ साली संपादक वा. ना. देशपांडे यांनी युगवाणीचा प्रथमांक काढला तोच मुळी संस्मर-णीय आहे. ' गुप्त सरस्वती ' या सदरात आलेले आगरकरांचे पत्र, कविवर्य बींची ' पिकले पान ' ही कविता ही त्या अंकाची आभरणे होती. प्रांतीयतेच्या सीमा उल्लंघून काव्यक्षेत्रातील फार मोठी आणि विख्यात अशी मैफिल ' युगवाणी 'ने घडवून आणली आहे. संपूर्ण १९४७ सालचे अंकच त्या दृष्टीने पाहण्या-सारखे आहेत. काव्याच्या सदरात बिलासपूरचे ना. बा. शास्त्री, मुंबईचे पु. शि. रेगे, परभणीचे बी. रघुनाथ, सागरचे दा. ल. अडोणी, धारचे अनंत आठल्ये, औरंगा-बादचे वा. रा. कांत, नाशिकचे द्वारकानाथ चित्रे, इंदोरचे रा. अ. काळेले ह्या साऱ्यांची हजेरी लक्षणीय आहे.

' युगवाणी 'च्या अगदी आजतागायतच्या अंकांची अनुक्रमणिका जरी पाहिली तरी हे लक्षात येते की, ललित ऐतिहासिक, व संशोधनपूर्ण लेखांबरो-बरच प्राचीन आणि अर्वाचीन वाङ्मयाची समीक्षा आणि वाङ्मयतत्त्वविचार यांना त्यात कायमच अग्रक्रम मिळालेला आहे. भ. श्री. पंडित, अ. ना. देशपांडे मा.गो. देशमुख, कुसुमावतीबाई देशपांडे यांचे 'युगवाणी'-शी असलेले साहचर्य हेच सुचवते. महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, नारायण नागोराव हूड, भाऊजी दप्तरी यासारख्या विद्वा नांच्या लेखमालिका 'युगवाणी'ने प्रसिद्ध केलेल्या आहेत. डॉ. य. खु. देशपांडे, वि. भि. कोलते, सुरेश डोळके, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. भा. श्री. परांजपे, डॉ. म. रा. जोशी, डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या अभ्यासपूर्ण, विद्वत्ताप्रचुर लेखांनी ' युगवाणी 'ने साहित्यसेवेची एक स्वायत्त परंपराच सिद्ध केलेली आहे. ' हरिभाऊ नेने विशेषांक ' काढून जुन्या पिढीतील संशोधकांचे स्मरण ठेवून युगवाणीने महत्त्वाचे कार्य केले आहे.

अगदी प्रारंभीच्या काळात पु. य. देशपांडे, गु. ह. देशपांडे, या वैदर्भियांबरोबरच वा. रा. कांत; केशवसुत, गो. स. सरदेसाई यांचाही परिचय युगवाणीने

वाचकांना करून दिलेला आहे. युगवाणीचा 'बी. विशेषांक' हा तर मानाचे पानच ठरला आणि जून जुलै–ऑगस्ट १९४६ या अंकात आलेली श्रीपाद कृष्णांची ' मायाविवाह ' ही अखेरची नाट्य–कलाकृती हे ' युगवाणी 'चे खरे मोल आहे.

त्यानंतर संपादनाची धुरा सांभाळली वामन कृष्ण चोरघड ह्यांनी आणि 'युगवाणी' चौफेर बघू लागली. साहित्य आणि कला यांच्या संदर्भात तिची दृष्टी अधिक अंतर्मुख झाली. त्या काळातील ' गालिबचे वैशिष्टय ' हा शं. बा. नेरकर यांचा लेख, ' अब्दुल करीमखांसाहेब ' हा प्र. श्री. मंगरूळकर यांचा लेख, ' भारतीय युद्धविषयक घटनांचा काल ' हा सदाशिवराव काकडे यांचा लेख एवढे उल्लेख युगवाणीच्या प्रगतिपथाच्या वैशिष्टयाचा निर्देश करण्यास पुरेसे आहेत. कै. बापूसाहेब भवाळकर यांचा त्याच काळातील ' मध्यप्रांत वऱ्हाडातील वाङ्मयविषयक जागृती ' हा अभ्यासपूर्ण लेख तत्कालीन चिकित्सकतेची एक झलक आहे.

पु. भा. भावे, साने गुरुजी, नाटयाचार्य देवल यांच्यावरील परिचयात्मक लेख; ' वाङ्मयसमीक्षा आणि साहित्यशास्त्र ' हा मा. गो. देशमुखांचा संशोधनप्रचुर लेख आणि कुसुमावतीबाई देशपांडे यांचा ' हरि नारायण आपटे यांच्या कलानिर्मितीचे रहस्य ' हा लेख म्हणजे युगवाणीच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पे मानावे लागतील.

साहित्य, कला, समीक्षा आणि समाजातील सांस्कृतिक जीवन याचा शोध आणि बोध ' युगवाणी 'ने घेतला. १९४७ साली प्रसिद्ध झालेला ' विदर्भातील आदिवासी कोरकू ' हा द. वा. महाजन यांचा लेख, ' प्रादेशिक गीतांचा अनुवाद ' ह्या गोष्टी वैशिष्टयपूर्ण ठरल्या. ' विदर्भातील लोकगीता 'वरील ना. रा. शेंडे यांचा प्रदीर्घ लेखही त्या दृष्टीने महत्त्वाचा ठरावा.

१९५३ साली पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, त्या नंतर श्री. पु. य. देशपांडे, दि. ब. पंडित, यादव मुकुंद पाठक आदींनी संपादनाची धुरा सांभाळली. त्यात घडलेले महत्त्वाचे बदल 'युगवाणीला'ला नवे रूप देऊन गेले. १९५३ च्या मे–जून जोड अंकात गो. रा. दोडके, शांताराम यांनी लिहिलेल्या सुंदर लघुनिबंधांनी एका नव्या कलाप्रकाराला युगवाणीत स्थान मिळवून देण्याचा शुभारंभ केला. मार्च १९५४ मध्ये कविभूषण खापर्डे यांचा गोविंदाग्रजावरील प्रबंध 'युगवाणी 'त आला. विद्वत्व आणि रसिकत्वाचा सुंदर संगम या प्रबंधात आहे. १९५४ नंतर सुरू झालेली 'पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार' ही माला आणखी ही एका दृष्टीने वेगळी ठरली. अभिजात अशा भिन्नभाषी वाङ्मयाची ओळख आणि साहित्याभिरुची वाढविण्याच्या दृष्टीने त्या वाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास यामुळे युगवाणीच्या स्वरूपात महत्त्वाचा बदल घडून आला. ' प्राचीन विदर्भाचे काव्य 'ही हूड यांची लेखमाला हा एक ऐतिहासिक मानदंड ठरला. १९५६ सालचा ' टिळक आगरकर जन्मशताब्दी विशेषांक आणि एप्रिल १९५९ चा कथाकाव्य विशेषांक ही संपादक पां. कृ. सावळापूरकर यांच्या कारकीर्दीतील महत्त्वपूर्ण घडामोड होय. सामराजाचे रुक्मिणीहरण, नरेंद्राचे रुक्मिणी स्वयंवर, बीचीं कमळा, मोरोपंतांची कथाकाव्ये, यशवंतांची कथाकव्ये अशा प्राचीन–अर्वाचीन कथाकाव्यांना एकत्र आणणाऱ्या ह्या विशेषांकाचे महत्त्व आगळे आहे. अभ्यासकांच्या दृष्टीने मर्यादित जागेतविशेष मजकूर उपलब्ध झाला आहे.

' काव्यजिज्ञासा आणि मीमांसा ह्या ' युगवाणी 'च्या कार्याचे मोल त्या कालखंडातील विभिन्न लेखावरून स्पष्ट होते. ' कलामार्ग ' हा ग. त्र्यं. देशपांडे यांचा लेख, ' आधुनिक मराठी कवींचे तत्त्वचिंतन ' हा या. मु. पाठकांचा लेख, ' मराठीची बदलती रूपे ' हा डॉ. मा. गो. देशमुख यांचा लेख तर ' साहित्य, सर्जनशीलता व रसग्रहण ' हा पु. य. देशपांडे यांचा लेख उल्लेखनीय आहे.

भाषाविषयक अभ्यासलेखांबरोबर ऐतिहासिक संशोधनालाही युगवाणीने वेळोवेळी स्थान दिले आहे. दुसरा बाजीराव यास पत्नी वाराणसीबाईचेपत्र हा य. खु. देशपांडे यांनी उपलब्ध करून दिलेला ऐतिहासिक ऐवज, ' भीष्म विवाहित की अविवाहित ?' हा पं. सीतारामशास्त्री कुरुंदकरांचा वैचारिक लेख, ' महाभारतासंबंधी नवी शोधस्थळे ' हा डॉ. रा. ग. हर्षे यांचा लेख, सीतारामशास्त्री कुरुंदकरांना उत्तर म्हणून महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी दर्शविलेले मतांतर यासारख्या लेखांमुळे युगवाणीला वैशिष्टयपूर्ण ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

अनुक्रमणिका

'ज्ञानेश्वरांचा क्षोभ' हा अ. ना. देशपांडे यांचा लेख आणि मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रावरील शरश्चंद्र मुक्तिबोध यांचा अभ्यासपूर्ण लेख ह्या अशा वैचारिक तत्त्वमंथनामुळे मराठी अभ्यासकांना 'युगवाणी'ला पूर्णतया डावलून चालणारच नाही असे निःसंदिग्धपणे म्हणावेसे वाटते.

संशोधनाबरोबर नव्या काळातील नव्या प्रवाहाशी जुळवून घेणारी विचारधाराही आवश्यक असते याचे भान 'युगवाणी'ने किती जागरूकतेने ठेवले होते त्याचा प्रत्यय वेळोवेळी येतो. 'भावगीताची भावंडे' हा भ. श्री. पंडितांचा लेख, वसंत वऱ्हाडपांडे, पद्माकर पेशकार, यांची पुस्तकपरीक्षणे, 'शिक्षणविषयक काही जिव्हाळ्याचे प्रश्न' हा के. तु. मंगळमूर्ती यांचा लेख, 'मराठी कथेतील मनोविश्लेषण' हा म. ना. लोही यांचा लेख नवी विचारधारा मांडणारे आहेत. १९६१ नंतर श्री. मा. कुळकर्णी यांनी संपादनात संशोधकाची जागरूकता आणली. सप्टेंबर १९६२च्या अंकातील संपादकीयामध्ये-नवीन मांडण्याच्या हव्यासाने मांडली जाणारी मते अर्धकच्ची असण्याचा संभव आणि त्यातून होणारी संशोधनाच्या भरीवतेची खरी जाणीव, त्यांनी प्रथम मांडली.

संशोधनाला वाव देत असतानाच गो. मा. कुळकर्णी, सुमतीदेवी धनवटे यांच्या लेखणीतून उतरलेली प्रवासवर्णने देऊन बाह्यरूपाची आकर्षकता नसली तरी अंतरंगाची अभिरुचिसंपन्नता 'युगवाणी'ने पुरेपूर मिळविली. सप्टेंबर १९६२ च्या अंकातील 'रे. टिळक' हा भ. श्री. पंडितांचा लेख, भा. ज. कविमंडन यांचा 'अनुभवाची कलात्मक पातळी' हा लेख युगवाणीच्या अभ्यासपूर्ण रसिकतेच्या परंपरेला दृढमूल करणारे ठरतात.

१९६६ पासून मा. नी. गलगलीकर यांनी 'युगवाणी'ची संपादकीय जबाबदारी स्वीकारली. ऑक्टोबर १९६६ चा 'केशवसुत विशेषांक' म्हणजे मराठी कवितेच्या संदर्भात केशवसुतांच्या स्थानाचा उहापोह करणारा एक संशोधनग्रंथ मानावा इतक्या मोलाचा आहे. भ. श्री. पंडित, दि. के. बेडेकर, मा. गो. देशमुख, दिलीप चित्रे, मधुकर वाबगावकर यांचे लेख आणि वैशिष्टयपूर्ण अशा कवितांची रसग्रहणे हे त्या बहुमोल अंकाचे गुणवैशिष्टय ठरले.

भाषाशास्त्र, विविध कलाप्रकारांच्या रसिक आस्वादाच्या दृष्टीने निर्माण होणारे प्रश्न, त्या संदर्भातील मते-मतांतरे याचा आवर्जून परामर्ष घेणारे आणि रसिक अभिरुचीच्या संदर्भात बहुमोल कार्य करणारे एकमेव वैदर्भीय नियतकालिक म्हणजे 'युगवाणी' होय. १९५० पासूनच सुरेश भट, वसंत वऱ्हाडपांडे, राम शेवाळकर; त्यानंतर मनोहर वझे, श्रीपाद मंगाघर कावळे, बाबा मोहोड अशी कवींची पिढीच 'युगवाणी'-ने अस्तित्वात आणली.

नवनव्या अभ्यासकांचा शोध आणि त्यांच्याही लेखनाला युगवाणीत मिळणारे स्थान लक्षणीय आहे. राम डोके, इंदुमती शेवडे, शं. बा. शास्त्री, ना. रा. शेंडे अशी कथालेखकांची नावे युगवाणीच्या आरंभापासूनच दिसतात. डिसेंबर १९५४ चा विशेषांक नसूनही कवी भा. रा. तांबे यांचे चार लेख कुणाही काव्य-अभ्यासकाने जतन करून ठेवावे इतके मोलाचे आहेत.

१९६५ नंतर शं. बा. शास्त्री यांनी 'युगवाणी'-च्या संपादनाची सूत्रे सांभाळली. १९६७ च्या अंकातील 'गडकऱ्यांचे नाटयसंवाद-लेखन'; 'दक्खिनी हिंदी व तिला मराठीची देन' हा देवीसिंग चौहान यांचा लेख, कवी गु. ह. देशपांडे यांच्यावरील ना. ना. हूड यांचा लेख, नोव्हे-डिसेंबर १९६९ च्या अंकातील 'माधव जूलियन काव्यदर्शन' हा डॉ. सु. रा. चुनेकरांचा लेख, 'कोल्हटकर व्यक्ती व वाङमय' हा प्राचार्य मोहगावकरांचा लेख, 'हरिभाऊंच्या काही दुर्मिळ कथा' हा इंदुमती शेवडे यांचा लेख हे सारे लेख साहित्यातील मानदंड ठरतील असे आहेत.

शं. बा. शास्त्रींच्या संपादनकालातील ऑगस्ट १९६९ हा कादंबरी विशेषांक आणि ऑक्टोबर ६९ चा म. गांधी जन्मशताब्दी विशेषांक हे महत्त्वाचे अंक मानावे लागतील. कादंबरी विशेषांकातील 'ना. सी. फडके यांचा कलावाद व त्यांचे कादंबरीवाङमय' हा प्राचार्य मोहगावकर यांचा लेख आणि ना. सी. फडके यांची ग्रंथसूची हे महत्त्वपूर्ण आहेत. त्याच काळातील 'मराठी नाटयसंगीताची वाटचाल' हा भालचंद्र फडके यांचा ऐतिहासिक आढावा, फेब्रुवारी १९७० च्या अंकातील 'अंधारयात्रेतील सौंदर्यमीमांसा' हा दीर्घ समीक्षालेख-लेखक सु. श्री. पांढरीपांडे, मार्च ७० च्या अंकातील डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांचा 'प्राचीन

मराठी काव्यग्रंथांचे संपादन' हे वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे ठरतात. ऑक्टोबर ६९ च्या महात्मा गांधी जन्मशताब्दी विशेषांकाने आचार्य विनोबा, दादा धर्माधिकारी, प्रा. वि. म. दांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'गांधीं'चे जीवन आणि तत्त्वज्ञान उलगडणाऱ्या लेखांमुळे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थानच निर्माण करून ठेवलेले आहे. साहित्याच्या पलिकडले पण साहित्याला घडवणारे गांधीवादाचे सारे आयाम या विशेषांकाच्या निमित्ताने एकत्रित आलेले दिसतात. जून १९७० हा अंक श्रीपाद कृष्णांची आठवण करून देणारा, तर सप्टेंबर ७० चा अंक विनोबांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने निघालेला. त्यातील 'भौमर्षि' हा ग. त्र्यं. माडखोलकर यांचा लेख आजही विनोबांच्या व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने मार्गदर्शन म्हणूनच ठरावा असा आहे.

१९७१ साली कवी ग्रेस उर्फ माणिक गोडघाटे यांनी 'युगवाणी' ची धुरा सांभाळली आणि युगवाणी बाह्य पृष्ठापासून बदलू लागले. रेखाचित्रे, चित्रे, रेखाटने यांचे मोल 'युगवाणी'ने खऱ्या अर्थाने ओळखले. परत एकदा विदर्भापार भरारी मारून अनेक वेचक कविलेखकांना पुन्हा पाचारण केले गेले. युगवाणीचे अंक खऱ्या अर्थाने शोभिवंत झाले. पण ललितलेखनाचा आवाका पेलण्याच्या भरात प्राचीन संशोधन; ऐतिहासिक मूल्यमापन या बाबतीत युगवाणीची झेप अपुरी ठरली, हेही परखडपणे सांगणे भाग आहे.

ग्रेस यांच्या कालखंडाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे वेगवेगळ्या विषयांवरील विचाराला चालना देणारी टिपणे! त्यांनी मागविलेले विषय जरी डोळ्याखालून घातले तरी ह्या वेगळेपणाचा प्रचंड आवाका दृष्टिक्षेपात यावा. काव्यक्षेत्रातील चैतन्यमयी बदल म्हणजे आरती प्रभू, मनोहर वझे, सुधाकर जोशी, श्रीधर शनवारे, अनंत अमदाबादकर, वसंत आबाजी डहाके असे ताकदीचे कवी पुढे आले. कथा ह्या वाङ्मयप्रकाराकडे हलके फुलके मनोरंजन ह्या पलीकडे पाहण्याची एक सखोल सर्वंकष दृष्टी नव्या युगवाणीने दिली. जुलै-ऑगस्ट १९७१ मधील वसुधा माने यांची 'विराणी' ही कथा, आनंद जातेगावकरांची 'कुमारची कथा,' मार्च-एप्रिल ७२ च्या अंकातील महेश एलकुंचवारांचे नाटक 'रुद्रवर्षा' ह्या बदलत्या युगवाणीच्या लक्षणीय अशा पाऊलखुणा आहेत. त्याच काळातील 'आत्मशोधाचे एक टिंब' हा विजया राज्याध्यक्ष यांचा ललित लेख, वीणा आलासे यांचे अभ्यासपूर्ण लेखन 'आघे अधुरे', मोहन राकेश, बालनाट्य, लोकधर्मी व नाट्यधर्मी अशी वैचारिक टिपणे ही नव्या युगवाणीची प्रशंसनीय अंतरंगखूण ठरली. टिपणांच्या संदर्भात द. भि. कुळकर्णी यांची कामगिरी महत्त्वाची मानावी लागेल.

सानिया, उर्मिला सिरुर, अंजली ठकार असे नव्या दमाचे कथाकार युगवाणीने विदर्भाच्या जवळ आणले. फेब्रुवारी-मार्च ७४ अंकातील मृणालिनी जोगळेकर यांचा 'रवींद्रांची पाऊसगीते' हा नितांतसुंदर लेख, डिसेंबर ७२ मधील 'नाट्यांतर्गत गतिलय' हा के. नारायण काळोंचा अभ्यासप्रचुर लेख आणि दुर्गा भागवतांनी मराठी मनाला भेटवलेले चित्तरंजन दासांचे सागरसंगीत, जी. ए. कुळकर्णींची नोव्हेंबर ७३ मधील रूपककथा, श्रीनिवास विनायक कुळकर्णी यांचा 'पाखरांची रात्र' हा ललित लेख, तारा वनारसे, कमल देसाई, ज्योत्स्ना देवधर, चारुता सागर, सरिता पदकी यांच्या गोळीबंद कथा ही ह्या काळाची युगवाणीची-वैशिष्ट्यपूर्ण संपादनाची- वेगळेपणाच्या सुंदर हव्यासाची-नवी आगळीवेगळी पाऊलखूण ठरते. 'ग्रेस'नी मागवलेले अनेक विषय 'युगवाणी'त आले नाहीत. पण ते विषय त्यांचे वेगळेपण-कलावंताचे उन्मनी मन दाखविण्यास अजूनही दीपमाळेचे कार्य करू शकतील. पण त्याकडे नव्या युगवाणीचे लक्ष गेलेले दिसत नाही. प्रभात चित्रचा माणूस, कुंदनलाल सैगल, कलावंताच्या आत्महत्या, कन्याकुमारीचा सूर्यास्त, अनमोल घडीतील नूरजहाँची गाणी हे मागवलेले विषय ग्रेसची मनस्वी काव्यात्म कारकीर्द दाखवून देण्यास पुरेसे आहेत.

१९७६ साली संपादन स्वीकारले डॉ. मधुकर आष्टीकर यांनी. फेब्रु.-मार्च १९७६ हा महिला विशेषांक, अचलपूरच्या विदर्भ साहित्य संमेलनात मधुकरराव चौधरींनी प्रकाशित केलेला ज्ञानेश्वर विशेषांक हे त्या कालखंडातील महत्त्वाचे अंक होत. पहिल्या वैदर्भीय लेखिका संमेलनाच्या स्वागताने नटलेला ऑक्टो.-नोव्हें. ७६ चा 'युगवाणी' वैशिष्ट्यपूर्ण होता. डॉ. आष्टीकरांनी संशोधनपर लेखांना पुन्हा महत्त्वाचे स्थान दिले. 'कालिदासविषयक नवीन संशोधनाचे परीक्षण' हा मार्च ७७ च्या अंकातील वा. वि. मिराशी यांचा लेख किंवा 'महेश्वर पंडितांचे ऋद्धिपूर माहात्म्य' हा

ज. श. देशपांडे यांचा लेख हे त्या दृष्टीने वानगीदाखल पुरेसे ठरावेत. १९७४ च्या काळातील वसंत वऱ्हाडपांडे यांचे संपादनही 'युगवाणी'ला वेगळ्या काही खुणा देऊन गेले. 'उदयगिरी : एक भ्रमणस्वगत' हा आत्माराम रावजी देशपांडे यांचा संशोधन लेख, महावीर जोंधळे, कमलाकर घारप, यांच्या कथा, वामन पात्रीकर यांची 'आवाज' ही नाटिका, 'आजची अमेरिकन रंगभूमी' हा सुनील सुभेदार यांचा लेख, 'आजची समीक्षा : काही विचार' हा सुशीला पाटील यांचा लेख, 'जी. ए. यांच्या नव्या मिथिक-कथा' हा इंदुमती शेवडे यांचा आणि प्रकाश कामतीकर, वजरंग सरोदे, दिलीप परदेशी यांच्या कविता ह्या त्या काळच्या महत्त्वाच्या पाऊलखुणा होत. माधव आचवल यांचा 'फिरते भिंग' हा भावाशयावरील प्रदीर्घ लेख हे वऱ्हाडपांडे यांच्या कारकीर्दीतील १९७४ च्या दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. ग्रेस यांच्या काव्यात्म खुणा वसंत वऱ्हाडपांडे यांनी जपल्या; पण पुढे त्या उरलेल्या नाहीत. खरे तर काव्यात्मता आणि समतोल संशोधनजिज्ञासा दोहोंचा संगम होऊन नवे युगवाणी घडते तर...

एप्रिल ७७ च्या अंकापासून डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांचे संपादन 'युगवाणी'ला लाभले. भाषाशास्त्राबरोबर कथा, कविता यातील नवेपणही त्यांनी जपले. युगवाणी दिवाळी ७७ मधील नारायण कुळकर्णी कवठेकर यांची 'सावळी' ही दीर्घ कविता, नवनव्या विद्यार्थी अभ्यासकांचे अभ्यासलेख ही त्यांच्या काळाची वैशिष्ट्ये ठरली. नोव्हें.-डिसें. ७९ चा 'राजभाषा मराठी विशेषांक' दैदीप्यमान असे नवे क्षितिजच ठरला. त्यातील 'मराठीला नडणारा भाषिक परंपरावाद' हा डॉ. श्री. वा. भागवतांचा लेख, 'मराठीचे अध्यापन-सद्यःस्थिती' हा डॉ. म. बा. कुंडले यांचा लेख, 'मराठी भाषेचे सरकारी शिल्पकार' हा श्री. के. क्षीरसागर यांचा लेख कायम लक्षात राहावे असे ठरेल. नियतकालिकांमधून अशी अक्षरता जोपासणे हे 'युगवाणी'चे आजतागायतचे सहजधर्म आहेत. १९८० नंतर श्री. शरद कोलारकर यांनी युगवाणीच्या संपादनाचे कार्य अंगावर घेतले. पारितोषिकपात्र एकांकिकांना युगवाणीत स्थान देऊन नाट्याचे नवे प्रवाहच युगवाणीने अक्षरबद्ध करून ठेवले.

'अण्णासाहेब किर्लोस्करांचा केशराचा मळा' हा अ. द. वेलणकरांचा लेख, 'एक आगळी कूर्म प्रतिमा' हा गो. वं. देगलूरकरांचा संशोधनपर लेख, मे-जून १९८२ अंकातील 'शब्द असा हा-रसरेषांची अगणित नगरे' हा उषा मा. देशमुख यांचा नितांतसुंदर लेख ही युगवाणीची आजची वाटचाल आहे.

ललित साहित्याचा व्यवसाय करणाऱ्या नियतकालिकांशी चढाओढ म्हणून नाही तरी दर्जेदार ललित साहित्य ही युगवाणीची प्रारंभापासूनची देणगी ठरली आहे. मौलिक संशोधनपूर्ण नव्या साहित्याचे स्वागत, नव्या अभ्यासकांचे चिकित्सक अभ्यास, हे युगवाणीचे वैशिष्ट्य आहे. बौद्धिक पातळीवरील काव्यानंद आणि ललित कृतीचा पद्धतशीर आस्वाद अशा वरवर विरोधी वाटणाऱ्या गोष्टी एकत्र आणीत वाटचाल करणारे हे वैदर्भीय नियतकालिक वयाची पस्तिशी ओलांडून पुढे जात आहे. मराठी साहित्याची अभिवृद्धी आणि अभिरुचीची नवी जडणघडण याबाबतची नवी अपेक्षा त्याच तोलामोलाने पूर्ण करीत 'युगवाणी'ला पुढे जायचे आहे.

ह्या वाटचालीची भलावण करताना काही प्रश्नही जाणवत राहतात : एखाद्या वैदर्भीय कलावंताची स्फुल्लिंगप्रतिभा युगवाणीने का मांडू नये ? नवे लेखक मिळविताना नवनवे वाङ्मयविचाराचे कंद जोपासताना एकसलग असे वाङ्मयचिंतन का मांडले जाऊ नये ? व्यक्तिचित्र ह्या क्षेत्रातील किंवा संगीत, चित्रपट ह्या क्षेत्रातील नवेपण 'युगवाणी'ने का जोपासू नये ? प्रौढ पारंपारिक जुन्या वळणाच्या समीक्षेबरोबरच गेल्या दशकातील नवनव्या कलाकृतींनी साहित्यविचाराला दिलेल्या आव्हानांचा जागरूक परामर्श युगवाणीच्या समीक्षालेखनाने द्यायला हवा. तसेच साहित्यविचारातील अद्यावत प्रवाह आपल्या वाचकांपर्यंत पोचवायला हवेत. अभ्यासशील अशा या नियतकालिकाने व्यावसायिक आणि व्यापारी धोरणांच्या मार्गाने न जाता आजपर्यंत जशी वाटचाल केली त्याच रीतीने अभिरुचिसंपन्न कलात्मता जोपासली तर व्यावहारिक दृष्टीनेही हे नियतकालिक निश्चित पुढे येऊन वाङ्मयीन जगातला एक चमत्कार दाखवू शकेल यात संशय नाही. सुजाण आणि द्रष्ट्या संपादनाने युगवाणीत घडत गेलेले हे सारे सुंदर बदल असेच जोपासत, युगवाणीने वाटचाल केली, तर समीक्षा, संशोधन याबरोबर ललित वाङ्मयीन कर्तृत्वाचा विकासपटही आपल्याला 'युगवाणी'च्या रूपाने पहायला मिळेल. हीच युगवाणीच्या निरलस साहित्यप्रेमाची आणि उज्ज्वल वाङ्मयोपासनेची फलश्रुती ठरेल. △

परीक्षा समिति

शोभा उबगडे

विदर्भाची साहित्य क्षेत्रातील अग्रणी संस्था विदर्भ साहित्य संघ. या संस्थेची परीक्षा समिती गत ३८ वर्षांपासून मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान बाळगून, मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य अविरत करीत आहे. मराठी भाषिकांबरोबरच अमराठी भाषिकांनाही मराठी साहित्याचा आस्वाद घेता यावा यासाठी परीक्षा समितीचे सतत प्रयत्न चालू आहेत.

परीक्षा समितीतर्फे ज्या विविध परीक्षांचे आयोजन केले जाते त्याचा उद्देश मराठी भाषा आणि वाङमय या विषयाची गोडी वाढविणे, तसेच महाराष्ट्रातील अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार आणि प्रसार करणे हे आहे. या उद्देशपूर्तीसाठीच विदर्भ साहित्य संघात परीक्षा समिती स्थापन करण्यात येऊन योग्य अभ्यासक्रमानुसार परीक्षांचे आयोजन करण्यात येऊ लागले.

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीचे प्रथम संचालकपद कै. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी भूषविले होते. सुमारे पाच वर्षांच्या कार्यकालात त्यांनी परीक्षा संचालनाचे कार्य केले. इतकेच नव्हे तर परीक्षा समितीचे प्रथम कार्यालय त्यांच्या निवासस्थानी होते. त्यांचे कार्यवाह म्हणून त्यावेळी त्यांना डॉ. अ. ना. देशपांडे यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या कार्यकालात जुन्या मध्य प्रदेशच्या शिक्षणपद्धतीनुसार अमराठी भाषिकांकरिता मराठी प्रवेश आणि मराठी प्रारंभ ह्या दोनच परीक्षा असून विनीत, परिचित, स्नातक आणि पारंगत ह्या साहित्यविषयक परीक्षांचे संचालन करण्यात येत असे. कै. प्रा. बनहट्टी यांनी तत्कालीन मध्यप्रदेश या द्विभाषिक (जुना मध्यप्रांत–वऱ्हाड) राज्यातील शासन आणि शिक्षण खात्याकडून 'मराठी विनीत' या परीक्षेला विशेष मान्यता प्राप्त करून घेतली होती. ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अमराठी शासकीय कर्मचाऱ्यांना डिपार्टमेंटल परीक्षा द्यावी लागत नसे.

१९४९ ते १९५२ या कालात डॉ. वि. भि. कोलते यांनी संचालकपद भूषविले. संचालकपदाची सूत्रे हाती असताना त्यांनी साहित्य स्नातक परीक्षेसाठी विद्यापीठाची मान्यता मिळविण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य केले. त्यानुसार अमराठी प्राध्यापकांना मराठी माध्यमातून शिकविण्यासाठी साहित्य स्नातक ही परीक्षा विद्यापीठाने अनिवार्य केली आहे.

१९६६ ते १९७१ या कालखंडात कै. श्री.ग. त्र्यं माडखोलकर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष असताना आणि श्री. ग. स. देशपांडे परीक्षा समिती संचालक असताना समितीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले. ह्या द्वयांच्या परिश्रमाचे साफल्य म्हणजे अमराठी शास-

कीय कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या परीक्षा. अमराठी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी प्रवीण (निम्नस्तर) व प्राज्ञ (उच्चस्तर) अशा दोन विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येऊन त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून मान्यता प्राप्त करून घेण्यात आली. ती अद्यापही कायम आहे. १९७२ ते १९७४ या कालखंडात श्री. कृ. मा. चवरे यांनी परीक्षा समितीचा कार्यभार अत्यंत सुचारुरूपात वहन केला.

१९६२ ते १९६५ तद्वत् १९७४ ते १९८० हा बृहद कालखंड परीक्षा समितीच्या प्रगतीचा आणि उत्कर्षाचा कालखंड म्हणून विशेष उल्लेखनीय आहे. या कालखंडात संचालनपदाची सूत्रे प्रा. श्री. माणिक के. वैतुले यांचे हाती आली. परीक्षाविषयक धोरणात वारंवार होणाऱ्या परिवर्तनाचे यथोचित अवलोकन, सूक्ष्म निरीक्षण आणि चिंतन करून तद्नुसार परीक्षा समितीचा अभ्यासक्रम आयोजित करण्याचे श्रेय त्यांना आहे. माध्यमिक शिक्षण मंडळ आणि विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात व परीक्षा पद्धतीत झालेल्या परिवर्तनानुसार मराठी प्राथमिक (पाचवी समकक्ष) ते साहित्यवाचस्पती (डी. लिट. समकक्ष) परीक्षांचे समर्थपणे आयोजन केले जाऊ लागले. समकक्ष आणि एकरूप असा अभ्यासक्रम, त्यानुसार परीक्षापद्धती आणि आवश्यक तेथे खंडशः परीक्षा पद्धती निर्माण करून परीक्षार्थींना संचालकांनी योग्य प्रोत्साहन दिले. या सर्वांचा परिपाक म्हणजेच या कालखंडातील यशाची चढती कमान.

महाराष्ट्रातील सर्वाधिक प्राचीन संस्था 'महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे' यांच्या परीक्षा सुरू असताना विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन साहित्य संघाने कै. श्री. ना. बनहट्टी यांच्या नेतृत्वाखाली या द्विभाषिक प्रदेशात मराठी परीक्षा सुरू केल्या. काही ठिकाणी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे आणि विदर्भ साहित्य संघ नागपूर या दोन्ही संस्थांच्या परीक्षा घेतल्या जात. परंतु महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आणि विद्यापीठाचा बदलता अभ्यासक्रम व पद्धतीनुसार, तद्वत प्रदेशातील एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन राष्ट्रभाषा प्रचार समिती, संस्कृत प्रचारिणी इत्यादींच्या धरतीवर प्रचारात्मक दृष्टी ठेवून जेव्हा अभ्यासक्रम व परीक्षापद्धतीचा स्वीकार करण्यात आला तेव्हा परीक्षांना उत्तम प्रतिसाद मिळाला. ५० परीक्षार्थीपासून आरंभ झालेल्या परीक्षा समितीने सहा हजाराहून अधिक परीक्षार्थींची संख्या वाढविलेली आहे.

साहित्याचार्य (पीएच. डी. समकक्ष) प्रबंध परीक्षा घेण्याचे निश्चित केल्यापासून विद्यापीठाच्या धर्तीवर या पदवीसाठी विषय मंजूर करण्यासाठी आणि परीक्षकांची नावे सूचित करण्यासाठी 'शोध प्रबंध समिती' या स्वरूपात एक उच्च समिती स्थापन करण्यात आली होती. प्रारंभी डॉ. पेंडसे, डॉ. कोलते, कै. प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. सावळापूरकर, (तत्कालीन संचालक) आणि प्रा. श्री. माणिक के. वैतुले (तत्कालीन कार्यवाह) हे सदस्य या समितीत होते. त्यानंतर तत्कालीन परिस्थितीनुसार प्रशासनपद्धतीत परिवर्तन करण्यात आले.

१९७२ पासून १९७४ पर्यंत श्री. कृ. मा. चवरे यांनी कार्यभार सांभाळला. १९७४ ला पुनश्च प्रा. श्री. माणिक के. वैतुले यांनी कार्यभार हाती घेतल्यापासून समितीची उत्तरोत्तर प्रगतीच होत गेली. मराठी भाषिकांप्रमाणेच अमराठी भाषिकांची संख्याही सतत वाढती आहे. या सर्व उत्कर्षाचे श्रेय आमच्या केंद्राधिकाऱ्यांना आहे.

१९८० पासून प्रा. श्री. माणिक के. वैतुले हे जरी परीक्षा समितीचे कार्य पहात नसले तरी दोन्ही सत्रातील परीक्षा व अन्य कार्यव्यापार पुढे सुरळीत सुरू आहे. मध्यंतरीच्या काळात म्हणजे डिसें. १९८० मध्ये परीक्षा समितीने एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. अ-मराठी भाषिकांसाठी निःशुल्क 'भाषा परिचय वर्ग' सुरू करण्यात आले. याचा शुभारंभ अकोला येथील अ. भा. मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष श्री. गो. नी. दांडेकर यांच्या हस्ते झाला. या भाषा परिचय वर्गास प्रतिसादही उत्तम मिळत आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून मान्यताप्राप्त मराठी प्रवीण व मराठी प्राज्ञ परीक्षांचा प्रचार आणि प्रसार करण्यात परीक्षा समितीचा मोठा वाटा आहे. या परीक्षार्थींच्या मार्गदर्शनासाठी विशेष वर्गाचे आयोजनही केले जाते.

परीक्षा समितीचा कार्यविस्तार केवळ विदर्भातच नव्हे, तर महाराष्ट्रात पसरला आहे. केवळ प्रमाणपत्र प्राप्त होते म्हणून या परीक्षांना बसायला हवे

अशी भावना न राहता विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिक मूल्यांची, लिखाणाची आवड निर्माण करण्यासाठी परीक्षा समिती विविध योजनांद्वारे प्रयत्नशील आहे. त्यानुसार परीक्षा समितीच्या विविध योजनाही आहेत. त्यादृष्टीने परीक्षा समितीचे, सदस्य, संचालक. सचिव आदींनी विविध परीक्षाकेंद्रांना भेटी देऊन परीक्षांचे महत्त्व प्रतिपादन केले. त्याचा योग्य तो परिणाम दिसून आला. परीक्षा समितीच्या उच्च पदवी परीक्षार्थींना अभ्यासाच्या दृष्टीने विशेष ग्रंथ उपलब्ध व्हावेत यासाठी वि. सा. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे श्री. चंद्रकान्त कुळकर्णी यांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्य दिलेले आहे. या परीक्षार्थींना त्यांचे मार्गदर्शनही लाभते.

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीतर्फे वर्षातून दोन सत्रात परीक्षा आयोजित केल्या जातात. प्रथम सत्रात केंद्रची व परीक्षार्थी संख्या सीमित असते. बोर्ड आणि विद्यापीठीय अभ्यासक्रमानुसारच परीक्षा समितीच्या परीक्षांचे अभ्यासक्रम असल्याने द्वितीय सत्रातील परीक्षांना उत्तम प्रतिसाद मिळतो. या परीक्षांमुळे परीक्षार्थींची मराठी विषयाची पूर्वतयारी होते. परीक्षांचा निकाल बोर्डाच्या आणि विद्यापीठ परीक्षांच्या अगोदर लागत असल्याने अधिक गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी परीक्षार्थींना वाव मिळतो.

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षात ज्यांना विशेष गुणवत्ता प्राप्त होते त्यापैकी अनेकांना बोर्ड आणि विद्यापीठाच्या मराठी विषयात विशेष गुणवत्ता प्राप्त झाल्याचे चित्र आहे. ज्या विविध केंद्रातून वि. सा. संघाच्या परीक्षा घेतल्या जातात त्या केंद्राधिकाऱ्यातही उत्साह आढळतो. या केंद्राधिकाऱ्यांना परीक्षा समितीतर्फे केंद्र पुरस्कार म्हणून संपूर्ण परीक्षा शुल्काच्या २५ टक्के रक्कम देण्यात येते. या पुरस्कारातून अनेक केंद्राधिकारी आपल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन लाभावे म्हणून पारितोषिकेही देतात. याप्रमाणे सर्वांच्या सहकार्याने परीक्षा समितीचे कार्य सुयोग्य रीतीने सुरू आहे.

△ △ △

कै. डॉ. वा. ग. शिंगणापूरकर स्वर्णपदक प्राप्तकर्ते

(वि. सा. संघ साहित्य पारंगत)

सौ. उषा रत्नाकरराव लाखे, श्री. रामभाऊ चिधूजी वैरागडे, श्री. नीळकंठ नामदेवराव काडगाये, श्री. रमेश नारायण कांबळे, सौ. भाग्यश्री प्रमोद काळीकर, सौ. उषा हेमंत चाटी, श्री. विजय नारायणराव इंगळे, डॉ. कुसुमलता पटोरिया (जैन), श्री. हरिश्चंद्र तानबाजी निघोट.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

चंद्रकांत कुळकर्णी

विदर्भ साहित्य संघाचे श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय गेली २० वर्ष मराठी अभ्यासकांची सेवा करीत आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासारखे समृद्ध ग्रंथसंग्रहालय विदर्भात नसल्यामुळे या भागातील मराठीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांची फार गैरसोय होत असे. ही गैरसोय दूर करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष कै. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या विशेष प्रयत्नाने या कार्याला चालना मिळाली. सुरुवातीला एक लहानसे पुस्तकालय व नंतर गडकरी ग्रंथ स्मारक ग्रंथालय हा या कार्याचा शुभारंभ. कै. आनंद कृष्णाजी टेकाडे, कै. ना. के. बेहरे, कै. भ. श्री. पंडीत, कै. श्री. अळेकर, कै. भाऊसाहेब माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते इ. विदर्भातील मान्यवर साहित्यिकांनी व संशोधकांनी आपला बहुमोल असा ग्रंथसंग्रह या वाचनालयाला देऊन कार्यारंभ केला. त्यानंतर या लहानशा पुस्तकालयाचे रूपांतर समृद्ध ग्रंथालयात होण्यास सुरुवात झाली. नागपूरचे दानशूर नागरिक कै. पु. बा काळे यांनी संदर्भ ग्रंथालयाच्या बांधकामासाठी २५,००० रु. देणगी दिली. शासनानेही या कार्याला भरघोस देणगी देऊन उपकृत केले व विदर्भ साहित्य संघाने १२–८–६० रोजी शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या बांधकामाचा मुहूर्त केला व थोड्या अवधीतच ६०,००० ग्रंथ राहतील असे संदर्भ ग्रंथालय उभे करण्यास कार्यकर्त्यांना यश आले. सध्या या संदर्भ ग्रंथालयात १०,००० निवडक संदर्भ ग्रंथ तसेच विज्ञानविस्तार, मासिक मनोरंजन, रंगभूमी इ. मासिकांचे दुर्मिळ अंक आहेत. हस्तलिखितांचाही संग्रह करण्याचा विशेष प्रयत्न करण्यात येत आहे,

संदर्भ ग्रंथालयाची विशेष वैशिष्टये

पदव्युत्तर अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना तसेच संशोधनकार्य करणाऱ्या संशोधकांना तत्पर संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे हे या संदर्भ ग्रंथालयाचे वैशिष्टय आहे. नागपूर विद्यापीठात एम. ए. परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या, तसेच विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना बसणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा फायदा झालेला आहे. गेल्या २० वर्षात जवळपास २००० विद्यार्थ्यांनी या ग्रंथालयाचा फायदा घेऊन परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. अनेक खाजगी विद्यार्थ्यांनी या ग्रंथालयात अभ्यास करून एम. ए. च्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेले आहे. एम. ए. परीक्षेबरोबरच संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना हमखास संदर्भ मिळतील याची संदर्भ ग्रंथालयाने वेळोवेळी खात्री दिली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या भाषा व साहित्य–संशोधन या

नवीन ग्रंथात विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाचा उल्लेख "संशोधकाचे तीर्थक्षेत्र" असा केला आहे. गेल्या २५ वर्षात विदर्भातून जे वाङ्मयीन संशोधन झाले त्या सर्वांना या ग्रंथालयाने मोलाचे साहाय्य केलेले आहे. या सर्व संशोधकांनी आपल्या प्रबंधातून ग्रंथालयाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या संशोधकांनाही संदर्भ-सेवा तत्परतेने देण्यात आली आहे.

१. वृत्तपत्र संदर्भ सेवा :

नागपुरातील वृत्तपत्रांना अतिशय जलद गतीने लागणारी अचूक संदर्भसेवा देणे हे विदर्भ साहित्य संघाने आपले कर्तव्य समजले आहे व ही आपुलकीने मिळणारी संदर्भसेवा नागपूरच्या सर्व वृत्तपत्रांनी घेऊन या ग्रंथालयाशी कायम मैत्री जोडली. सुप्रसिद्ध पत्रकार कै. भाऊसाहेब माडखोलकरांनी अनेक ग्रंथांच्या प्रस्तावनेतून या संदर्भ ग्रंथालयाचा उल्लेख केलेला आहे.

२. वाङ्मयीन व्यक्तित्व घडविण्याचा अनोखा प्रयत्न :

नवीन पिढीतील जे अभ्यासक या संदर्भ ग्रंथालयाचा फायदा घेतात त्या विद्यार्थ्यांना नुसती संदर्भ-सेवा न देता त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व फुलविण्याचा प्रयत्न विविध कार्यक्रमाद्वारे केला जातो. या अभ्यासकांची लेखनप्रवृत्ती वाढावी, त्यांची रसिकता विकसित व्हावी या दृष्टीने संदर्भ ग्रंथालय विशेष लक्ष पुरवीत आहे. नव्या समीक्षकांना व्यासपीठ देणारा कार्यक्रम याची साक्ष देईल. या कार्यक्रमाद्वारे अनेक ताज्या दमाच्या समीक्षकांना संदर्भ ग्रंथालयाने समीक्षेच्या प्रांतात नेऊन सोडले. आमच्या 'आस्वाद' या कार्य-क्रमाद्वारे साहित्यातील अनेक नवीन प्रवाह व कार्य-क्रमांची दखल आवर्जून घेण्यात येते. आमच्या शोध-निबंध प्रकल्पातून विदर्भातील अनेक छोटे शोधनिबंध लिहून घेण्यात आले. दलित साहित्य अभ्यास साधने हा आमचा विशेष प्रकल्प. मराठी साहित्याच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या चळवळीकडे विशेष लक्ष आहे. दलित साहित्यातील प्रत्येक प्रकाशित ग्रंथ या प्रकल्पात असावेत अशी आमची इच्छा आहे व तसे प्रयत्न चालू आहेत. 'दलित साहित्य अभ्याससाधना' या प्रकल्पाचा प्रारंभ एप्रिल १९८० पासून झाला. विदर्भातील बालसाहित्याचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा एक शोधनिबंधाचा प्रकल्प श्री. गोविंद गोडबोले व सौ. शुभांगी संत यांनी हाती घेतलेला आहे. नागपूर विद्यार्थी परिषदेच्या सहकार्याने 'निशांत' हस्तलिखित दर १५ दिवसांनी प्रकाशित करून तरुण पिढीला व्यासपीठ देण्याचा संदर्भ ग्रंथालयाने आवर्जून प्रयत्न केलेला आहे. अशी ही संदर्भ ग्रंथालयाच्या मोठ्या संकल्पाकडे चालू असलेली वाटचाल. या वाटचालीत अनेक लहान–मोठ्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. त्या सगळ्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार.

△ △ △

युगवाणी : जुन्या–नव्या लेखकांचे व्यासपीठ व्हावे !

सर्व लेखकांची ही अपेक्षा आम्हाला मान्य आहे. आमचे त्यादृष्टीने प्रयत्नही सुरू आहेत. सर्व नामांकित आणि नवोदित साहित्यिकांनी आणि समीक्षकांनी युगवाणीला लेखनसहाय्य करावे. जुन्या–नव्या लेखकांचे व्यासपीठ : युगवाणी हे समीकरण निर्माण करणे, तुमच्या सहकार्याशिवाय अशक्यच !



॥ स्मृती ॥

वि. सा. संघाचे कार्यालय नागपूरला कसे आले ?

ना. रा. शेंडे

१९४९ सालचे साहित्य सम्मेलन चंद्रपूर (चांदा) येथे भरले. सम्मेलनाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख तर उद्घाटक आचार्य दादा धर्माधिकारी होते. उद्घाटनपर भाषण विचारपरिप्लुत होते. पण या उच्चस्तरावरील भाषणाने बराच वेळ घेतल्याने अध्यक्षीय भाषणाला हवा तो वेळ लाभू शकला नाही. भाषण मुद्रित होते. तेव्हा त्यातील केवळ वेचक स्तंभच काय ते निरुपायाने वाचून दाखविले. त्या भाषणातील महत्त्वपूर्ण रसगंध पूर्णाकार घेऊ शकला नाही; पण ज्या वैचारिक स्तंभाचे रसाळ वाणीत वाचन झाले त्याचा प्रभाव मात्र विशेष होता.

या संम्मेलनप्रसंगी भोजनोत्तर मध्यरात्रीच्या सुमारास प्रतिनिधींच्या एका दालनात शेलक्या आठ-दहा श्रेष्ठ साहित्यिकांची एक गुप्त बैठक झाली. ती खास बैठक साहित्यपंडित व पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या नेतृत्वाखाली भरली होती. त्यांनी मला मुद्दाम बोलावून घेतले होते. या साहित्य सम्मेलनानंतर पुढचे धोरण काय ? डॉ. मा. गो. देशमुखानंतर दुसरा वजनदार अध्यक्ष कोण असावा; विदर्भ साहित्य संघाचे कार्यालय व दप्तर श्री. नारायणराव दिवाण यांच्या घरी अमरावतीलाच ठेवावे की त्या वेळच्या राजधानीचे मुख्य शहर असलेल्या नागपूरला आणावे? नरम–गरम चर्चा झाली. वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. दिवाण हे नुकतेच एका अपघाताने कालवश झाल्याने जी एक पोकळी निर्माण झाली होती, त्याचाही दूरदृष्टीने विचार करण्यात आला. खडाजंगीच्या तप्त चर्चेनंतर तीन बाबी निश्चित करण्यात आल्या. श्री. हरिभाऊ नेने हे अध्यक्ष असावेत; दुसरे अत्यंत महत्त्वाचे म्हणजे वि. सा. संघाचे कार्यालय व संपूर्ण दप्तर नागपूर या केन्द्रस्थानी असलेल्या राजधानीच्या शहरी रहावे आणि तिसरे म्हणजे श्री. दिवाण यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने अमरावतीकरांचे मन न दुखविता, श्री. दिवाणजींच्या पत्नी श्रीमती शकुंतला दिवाण यांना सरचिटणीसपद द्यावे व नागपूरचे श्री. रा. पु. सगदेव यांना चिटणीस म्हणून ठेवावे. पूर्व मध्य प्रदेशाच्या काळात एक तर अमरावती दूर अंतरावर पडते आणि खाजगी घरी वि. सा. संघाचे दप्तर ठेवावे लागते. तेव्हा वि. सा. संघाच्या कार्याची व्याप्ती वाढावी, संस्थेचे स्वतःचे स्वतंत्र स्थळ असावे आणि विदर्भातील सर्व साहित्यिकांना सोयीचे केंद्रस्थान नागपूर हेच योग्य ठरणार असल्यामुळे, मध्यप्रदेश शासनाकडून वि. सा.

संघाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र जागा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

चंद्रपूरचे साहित्य सम्मेलन समाप्त झाल्यावर, निर्दिष्ट गुप्त बैठकीत ठरल्याप्रमाणे, नागपूरला वेगाने कार्यचक्र फिरू लागले. नागपूरच्या एका बंदिस्त बैठकीत अध्यक्षांच्या निवडीच्या प्रश्नावर एक वेगळाच सूर घुमसू लागला. शासनाकडून स्वतंत्र जागा प्राप्त करून घ्यायची असेल व स्वतंत्र कार्यालय थाटायचे असेल तर वि. सा. संघाचा अध्यक्ष हा दमदार व मध्यप्रदेश शासनाशी संबंधित व विशेषत: मंत्र्यांवर वजन पडणारा असावा, त्याशिवाय कार्यसिद्धी होणार नाही, असा विचारप्रवाह वाहू लागला. त्या प्रवाहाने गती धरली. श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे या विचारप्रणालीचे सूत्रधार होते. श्री. हरिभाऊ नारायण नेने हे जर अध्यक्ष राहिले तर जागाप्राप्तीचे व कार्यालयनिर्मितीचे अवघड काम त्यांना झेपणार नाही; दुसरे ते सरकारी अधिकारी आहेत व तिसरे म्हणजे ते सध्या अमरावतीला नोकरीवर असल्याने प्रसंगी नागपूरला हालचाली करणे त्यांना जमणार नाही असे काहींचे ठाम मत होते; तर चंद्रपूरच्या साहित्य सम्मेलनप्रसंगी एकदा श्री. हरिभाऊ नेने यांना अध्यक्ष करण्याचे ठरल्यावर, त्यांना डावलणे इष्ट होणार, नाही, असे दुसरे तीव्र मत होते. त्यामुळे आपसात फार मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. यावर काही केल्या तोडगा निघेना. पण शेवटी, साहित्यिक वर्तुळातील एका धूर्त व मुत्सद्दी साहित्यिकाने, कार्याचे विशेष प्रयोजन व महत्त्व लक्षात घेता श्री. भाऊसाहेब माडखोलकर हेच अध्यक्ष असणे हितप्रद ठरेल, असा भर दिला व कुणी तरी खास साहित्यिक दूत अमरावतीला पाठवून त्याच्याकरवी श्री. हरिभाऊ नेने यांचे मन वळविण्यात यावे अशी आग्रही सूचना केली. त्यानुसार ही अवघड कामगिरी प्रा. भ. श्री. पंडितांवर सोपविण्यात आली. अवधी अगदी थोडाच असल्यामुळे प्रा. भ. श्री. पंडित यांना रातोरात अमरावतीला जावे लागले. त्यांनी हरिभाऊंची भेट घेतली. मोठ्या कुशलतेने त्यांनी त्यांना प्राप्त परिस्थितीची जाणीव करून दिली. हरिभाऊ शालीन, सत्प्रवृत्त व निःस्वार्थ प्रकृतीचे गृहस्थ. राजकारणातील तर नव्हेच नव्हे, पण साहित्यक्षेत्रातील करामती डावपेचाची सुद्धा क्लृप्ती माहीत नसलेले. 'विदर्भ साहित्य संघाचे कल्याण होत असेल आणि भाऊसाहेब माडखोलकर अध्यक्ष होत असतील तर माझी काही हरकत नाही', अशा आशयाचे एक छोटे पत्र लिहून ते त्यांनी तेवढ्या रात्री प्रा. पंडित यांच्या स्वाधीन केले.

वि. सा. संघाचे त्या वेळचे चतुर सूत्रधार भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षपदाचा मार्ग पूर्णत: मोकळा झाला !

परंतु पुढे अमरावतीकर साहित्यिकांना व वि. सा. संघ कार्यकर्त्यांना साहित्यक्षेत्रात शिताफीने शिजलेले ते राजकरण कळले आणि ते खवळून उठले. प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. काकासाहेब सहस्रबुद्धे व श्री. द. शं. फडके प्रभृतींना हा धूर्तपणा आणि डावपेच मुळीच पसंत पडला नाही. वि. सा. संघाचे दप्तर कोणत्याही परिस्थितीत नागपूरला हलविता कामा नये व भाऊसाहेब माडखोलकर यांनी अध्यक्षही होता कामा नये अशा निर्धाराने त्यांनी विरोधी चळवळ निर्माण केली. अध्यक्षपदासाठी हरिभाऊ नेने यांनी माघार घेतली म्हणून ते त्यांना खूप टाकून बोलले आणि 'वि. सा. संघाचे दप्तर नागपूरला कसे हलविता ते पाहून घेऊ...आम्ही अन्याय सहन करणार नाही...विदर्भ साहित्य संघाची निर्मिती अमरावतीला झाली आहे तेव्हा त्याचे दप्तर व कार्य अमरावतीहूनच होईल नाहीतर...'अशी धमकी अमरावतीकरांनी दिली.

परंतु या तीव्रतर जाणिवेला वा धमकीला, दोनचार साहित्यिक व्यक्ती वगळल्या तर इतर नागपूरकर साहित्यिकांनी कसलीही दाद दिली नाही, कसली पर्वा केली नाही. शेवटी, श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे १९४९–५० या वर्षासाठी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष झाले. प्रा. सौ. कुसुमावतीबाई कोषाध्यक्ष, सरचिटणीस श्रीमती शकुंतलाबाई दिवाण व श्री. रा. पु. सगदेव हे चिटणीस, असे पदाधिकारी झाले. आणि संकल्पित योजनेच्या कार्याला द्रुतगतीने प्रारंभ झाला. वि. सा. संघाचा अमरावतीतील दप्तरखाना श्रीमती शकुंतलाबाई दिवाण यांच्या मार्फत नागपूरला हलविण्यात आला व चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांच्या निवासस्थानी तो तात्पुरता ठेवण्यात आला.

△ △ △

अनुक्रमणिका

' अण्णांची कारकीर्द '

श्री. गो. काशीकर

१९५६ ची गोष्ट. एके दिवशी श्री. अण्णाजी पांढरीपांडे, श्री. अण्णाजी मालोदे इ. मित्रमंडळी माझे-कडे आली व म्हणाली, "अण्णाजी, तुम्ही विदर्भ साहित्य संघाच्या कामात भाग घ्यावा असं आम्हाला वाटतं." विदर्भ साहित्य संघाचा मी सभासद होतोच आणि समाजकार्याचीही आवड होती, त्यामुळे विशेष आढेवेढे न घेता मी होकार दिला व त्यावर्षी निवड-णुका होऊन मी सरचिटणीस झालो.

सतत नऊ वर्षे मी सरचिटणीस होतो. आम्ही तिघेही अण्णा कार्यकारी मंडळात होतो. शिवाय संघाचे विश्वस्त कै. न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती. त्यामुळे आमच्या कारकिर्दीला 'अण्णांची कारकीर्द' असे विनो-दाने संबोधले जात असे. तथापि श्री. भाऊसाहेब माड-खोलकर, श्री. नाना जोग व श्री. पु. य. देशपांडे हे आमचे खरे मार्गदर्शक असत. शिवाय महाराष्ट्राचे संपादक श्री. ढवळे, साहित्यिक श्री. ना. रा. शेंडे व कविवर्य 'अनिल' (आ. रा. देशपांडे) ह्या संघाध्य-क्षांच्या नेतृत्वाचाही आम्हाला लाभ मिळाला.

त्या काळात मराठी विश्वात तीन प्रश्नांनी जटिल स्वरूप धारण केले होते. एक होता संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न, दुसरा मराठी शुद्धलेखनाचा आणि तिसरा मराठी साहित्य महामंडळाच्या निर्मितीचा.

संयुक्त महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आमच्यामध्ये तीव्र मतभेद होते. काही संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूचे होते तर काही कट्टर विदर्भवादी. श्री. माडखोलकर, पु. य. देशपांडे इ. एका बाजूला तर विश्वस्त लो. ना. बापूजी अणे दुसऱ्या बाजूला. अशा स्थितीत विदर्भ साहित्य संघाला संस्था म्हणून ह्या प्रश्नापासून अलिप्त ठेवावे असे सर्वसंमतीने धोरण ठरविण्यात आले. दर-वर्षीच्या साहित्य संमेलनात सरहद्दीलगतचा मराठी-भाषी प्रदेश शेजारच्या मराठी प्रदेशाला जोडण्यात यावा असा ठराव करण्यात येत असे; परंतु संयुक्त महाराष्ट्र की स्वतंत्र विदर्भ ह्या प्रश्नावर ठराव होत नसे. त्यामुळे दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते संघाच्या व्यास-पीठावर एकत्र येऊ शकत असत. परंतु १९५८ च्या तळोधी येथील साहित्य संमेलनात ह्यामुळे पेच निर्माण झाला. सुप्रसिद्ध कवी प्रा. या. मु. पाठक हे तळोधी संमेलनाचे अध्यक्ष होते. ते कट्टर विदर्भवादी. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वतंत्र विदर्भाचा पुर-स्कार करण्याचे ठरविले. त्यांचे मन वळविण्याचा बराचा प्रयत्न करण्यात आला, परंतु ते आपला निश्चय सोडीनात. शेवटी 'हे माझे वैयक्तिक मत आहे' असा खुलासा करण्याचे त्यांनी मान्य केले व ह्यावर हा पेच सुटला.

त्यानंतर लवकरच विदर्भ साहित्य संघाच्या नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. तीत बहुसंख्य सभासद व्यक्तिशः संयुक्त महाराष्ट्रवादी होते. तरी देखील संस्थेच्या कार्यात मतभिन्नता आड येऊ द्यावयाची नाही ह्या धोरणानुसार प्रा. या. मु. पाठक यांची युगवाणी मासिकाचे संपादक म्हणून निवड करण्यात आली. काही काळ त्यांनी मासिक फार चांगल्या रीतीने संपादित केले; पण विदर्भाच्या प्रश्नावर त्यांच्याच्याने राहवेना. त्यांच्या भावनाप्रधान कविमनाला विदर्भ साहित्य संघाची अलिप्तता बोचू लागली व त्यांनी युगवाणीच्या संपादकीयातून विदर्भ साहित्य संघावर उपरोधात्मक व जळजळीत टीका केली. त्यामुळे त्यांना संपादकपदावरून मुक्त करण्यात आले. परंतु ह्यामुळे उभय पक्षांनी वैयक्तिक कटुता निर्माण होऊ दिली नाही व संघाच्या कार्याला हानी पोहोचू दिली नाही हे विशेष होय.

ह्यापुढचे साहित्य संमेलन वणी येथे घ्यावयाचे घाटत होते. वणी हा विदर्भवाद्यांचा बालेकिल्ला होता. वि. सा. संघाचे विश्वस्त लो. ना. बापूजी अणे यांना संमेलनाचे अध्यक्ष करावे व त्यांनी संघाच्या व्यासपीठावरून स्वतंत्र विदर्भाची मागणी करावी असा वणीच्या काही प्रमुख कार्यकर्त्यांचा मानस होता. हे मान्य होण्यासारखे नसल्यामुळे वणीचे संमेलन बारगळले. स्वत: लो. ना. बापूजींनीही ह्याबाबतीत आग्रह धरला नाही हे विशेष होय.

शुद्धलेखन


मराठीचे शुद्धलेखन उच्चारानुसारी असावे अशी एक मोहीमच वि. सा. संघाने १९५३ पासून सुरू केली होती. डॉ. वि. भि. कोलते हे ह्या मोहिमेचे अध्वर्यू होते. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठी शुद्धलेखनाचे नवीन सुटसुटीत नियम तयार करण्यात आले होते. पश्चिम महाराष्ट्र मात्र जुन्या नियमांनाच 'शास्त्रपूत' समजत होता. आम्ही अधिकारावर आल्यानंतर नवीन नियमांचा हिरीरीने पाठपुरावा सुरू केला. वि. सा. संघाने तयार केलेले नियम सर्व विद्यापीठांनी व शासनाने मान्य करावेत असे दर वर्षी संमेलतात ठराव करण्यात आले व शासनाकडे शिष्टमंडळे पाठविण्यात आली. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हे अत्यंत धोरणी. शासनाला ह्या भांडणात पाडायला ते तयार नव्हते. सर्व साहित्यसंस्थांनी ह्याबाबतीत प्रथम एकमत करावे व सर्वसंमत नियम शासनाला सादर करावेत म्हणजे शासन ते स्वीकारील, असा सल्ला त्यांनी शिष्टमंडळाला दिला. म्हणून महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक साहित्य संस्थांच्या प्रतिनिधींची एक शुद्धलेखन समिती स्थापन करण्यात आली. म. म. पोतदार ह्या समितीचे अध्यक्ष होते. मी, डॉ. कोलते, प्रा. बनहट्टी हे ह्या समितीचे विदर्भातून सभासद होते. ह्या समितीची शेवटची बैठक मुंबईला १९६२ मध्ये झाली. तीत विदर्भ साहित्य संघाने पुरस्कृत केलेले बहुतेक सर्व नियम मान्य झाले. तथापि तत्सम ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शब्द मराठीत दीर्घान्त लिहावेत की संस्कृतप्रमाणे ऱ्हस्वान्त, ह्यावर तीव्र मतभेद झाले. विदर्भ साहित्य संघाच्या नियमात दीर्घान्ताला मान्यता होती. मला मात्र वाटत होते की, समासात तत्सम ऱ्हस्वान्त शब्द जर ऱ्हस्वान्तच लिहावयाचे तर प्रथमेत ते ऱ्हस्वान्त लिहिण्यास हरकत असू नये. परंतु ह्या माझ्या वैयक्तिक विचारानुसार मतदान करण्यास वि. सा. संघाचा प्रतिनिधी म्हणून समितीत काम करीत असताना व माझे गुरु डॉ. वि. भि. कोलते समोर उपस्थित असताना मला संकोच वाटत होता. त्यामुळे ह्या प्रश्नावर मतमोजणी घेण्याची पाळी येऊ नये असे मला वाटत होते. म्हणून मी असा तोडगा सुचविला की ह्या प्रश्नावर बरीच चर्चा झाली आहे, तेव्हा ती लक्षात घेऊन अध्यक्षांनी निर्णय घ्यावा व तो सर्वांनी मान्य करावा. हा तोडगा सर्वांनी मान्य केला. तो सुचविताना मला असेही वाटत होते की म. म. पोतदार हे जुन्या नियमांचे व संस्कृतचे कट्टर अभिमानी, तेव्हा ते आपला निर्णय ऱ्हस्वान्ताच्याच बाजूने देतील. परंतु गंमत अशी की पोतदारांनी क्षणभर डोळे मिटले व नंतर ते म्हणाले, "माझे वैयक्तिक मत काहीही असले तरी मला असे दिसते की येथे बहुसंख्य सभासद दीर्घान्ताच्या बाजूचे आहेत व म्हणून मी दीर्घान्ताच्या बाजूने निर्णय देतो." जुने नियम 'शास्त्रपूत' असल्यामुळे ते 'दण्डार्ह' समजू नयेत अशी टीप मात्र त्यांनी आग्रहपूर्वक मान्य करून घेतली! हेच नियम पुढे शासनाने मान्य केले.

म. सा. महामंडळ

महाराष्ट्र साहित्य परिषद ही मराठीची सर्वात जुनी साहित्यसंस्था. परंतु कालांतराने विदर्भ, मराठवाडा व मराठी मुलुखाबाहेरही अनेक मराठी साहित्य

संस्था उदयास आल्या. ह्या सर्वांना एकत्रित आणण्याचे प्रयत्न मी अधिकारावर येण्यापूर्वीपासून चालू होते. परंतु परस्पर विश्वासाचे वातावरण नसल्यामुळे ह्या प्रयत्नांना यश येत नव्हते. इतर साहित्य संस्थांना गिळंकृत करण्याचा किंवा आपल्या आधिपत्याखाली आणण्याचा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा हा डाव आहे असे अनेकांना वाटत होते. विदर्भ साहित्य संघ ही तर त्यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेपेक्षाही अधिक संपन्न व व्यापक संस्था झाली होती, त्यामुळे आम्हाला ही भीती विशेषच वाटत होती. परंतु त्याबरोबरच सर्व मराठी साहित्य संस्थांनी एकत्र यावे व सर्वांची एक प्रातिनिधिक संस्था असावी असेही वाटत होते. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९५९ मध्ये मिरजेला सर्व साहित्य संघाच्या प्रतिनिधींची एक सभा झाली. वि. सा. संघातर्फे मी त्या सभेला हजर होतो. अध्यक्षस्थानी कविवर्य अनिल उर्फ आ. रा. देशपांडे होते. सकाळच्या बैठकीत सर्वांच्या मनांचा मागोवा घेतल्यानंतर मी एक सर्वसंमत होऊ शकेल असा संघसंस्थेच्या घटनेचा आराखडा तयार केला व तो दुपारच्या बैठकीत सादर केला. संकल्पित संस्थेला 'मराठी साहित्य महामंडळ' असे नाव द्यावे ही महत्त्वाची सूचना अनिलांनी केली व ती सर्वांनी मान्य केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेसकट सर्व साहित्य संस्था समान दर्जाच्या व स्वायत्त घटक संस्था राहतील अशा स्वरूपाची नवीन प्रातिनिधिक संघसंस्था निर्माण करावी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने ह्या संघ संस्थेने आयोजित करावीत व तिचे कार्यालय घटक संस्थांचे जागी फिरते असावे अशी ही योजना होती. तिच्यात किरकोळ दुरुस्त्या होऊन महामंडळाची योजना सर्वसंमत झाली व महामंडळ अस्तित्वात आले.

△ △ △



धनवटे रंगमंदिराच्या निर्मितीचे टप्पे

२४ एप्रिल १९५६

विदर्भ साहित्य संघाच्या मंदिर समितीची सभा दि. २०–४–५६ रोजी सायं ७ वाजता विदर्भ साहित्य मंदिरात भरली.

श्री. य. अ. खरे, इंजिनियर, श्री. माणिलाल एच. पटेल, इंजीनिअर, श्री. नानासाहेब जोग आणि श्री. रा. वि. काळीकर या सदस्यांची एक उपसमिती नेमण्यात आली. या उपसमितीने बांधकामाची व्यवस्था पाहावी असे ठरले.

श्री. य. अ. खरे आणि श्री. रा. वि. काळीकर यांना स्वीकृत सभासद करून घेण्यात आले व श्री. रा. वि. काळीकर यांची मंदिर समितीचे उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

१८ ऑक्टोबर १९५६

विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिराचा कोनशिला समारंभ वि. सा. संघाच्या मागील भागाच्या पटांगणात दि. १८–१०–५६ रोजी सकाळी ७.३० वाजता केंद्रीय सरकारचे माजी अर्थमंत्री व युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनचे अध्यक्ष श्री. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख यांचे हस्ते झाला. कार्यक्रमाकरिता भव्य शामियाना उभारण्यात आला होता. संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. देशमुख यांच्या हस्ते धार्मिक विधिपूर्वक कोनशिलेची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर श्री. नानासाहेब जोग मंदिर समिती कार्यवाह, यांचे रंगमंदिराच्या कार्याची कल्पना देणारे भाषण झाले व श्री. देशमुखांचे नाटचगृहाविषयी आणि नाटचसंस्थांविषयी अभ्यासपूर्ण भाषण झाले. वि. सा. संघ उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी आभार मानल्यावर सौ. कुसुम मोहनी यांनी 'वंदेमातरम्' म्हटले व हा कार्यक्रम संपला. कार्यक्रमाकरिता शामियाना व संघाचे संपूर्ण प्रांगण नागपुरातील सुविद्य व साहित्यप्रेमी स्त्री–पुरुष नागरिकांनी फुलून गेले होते.

रंगमंदिराच्या मदतीकरिता नागपूर नाटचमंडळ व यशवंत कलाकेंद्र यांच्या वतीने दि. १२ ते १५–४–५९ पर्यंत श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'तुझे आहे तुजपाशी 'या नाटकाचे पाच प्रयोग करण्यात आले. प्रयोग अत्यंत लोकप्रिय झाले.

रंगमंदिराचे खरे निर्माते व त्यासाठी अहर्निश झटणारे श्री. नानासाहेब जोग यांचा दि. १–५–५८ ला आकस्मिक मृत्यू झाला. त्यानिमित्त दि. २–५–५८ ला शोकसभा होऊन तीत श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. ह. ना.

वैद्य, श्री. ना. रा. शेंडे, श्री. दे. गो. लांडगे, श्री. बापूसाहेब नाईक, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, श्री. पां. वा. गडकरी, श्री. य. गो. मालोदे व प्रा. श्री. गो. काशीकर यांनी कै. नानासाहेब जोग यांना श्रद्धांजली अर्पण केली.

२९ नोव्हेंबर १९५८

रंगमंदिर उभारण्याचे विदर्भ साहित्य संघाचे स्वप्न ह्या वर्षी साकार झाले. ह्या कामासाठी नागपूरच्या उदार व धनिक धनवटे कुटुंबियांकडून व मुंबई शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळाले. एकूण तीन लाख रुपयांचे अद्ययावत व भव्य नाटचगृह बांधले गेले असून त्याचे उद्घाटन २९–११–५८ ला मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्याच दिवशी रात्री कै. नाना जोग लिखित 'सोन्याचे देव' ह्या नाटकाचा प्रयोग नागपूर नाटच मंडळातर्फे करण्यात आला. हा प्रयोग सर्व सभासदांना व निमंत्रितांना नि:शुल्क दाखविण्यात आला. अति उत्कृष्ट नाटचगृह मुंबई राज्यात अन्यत्र कोठेही नाही असे प्रशंसोद्गार मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनी उद्घाटनाचे वेळी काढले.

△ △ △

धनवटे रंगमंदिराच्या उद्घाटनानिमित्त त्यावेळी तयार करण्यात आलेला एक लेख जसाच्या तसा उद्धृत करीत आहोत.

विदर्भ साहित्य संघाचे धनवटे रंगमंदिर पूर्ण झाले असून शनिवारी दि. २९–११–५८ ला सायंकाळी ५–३० वाजता मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्याचा उद्घाटन समारंभ अत्यंत थाटाने पार पडत आहे, ही नागपूरला किंवा विदर्भालाच नव्हे, तर अखिल महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशी घटना आहे. दि. २९ ला आधुनिक पद्धतीने उद्घाटन, रात्री नाटचप्रयोग अशा विविध प्रकारे ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. इतक्या विशाल प्रमाणावर व इतक्या नाटचविषयक सोयींनी सुसज्ज असे नाटचगृह द्वैभाषिक मुंबई राज्यात तर इतरत्र नाहीच, पण अखिल भारतातही एकदोनचे वर असण्याचा संभव नाही. त्यामुळेच हे नाटचगृह आज नागपुरांतील पहिल्या दर्जाचे आकर्षण बनले आहे. गेल्या महिना–दीड महिन्यात नागपुरांतील नाटचरसिक हे रंगमंदिर पाहण्याकरिता रीघ लावतात. एवढेच नव्हे तर बाहेरून आलेल्या अनेक लहान–थोर पाहुण्यांनी मुद्दाम इच्छा व्यक्त करून हे रंगमंदिर पाहिले आहे व त्याच्या रचनेबद्दल संतोष व्यक्त केला आहे. ३० फूट लांब, २६ फूट रुंद व १७ फूट उंच ह्या आकाराचे प्रशस्त रंगमंच तयार झाले असून विशाल प्रेक्षागृहात समोरच्या भागापासून मागच्या भागापर्यंत एकसारख्या गादीच्या आरामशीर व सुबक खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. रंगमंचाच्या दोन्ही बाजूस रंगमंचाच्या आकाराच्याच विशाल पार्श्वकक्षा (wings) आहेत व त्यांचेवर रंगकक्षा (green rooms) आहेत. रंगमंचाच्या दोन्ही बाजूस वरच्या मजल्यावर नाटकमंडळयांची राहण्याचीही भव्य व्यवस्था करण्यात आली आहे. आधुनिक नाटकात आवश्यकता असल्यास रंगमंचावर मोटार आणण्याकरिता मार्गही करण्यांत आला आहे. मध्यंतरामध्ये प्रेक्षकांना विरंगुळा घेता यावा किंवा धूम्रमान करता यावे म्हणून प्रेक्षागृहाच्या तिन्ही बाजूंना प्रशस्त व्हरांडेही सोडण्यात आले आहेत. तसेच एकाच वेळी ५०–७५ व्यक्तींना मोकळेपणाने चहापान करता येईल, एवढे भव्य उपहारगृहही तयार करण्यात आले आहे. प्रेक्षागृहाच्या मागील बाजूस जवळजवळ ३५० खुर्च्या मावतील एवढी सज्जा (Balcony) असून कोणत्याही जागेवरून जवळजवळ संपूर्ण रंगमंच दिसेल अशी प्रेक्षागृहाची अर्धलंबगोलाकृती रचना करण्यात आली आहे. अनेक ध्वनितज्ञांच्या साहाय्याने आवाजाच्या दृष्टीनेही सर्व काळजी घेण्यात आली असून ध्वनिक्षेपकाशिवाय देखील रंगमंचावरील आवाज स्पष्टपणे सर्वत्र ऐकू येईल इतकी ध्वनिव्यवस्था उत्तम झाली आहे. प्रेक्षागृहात ९५० ते १००० प्रेक्षक सहजपणे नाटक पाहू व ऐकू शकतात. एवढे सोयीस्कर, विशाल व सुंदर नाटचगृह बांधण्याकरिता आजवर साडे तीन लाख रुपयावर खर्च झाला आहे. ह्यांत जुन्या मध्यप्रदेश शासनाकडून ५० हजार, नव्या मुंबई शासनाकडून ५० हजार व श्री. धनवटे कुटुंबियांकडून ५० हजार रु. च्या देणग्या मिळाल्या आहेत. ह्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत ऋणी आहे. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व समाजकल्याण मंत्री श्री. ना. खं. तिरपुडे यांनी आस्थापूर्वक दिलेल्या साहाय्याबद्दल त्यांचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. परंतु सर्वांत अभिमानाची गोष्ट ही आहे की, मंदिर निधीमधील फार मोठी रक्कम विदर्भातील गरीब व

मध्यमवर्गीय जनतेने दिलेल्या एक रुपया–दोन रुपये–पांच रुपये अशा लहान लहान देणग्यातून जमा झाली आहे. विदर्भ साहित्य संघाचे हे रंगमंदिर खऱ्या अर्थाने वैदर्भीय जनतेने आपल्या घामातून निर्माण केले आहे.

तथापि ह्या रंगमंदिराच्या निर्मितीचे श्रेय जर कुणाला द्यावयाचे असेल तर ते दोन व्यक्तींना, एक कै. नाना जोग व दुसरे श्री. बाळासाहेब आणिगरी, कै. नाना जोग यांनी रंगमंदिर हे आपलं जीवनकार्यच बनविले होते. रंगमंदिराची रचना कशी असावी ह्याबद्दल भारतीय व पाश्चात्य वाङ्मयाचा सखोल अभ्यास करून व त्याला स्वतःच्या अनुभवाने पारखून घेऊन त्यांनी अगदी लहान लहान गोष्टींची देखील दखल घेतली होती. आपली ही मनोमय कल्पनाच त्यांनी येथील श्री. गोळे आदि स्थापत्यशास्त्रज्ञांच्या साहाय्याने साकार केली. बांधकाम चालू असताना प्रत्येक वीट कशी बसविली जाते ह्यात कै. जोग जातीने लक्ष घालीत असत. शेवटी शेवटी तर रंगमंदिराच्या जागेतील एक खोलीच त्यांनी आपले निवासस्थान बनविली होती आणि अखेरीस ह्या खोलीतच त्यांनी आपला देह ठेवला.

कै. नाना जोग यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांना जबरदस्त धक्का बसला व हे काम आता कसे पूर्ण होणार ह्याची चिंता उत्पन्न झाली. परंतु कै. नाना गेले ते आपल्या अंतःकरणांतील ज्योत दुसऱ्याच्या अंतःकरणात पेटवूनच. त्याच्या अंत्यविधीच्या वेळीच श्री. बाळासाहेब आणिगेरी यांनी घोषणा केली की, "हे रंगमंदिर पूर्ण करण्याला मी माझी सर्व शक्ती पणाला लावून प्रयत्न करीन." आणि आज खरोखरच त्यांनी आपली घोषणा पूर्ण करून दाखविली आहे. त्यांच्या प्रयत्नाशिवाय आज रंगमंदिर उभे राहूच शकले नसते असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ति मुळीच होणार नाही. रंगमंदिराकरिता लागणारे दुर्मिळ साहित्य उच्च स्तरावरून मिळविण्यापासून तो भर उन्हात भितीवर तासन् तास उभे राहून मजुरांकडून कामे करून घेण्यापर्यंत सारी कामे बाळासाहेबांनी केली आहेत. बांधकामातील टिकाऊपणा व सौंदर्य यांचेकडे त्यांनी सारखेच लक्ष दिले आहे. रंगमंदिरांतील प्रत्येक वस्तू उत्तमोत्तम दर्जाचीच ठेवण्यावर त्यांचा कटाक्ष राहिला आहे. त्यांच्या कार्यातील गती तर अगदी अचंबा निर्माण करणारी आहे. सहा महिन्यांचे कार्य त्यांनी केवळ गेल्या एकदीड महिन्यांत करून दाखविले आहे. अभिजात सौंदर्यदृष्टि, नाट्यकलेचा गाढ अनुभव, बांधकामाची यथार्थ माहिती, अतुलनीय कर्तृत्व, विस्मयकारक धडाडी व कोणतेही काम करण्याची तयारी हे सारे गुण एकवट-ल्यामुळेच बाळासाहेब एवढं प्रचंड कार्य सहजतेने करू शकले.

तथापि; रंगमंदिर आज प्रयोगक्षम झाले असले तरी अजूनही बरीच कामे व्हावयाची राहिली आहेत हे विसरून चालावयाचं नाही. फिरता रंगमंच; भितीची बाहेरून गिलाई, रंगमंदिराभोवतालचा बगीचा, मोटारीकरिता स्थानक इत्यादि किती तरी लहानमोठी कामे अजून व्हावयाची आहेत व ह्याकरिता अजूनएकदीड लाख रुपये ज्यांनी खर्च येणार आहे. आजवर ज्यांनी ह्या कार्याला हातभार लावला त्या सर्वांच्या सहकार्याने हे रंगमंदिर एक आदर्श रंगमंदिर होईल अशी पूर्ण खात्री आहे. भारताकरिता व विशेषतः महाराष्ट्राकरिता आदर्श रंगमंदिराचा एक नमुना (Pattern) तयार करण्याची कै. नाना जोग यांची इच्छा होती ती आज पूर्ण झाली आहे, ह्याचा खरोखरच अत्यानंद होतो.

(विदर्भ साहित्य संघाच्या दप्तरातून)

△ △ △

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, घटना कलम १२ (ऊ) प्रमाणे
मतदारांच्या सूचीला पुरवणी

१. सभासद सूचीत खालील नावे समाविष्ट नव्हती ती आता समाविष्ट करण्यात आली आहेत.

साधारण सभासद

	मतदार सूची पृष्ठांक	मतदार सूचीतील मतदारांचा क्र.	नाव व पत्ता
१	चंद्रपूर २९	६३	फटींग शिरीष बाळकृष्ण द्वारा श्री. गोपाळराव देशकर, विठ्ठल मंदिरवार्ड, राजुरा (माणिकगड) जि. चंद्रपूर
२	नागपूर ४२	३३२ अ	मिटकरी बाबूराव रामभाऊ आप्पा व्ही. आर. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग नागपूर
३	धुळे ६०	१	पांढारकर श्री. प्रल्हाद विठ्ठलराव १२ ब प्रोफेसर्स कॉलनी, देवपूर जि. धुळे

नाव व पत्ते यात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत

आजीव सभासद

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीतील छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
१	अमरावती	२	७	सहस्रबुद्धे दिवाकर शंकर मुधोळकरपेठ, अमरावती	सहस्रबुद्धे दिवाकर शंकर, मुधोळकर पेठ, अमरावती.
२	नागपूर	७	१०२	टोळे दिवाकर बाळकृष्ण छोटी धंतोली, नागपूर १	टोळे दिवाकर बाळकृष्ण २९, कार्पोरेशन कॉलनी, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर.
३	नागपूर	८	१२८	देशपांडे शिरीष गोपाळ ३२१, शंकरनगर, नागपूर १२	देशपांडे डॉ. शिरीष गोपाळ; ३२१ शंकरनगर, नागपूर १०

अनुक्रमणिका

अ. क्र	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
४	नागपूर	८	१४०	देव सखाराम गोविंद कैलासकुटी, टाऊनखरे, नागपूर १०	देव सखाराम गोविंद, कैलासकुटी, खरेटाऊन, नागपूर १०
५	नागपूर	१०	१७५	बनहट्टी श्यामकांत श्रीनिवास 'ज्ञानोपासना' टिकेकर मार्ग धंतोली, नानपूर	बनहट्टी श्यामकांत श्रीनिवास 'ज्ञानोपासना' टिकेकर मार्ग, धंतोली, नागपूर १२
६	नागपूर	११	२२०	मुंजे श्रीपाद वामनराव ४८७, प्रोफेसर्स कॉलनी, हनुमाननगर, वागपूर ९	मुंजे श्रीपाद वामनराव ४८७ प्रोफेसर्स कॉलनी, हनुमाननगर, नागपूर–९
७	नागपूर	१२	२३९	मंडलेकर कांती श्रीधर द्वारा–श्री. ब. मंडलेकर, ३२ हिंदुस्थान हौसिंग कॉलनी, नागपूर	मंडलेकर कांती श्रीधर, द्वारा–श्री. ब. मंडलेकर, प्लाट नं. ३ व्यंकटेशनगर, खामला रोड, नागपूर.
८	नागपूर	१४	२८४	सोमलवार विष्णू गोविंद ११ मजली बिल्डिंगसमोर रामदासपेठ, नागपूर १०	सोमलवार विष्णू गोविंद, १२४ फार्म लँड, रामदासपेठ, नागपूर-१०
९	मुंबई	१७	१३	धर्माधिकारी चंद्रशेखर प्लाट नं. १० रॉकी हिल्स दाभोळकर मार्ग, मुंबई ६	न्या. मू. धर्माधिकारी चंद्रशेखर, ११ सारंग, जनरल भोसले मार्ग, सचिवालय जिमखान्याजवळ, मुंबई–२१
१०	मुंबई	१७	१९	मराठे एस. जी., A ७३ कमल पुष्पा को–ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, अपोझिट महिम रिक्लेमेशन चापेल रोड, ब्रांद्रा (पश्चिम) मुंबई	मराठे, एस्. जी. भाग्योदय १३३३, गोकुळपेठ, नागपूर १०
११	मुंबई	१७	२२	सप्पर्षी व्ही. सी. १२ गार्डन होल्स फर्स्ट रोड, खार, मुंबई ५२	सप्तर्षी व्ही. सी. १२ गार्डन होल्स फर्स्ट रोड, खार, मुंबई ५२

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
१२	रहाटगाव	१८	१	लोकरे रावसाहेब एच. एल. सेवानिवृत्त, वनमंडळाधिकारी, पो. राहटगाव, त. हृदी जि. होशंगावाद	लोकरे रावसाहेब एच. एल. सेवानिवृत्त वनमंडळा धिकारी, पो. रहाटगाव, त. हृर्दा, जि. होशंगावाद.

सर्वसाधारण सभासद

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
१३	अकोला	२०	४९	लिखिते श्री. विष्णू टिळक राष्ट्रीय शाळा, अकोला	लिखिते चिंतामण मोरेश्वर बिल्डिंग नं. १, प्लाट नं. ८, विदर्भ हौसिंग बोर्ड, रतनलाल प्लॉटस, अकोला.
१४	अकोला	२०	५२	खोटरे श्री. सदाशिव जनार्दन तळोकपुरा आकोट, जि. अकोला	खोटरे श्री. सदाशिव जनार्दन तळोकारपूरा, आकोट, जि. अकोला.
१५	अकोला	२०	५४	देवळे श्री. रामदास मुगुटराव प्राचार्य श्री शिवाजी महाविद्यालय आकोट, जि. अकोला	देवके श्री. रामदास मुगुटराव प्राचार्य श्री शिवाजी महाविद्यालय, आकोट, जि. अकोला.
१६	अकोला	२०	५५	धांदे श्री. सुरेश अमृतराव श्री शिवाजी संदर्भ कॉलेज आकोट जि. अकोला	धांदे श्री. सुरेश अमृतराव श्री शिवाजी कॉलेज, आकोट, जि. अकोला.
१७	अकोला	२१	५६	निचळ श्री. रावसाहेब श्रीरंग द्वारा अशोक भवन, टाकपुरा आकोट, जि. अकोला	निचळ श्री. रावसाहेब श्रीरंग द्वारा श्री शिवाजी कॉलेज, आकोट, जि. अकोला.
१८	अकोला	२१	६४	वानखेडे श्री. देविदास महादेवराव जवाहर रोड, आकोट, जि. अकोला	वानखडे श्री. देविदास महादेवराव जवाहर रोड, आकोट, जि. अकोला,
१९	अकोला	२२	८३	पाथरीकर श्री. रमेश मारीतीराव द्वारा गाडगे महाराज विद्यालय मुर्तिजापुर, जि. अकोला	पाथरीकर श्री. रमेश मारोतीराव द्वारा गाडगे महाराज विद्यालय, मुर्तिजापुर, जि. अकोला.

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
२०	अमरावती	२२	१५	कुळकर्णी वि. रा. चैतन्य गणेश कॉलनी, अमरावती	कुळकर्णी वि. स. चैतन्य गणेश कॉलनी, अमरावती.
२१	अमरावती	२२	१७	कुळकर्णी दिगंबर रामदास श्री साईनगर बडनेरा रोड, अमरावती	कुळकर्णी दिगंबर रामदास, अॅड्व्होकेट खापर्डे बगीचा, अमरावती.
२२	अमरावती	२३	२०	कोकाटे विनायक अंबादासपंत द्वारा चांडकवाडा, कोर्टरोड, कॅंप अमरावती	कोकाटे विनायक अंबादासपंत द्वारा अमरावती नगर वाचनालय, अमरावती.
२३	अमरावती	२३	३७	चाबुकस्वार बाळकृष्ण दत्तात्रय बालाजी प्लॉट, अमरावती	चाबुकस्वार बाळकृष्ण दत्तात्रय भाऊ कलोती यांचा वाडा, बालाजी प्लॉट्स, अमरावती.
२४	अमरावती	२४	५४	देशमुख कमलाकर दत्तात्रय द्वारा लक्ष्मीकुटी, बालाजी प्लॉट्स अमरावती	देशमुख कमलाकर दत्तात्रय रहाळकर यांचे घर, प्रभात कॉलनी अमरावती
२५	अमरावती	२६	१०१	महाजन दिगंबर मारोतराव ३/३१४, भाजीबाजार वार्ड, अमरावती	महाजन दिगंबर मारोतराव महाजन गल्ली, भाजी बाजार अमरावती
२६	अमरावती	२६	१०६	मुठाळ विकास लक्ष्मणराव क्वार्टर नं. ७ भातकुली, पंचायत समिती कॅम्प, अमरावती	मुठाळ विलास लक्ष्मणराव मोहन नगर, कॅम्प अमरावती
२७	चंद्रपूर	२७	२	काटकर प्रभाकर तुळशीराम जयंत टॉकीज मागे, सहारे बिल्डिंग माळा, चंद्रपूर	काटकर प्रभाकर तुळशीराम जयंत टॉकीज मागे, सहारे बिल्डिंग दुसरा माळा, चंद्रपूर
२८	चंद्रपूर	२७	९	चौरीकर पु. या. टिळक विद्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर	चौरीकर पु. या. टिळक विद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पता	त्या ऐवजी दुरुस्ती
२९	चंद्रपूर	२९	५२	पाटील नाना महादेवराव प्रा. कर्मवीर महाविद्यालय, मूल जि. चंद्रपूर	पाटील नाना नामदेवराव प्रा कर्मवीर महाविद्यालय, मूल जि. चंद्रपूर
३०	नागपूर	३०	२०	आष्टीकर दिनेश प्रभाकरराव द्वारा आष्टीकर ब्रॅन्ड, शंकर नगर नागपूर	आष्टीकर दिनेश प्रभाकरराव द्वारा आष्टीकर, ३८३ शंकरनगर नागपूर
३१	नागपूर	३१	४३	काकडे सौ. स्मिता द्वारा जी. ए. पुराणिक 'अमृत' खरे टाऊन पोस्ट ऑफीसजवळ धरमपेठ, नागपूर १०	सौ. मादुस्कर स्मिता प. गोवईकरांचा बंगला प्रभातरोड ३४/५ ऋतुराज ८ वा रस्ता, पुणे
३२	नागपूर	३२	६८	कुळकर्णी विभाकर रघुनाथराव टेकडी लाईन, यत्तेवाडा, सीताबर्डी नागपूर १२	कुळकर्णी विभाकर रघुनाथराव टेकडी लाईन, यत्तेवाडा सीताबर्डी नागपूर-१२
३३	नागपूर	३२	६९	कुळकर्शी श्यामकांत प्लॉट नं २ ब, डोंगरे ले आऊट, श्रद्धानंदपेठ, नागपूर	कुळकर्णी श्यामकांत प्लॉट नं. २ ब, डोंगरे ले आऊट श्रद्धानंद पेठ, नागपूर
३४	नागपूर	३४	१२२	जोशी धनंजय विश्वनाथ २०, श्रद्धानंदपेठ, बजाजनगर, नागपूर	जोशी धनंजय विश्वनाथ गजानन महाराज देवळाजवळ झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर
३५	नागपूर	३४	१४०	टोकेकर रमेश व्यंकटेशराव धावडे भवन, कॉंग्रेसनगर धंतोली, नागपूर	टोकेकर रमेश व्यंकटेशराव वैद्यभवन, भगवाघर कॉलनीजवळ, खरेटाऊन, धरमपेठ, नागपूर
३६	नागपूर	३६	१७२	दिवाणजी दत्तात्रय द्वारा डॉ. आष्टीकर ८३३, शंकरनगर, नागपूर १०	दिवाणजी दत्तात्रय द्वारा डॉ. आष्टीकर ३८३ शंकरनगर नागपूर १०
३७	नागपूर	३६	१७४	दिवाकर अनिल दिवाकर "आधार" प्लॉ. नं. ३ राशीलक्ष्मी नगर, नागपूर	दिवाकर अनिल दिवाकर "आधार" प्लॉट नं. ३ राणी लक्ष्मीनगर नागपूर
३८	नागपूर	३७	२१८	घोटे काशिगाथ नुसुजी द्वारा महाकाळकर भुवन उधोजी रोड, महाल, नागपूर	घोटे काशिनाथ नुसुजी द्वारा महाकाळकर भुवन उधोजी रोड महाल, नागपूर

अनुक्रमणिका

अ. क्र.	मतवार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
३९	नागपूर	४०	२८७	बक्षी शरद विनायक २५३, लक्ष्मीनगर, नागपूर	बक्षी शरद विनायक २६१, अभ्यंकरनगर, नागपूर
४०	नागपूर	४०	२९४	बोरगावकर सुरेश शंकर १६० हनुमाननगर, नागपूर	बोरगावकर सुरेश शंकर नवयुग विद्यालय, राजाबाक्षाजवळ, हनुमाननगर, नागपूर
४१	नागपूर	४२	३३२	मिसर श्रीयती लता द्वारा प्रा. के. जी. मिसर १५७, अभ्यंकरनगर, नागपूर	मिसर श्रीमती लता द्वारा प्रा. के. जी. मिसर १५७, अभ्यंकरनगर, नागपूर
४२	नागपूर	४२	३३३	म्हैसाळकर नारायण शंकर द्वारा श्री. मनोहर म्हैसाळकर पवनीकर बंगला, रामकृष्ण मठाजवळ धंतोली, णागपूर	म्हैसाळकर नारायण शंकर द्वारा श्री. मनोहर म्हैसाळकर पवनीकर बंगला रामकृष्ण मठाजवळ धंतोली, नागपूर
४३	नागपूर	४५	४१५	सहस्त्रबुद्धे गोविंद मुकुंद स्नेहनगर, नागपूर	सहस्त्रबुद्धे गोविंद मुकुंद १०६, स्नेहनगर, नागपूर
४४	नागपूर	४६	४४३	हारोडे सौ. रीता सुभाष स्नेहल, खरेटाऊन, धरमपेठ, नागपूर १०	हारोडे सौ. रीता सुभाष ९ अ टिळकनगर, त्रिकोणीपार्कजवळ, नागपूर
४५	गोंदिया	५०	५५	ताम्हणे दामोधर गोविंद आनंदरनग रेलटोली गोंदिया जि. भंडारा	ताम्हणे दामोधर गोविंद आनंदनगर रेलटोली गोंदिया जि. भंडारा
४६	भंडारा (लाखनी)	५१	६७	अतकरी दसाराम गोंडूजी मु. सोमलवाडा पो. रेंगेपारकोंढा ता. साकोली जि. भंडारा	अतकरी दसाराम गोंडूजी मु. सोमलवाडा पो. रेंगेपारकोठा ता. साकोली, जि. भंडारा
४७	भंडारा (लाखनी)	५१	८२	गिन्हेपुंजे विसराम मोतीराम शिक्षक प्रा. शाळा मु. सडक अर्जुनी ता. साकोली जि. भंडारा	गिन्हेपुंजे पिसाराम मोतीराम शिक्षक प्रा. शाळा, मु. पो. सडक अर्जुनी ता. साकोली जि. भंडारा
४८	भंडारा (लाखनी)	५२	९१	देशमुख आनंदराव कणाजी मु. पो. सोमलवाडा पो. रेंगेपार ता. साकोली जि. भंडारा	देशमुख आनंदराव कबाजी मु. पो. सोमलवाडा पो. रेंगेपार ता. साकोली जि. भंडारा
४९	यवतमाळ	५३	२	आष्टेकर कृष्णराव निळकंठराव गोधनी रोड, यवतमाळ	आष्टेकर कृष्णराव निळकंठराव गोधनी रोड, यवतमाळ

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
५०	यवतमाळ	५४	५	कावळे मोरेश्वर रामचंद्रराव द्वारा चंद्रकांत कावळे १३५ श्याम सोसा. रविनगर यवतमाळ	कावळे मोरेश्वर रामचंद्रराव द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५१	यवतमाळ	५४	६	कांबळे झोलबा काबुजी जामनकर नगर, यवतमाळ	कांबळे झोलबा कान्हुजी जामनकरनगर यवतमाळ
५२	यवतमाळ	५४	२४	घांदे प्रभाकरराव श्रीराम सभापती शिक्षण समिती न. प. यवतमाळ	घांदे प्रभाकरराव श्रीराम द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५३	यवतमाळ	५५	३४	मानकर रमेश घनश्याम १२९, श्याम सोसायटी, यवतमाळ	मानकर रमेश घनश्याम द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५४	यवतमाळ	५५	३७	म्लान दत्तात्रय खेरबाजी बी. दत्ता टेलर, यवतमाळ	भगत दत्तात्रय खेरबाजी बी. दत्ता टेलर, यवतमाळ
५५	यवतमाळ	५५	४०	वाढवे हरिभाऊ लोबाजी रिमांड होम, शिवाजीनगर, यवतमाळ	वाढवे हरिभाऊ लोबाजी द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५६	यवतमाळ	५५	४१	वानखेडे निळकंठ मारोतराव गोधनी रोड, यवतमाळ	वानखेडे निळकंठ मारोतराव द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५७	यवतमाळ	५५	४२	वंजारी सौ. उषा जगन विवेकानंद कॉलनी, यवतमाळ	वंजारी सौ. उषा जगन द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५८	यवतमाळ	५५	४३	वंजारी जगन विवेकानंद नगर, यवतमाळ	वंजारी जगन द्वारा नगर वाचनालय, यवतमाळ
५९	यवतमाळ (बोरीअरब)	५५	५६	चौधर शामराव नत्थुजी मु. ब्रम्ही पो. लाडखेड ता. दारव्हा जि. यवतमाळ	चौधर शामराव नत्थुजी द्वारा बडे क्लॉथ स्टोअर्स, बोरीअरब ता. दारव्हा जि. यवतमाळ
६०	यवतमाळ (बोरीअरब)	५५	५७	जोगदंड गजानन शंकरराव मु. सावळी पो. बोरीअरब जि. यवतमाळ	जोगदंड गजानन शंकरराव द्वारा शंकर बडे बोरी अरब जि. यवतमाळ
६१	यवतमाळ (बोरीअरब)	५६	६६	घुले आनंदराव यशवंतराव द्वारा बडे क्लॉथ स्टोअर्स मु. पो. बोरी अरब पा. दारव्हा जि. यवतमाळ	घुले आनंदराव यशवंतराव द्वारा बडे क्लॉथ स्टोअर्स मु. पो. बोरी अरब ता. दारव्हा जि. यवतमाळ

अ. क्र.	मतदार सूची	सूची पृष्ठ	सूचीतील क्रमांक	सूचीत छापलेले नाव व पत्ता	त्या ऐवजी दुरुस्ती
६२	यवतमाळ (बोरीअरब)	५६	६७	निलावार दत्तात्रय दामोदर रा. बोरी खुर्द पो. बोरी, अरब ता. दारव्हा जि. यवतमाळ	निलावार दत्तात्रय दामोदर द्वारा शंकर बडे मु. पो. बोरीअरब ता. दारव्हा, जि. यवतमाळ
६३	यवतमाळ (बोरीअरब)	५६	६८	पराते दत्तात्रय जागोबा द्वारा शंकर बडे (सावळी) पो. बोरी अरब, ता. दारव्हा जि. यवतमाळ	पराते दत्तात्रय जागोबा द्वारा शंकर बडे पो. बोरी अरब ता. दारव्हा, जि. यवतमाळ
६४	यवतमाळ (बोरीअरब)	५६	७४	बढीये सौ. कमलाताई प्र. मु. पो. बोरीअरब, ता. दारव्हा जि. यवतमाळ	बढीये सौ. कमलाताई प्र. द्वारा निता ड्राय फ्रुट, नेताजी चौक, यवतमाळ
६५	यवतमाळ (बोरीअरब)	५६	७८	बिडकर कु. शोभा महादेवराव मु. पो. बोरीअरब ता. दारव्हा	बिडकर कु. शोभा महादेवराव मु. पो. बोरीअरब ता. दारव्हा जि. यवतमाळ
६६	यवतमाळ (बोरीअरब)	५६	८१	बुलबुले चंद्रशेखर देवीदास रा. लाडखेड, मु. पो. लाडखेड. दारव्हा, जि. यवतमाळ	बुलबुले चंद्रशेखर देवीदास द्वारा शंकर बडे, मु. पो. बोरीअरब ता. दारव्हा जि. यवतमाळ
६७	यवतमाळ (वणी)	५८	११९	पाटील ग. मा. पोस्टमन "आश्वर्य" वणी जि. यवतमाळ	पाटील ग. मा. पोस्टमन "आश्चर्य" वणी जि. यवतमाळ
६८	वर्धा	६०	१	आतुरकर अरविंद कृष्णराव, भौतिकशास्त्र विज्ञान जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा	अत्तुरकर अरविंद कृष्णराव भौतिकशास्त्र विज्ञान जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा

नागपूर
दि. १-१-८३

अध्यक्षांचे निर्णयाप्रमाणे
अ. ल. लिमये
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ, नागपूर